REGISTERED N. No. 4

आकोल्यातील लोकांस ................१ रु.
बाहेरगांवीं टपालहांशिलांसह ........ २ रु.
वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंकास.........................।२
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस.........।१ ०६
दुसरे खेपेस..... .......।१

Town ... ... ... 1 Rs.
Mofussil ... ... 2 ( with postage )
All Subscriptions to be paid in advance.
Single copy ...................... 2 as.
Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ...... 3 as
Repetition Per line ... 2 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXVII AKOLA MONDAY 2 FEBRUARY 1903 NO 5

वर्ष ३७ आकोला सोमवार तारीख २ माहे फेब्रुवारी सन १९०३ इ० अंक ५

### विज्ञापना

( २ रुपयांत वऱ्हाडसमाचार )

'वऱ्हाडसमाचार' पत्राची वर्गणी चालू १९०३ साला पासून टपाल हांशिला सुद्धां २ रुपये केली आहे. राज्यारोहणाच्या सुमुहूर्तानें ही गोष्ट आह्मी मनात योजिली आहे. आजपर्यंतच्या उदार आश्रयाबद्दल आह्मी आमच्या वर्गणीदाराचे अत्यंत ऋणी आहोंत. उत्तरोत्तर अधिक लोकाश्रय मिळेल त्या मानानें आह्मी वर्तमानपत्रांत पुष्कळच सुधारणा करण्याचा संकल्प केला आहे. ईश्वर तो संकल्प सिद्धीस नेवो !

१।१।०३ } म्यानेजर— वऱ्हाडसमाचार

### प्लेगासंबंधी माहिती

यूरोप खंडांत मागें ६०० वर्षां पूर्वी प्लेग झाला होता त्या वेळीं भुकेपेक्षां कमी आहार करणारे व कमी दारु पिणारे नसेंच अधीक खाणारे व पुष्कळ दारु पिणारे व बेतानें राहणारे या पैकीं कोणावर ही प्लेगाचा उपद्रव कमी न होतां सर्वांवर सारखाच झाला. त्याला झोंप न येणें, चैन न पडणें, जांबळे घट्ट लहान पोंठ अंगावर उठणें, नाकांतून अगर तोंडांतून रक्त वाहणें जांघेंत व कांखेंत बोरा इतके लहान आकारा पासून तो अंड्या एवढ्या मोठ्या आकाराच्या गांठी उठणें, घेरी येणें फुफुसाचा दाह होणें, श्वास लागणें, या पैकीं कांहीं विकार होऊन मृत्यु येत असे. या प्लेगाचे मुख्य दोन भेद- एक न्युमानिक ज्यानें श्वास लागून रोगी मरे व दुसरा ब्युबॉनिक ज्यानें गांठी होऊन रोगी मरे. या पैकीं पहिल्याचे संसर्गानें लवकर मनुष्यास प्लेग होत होता. किती एकाचे असें ही मत होतें कीं तरूण व मजबूत मनुष्या पेक्षां वृद्ध व अशक्त मनुष्यावर प्लेगचा परिणाम लवकर घडत नसे. प्लेगानें युरोपखंडांतील १०॥ कोट लोक संख्येपैकीं २॥ कोट माणसें मरण पावलीं. प्लेगाचे रोग्याजवळ गेले तर प्लेग होऊन मरू या भितीनें डाक्टर वगैरे कोणाकडून ही कांहींहि उपायांचा शोध झालेला नाहीं. लोक मरू लागले कीं भितीनें गांव सोडून जंगलांत जात व त्या पैकीं बरेच वांचत या वरून पुढें असें ठरलें कीं या रोगास स्थानत्याग हाच उत्तम उपाय आहे.

हिंदुस्थानातील प्लेग युरोपातील प्लेगापेक्षां थोडा निराळे स्वरूपाचा आहे, ह्मणजे प्लेग ज्या जागीं झाला असेल त्या जागीं जाणें, व राहणें यानें प्लेग होतो. परंतु तोच प्लेग रोगी त्या जाग्यांतून दुसरे जागीं नेल्यावर त्या रोग्यास औषध पाणी वगैरे देणारास प्लेग होत नाहीं. जो कोणी प्लेग झालेल्या जागीं रात्रभर निजतो त्यास प्लेग होतो. या करितां ज्या गांवीं प्लेग सुरू असेल त्या गांवीं लोक दिवसास कामधंदा करून रात्रीं गांवाबाहेर जाऊन झोपडींत जेवण खाण करून निजतात. येणें प्रमाणें ते प्लेगाचे झपाट्यांत सापडत नाहींत. प्लेग सर्व ऋतूंत होतो असे जरी आहे तथापि उन्हाळ्यांत त्याचा जोर कमी होत जातो.

### प्लेग ज्या जागीं सुरु झाला नाहीं तेथील लोकांचें कर्तव्यः-

१ प्लेग जागेतून आलेल्या इसमाचे कपडे आधणाचे पाण्यांत शिजवून धुऊन वाळविणें.

२ प्लेग जागेतून आलेल्या इसमास स्नान घातल्यावर घरांत फिरूं देणें.

३ गाईचे शेणानें जमीन सारविणें व भिंती चुन्यानें सारविणें.

४ उन्हांत दुपारी प्रहरभर खाण्याचे जिन्नस व कपडे ठेवणें.

५ सायंकाळीं गंधक अगर धूप अगर शेगडी घरात पेटविणें.

६ नित्य स्नान करणें. व कपडे धुणे.

७ कांहीं किरकोळ रोग झाल्यास त्यावर तात्काळ औषधी घेणें.

८ प्लेगानें आजारी पडलेला इसम आपले घरीं पाहुणा आल्यास त्यास आपले राहते घरांत न ठेवतां दुसरे जागीं ठेवून त्याची खाण्याची व औषधाची तजवीज ठेवावी. कारण आपले घरांत ठेवल्यास प्लेग केसेस होण्यास सुरवात होते.

### प्लेग सरू झाल्यावर

१ घरांत प्लेग केस झाल्यावर तावडतोब दुसरे जागीं गांवाबाहेर रोग्यास घेऊन जाऊन औषध पाणी देण्याची तजवीज करावी. असें केल्यानें रोगी जगतो. मेल्यावर ती जागा साफ करावी व आपण त्या जागेंत न राहतां दुसरीकडे राहावें. असें करणारास जागा सोडून गेल्यामुळें मृत्यु येत नाहीं जे कोणी हट्टानें त्याच जागेंत व घरात राहतात त्यास मृत्यु येतो.

### प्लेग सुरूं होण्याचें पूर्व लक्षण

उंदीर घरात मरूं लागले कीं प्लेग केस होणार आहे असें समजून भागवती पुराणांत सांगितल्या प्रमाणें घर सोडून जंगलांत राहण्यास जावें.

देवी ह्मणतेः—ब्रह्माचे हकूमावरून मी, इंद्र व दुसरे देव गांवोगांवीं जाऊन दुष्टांचा संहार करून परत तुह्माकडे आलें. तेव्हां सूज्ञ लोक मला ओळखून शास्त्रपठण करून धर्माप्रमाणें वागूं लागले. इतक्यांत आढ्यावरून उंदीर जमिनीवर पडले, उड्या मारूं लागले, व मेले. हे दुश्चिन्ह असें समजून सूज्ञ लोक घरें सोडून गांवाबाहेर मैदानात पाण्याची सोय असलेले जागीं जाऊन राहिले व माझी प्रतिमा करून सशास्त्र पूजा धूप दीप दाखवून करूं लागले. भात, केशर, तूप, समिधाचें हवन करूं लागले. या प्रमाणें जंगलांत कांहीं दिवस राहिल्यावर काळे मांचे जंगलांतील झोंपड्यावर बसूं लागले. तेव्हां त्यांनीं काक संधी नांवाचा यज्ञ करून कावळ्यास अन्न खाण्यास घातलें. आणि गावांत परत येऊन सुवासिक द्रव्यांचें हवन करिते जाहले.

वरील गोष्टीवरून असें अनुमान करितां येते कीं प्लेग जागेंतून निघून जंगलांत राहण्यास गेल्यावर कांहीं दिवस पर्यंत अंगांत अशुद्ध स्थिती असते व ती जाण्यास सुमारे महिना तरी लागत असावा या करितां प्लेग केसेस होणें बंद झाल्यावर एक महिन्यानें गांवांत राहण्यास परत यावें असें अलीकडील शास्त्रवेत्त्यांचें मत आहे.

यावरून वाचकांचे ध्यानांत येईल कीं प्लेगपासून मुक्तता करून घेण्यास घर सोडून जाण्या खेरीज दुसरें कांहीं एक औषध नाहीं ह्मणून प्रत्येकानें आपले बचावाकरितां हा उपाय करावा.

### शोचनीय मृत्यू

( एका तरुण वऱ्हाडी ग्र्याजूएटाचा )

प्लेगचें आजारानें जी अनर्थपरंपरा ओढवली त्यांतून पुढें सरसावणारी वऱ्हाडची तरुण पिढी आजपर्यंत बचावली, पण अखेरीस प्लेगनें बळी घ्यावयाचा तो घेतलाच. उमरावतीस सेशन कोर्टांत असलेलें रा. रा. देविदास दिनकर देशपांडे यांचे कनिष्ठ बंधु रा० रा० शेषराव दिनकर देशपांडे यांस एकाएकी गेले शुक्रवारीं ह्मणजे ता० २३-१-१९०३ रोजीं प्लेगचें आजारानें मुंबईस देवाज्ञा झाली. यांचें निधनानें वऱ्हाडच्या तरुण पिढींतले एक रत्न हरवलें असें ह्मणण्यास हरकत नाहीं. वऱ्हाडांतील जुन्या वतनदार घराण्यांतील जी ५-६ मंडळी पुढें सरसावली त्यापैकीं हे एक होत.

आकोट तालुक्यांत पनज या गांवीं यांचा जन्म होऊन वतनवाटा मोठा नसल्यामुळें भावाच्या मिळकती वरच यांचा उमरावती हायस्कुलांतील शिक्षण क्रम आटोपला. यांची बुद्धिमत्ता फार चांगली असल्यामुळें यांने प्रत्येक परीक्षेंत बक्षिसें मिळत गेलीं. शेवटीं १८९६ सालीं उमरावती हायस्कुलांतूनच यांची म्याट्रिक्युलेशन परिक्षा सर्वोत्कृष्ट रितीनें पास होऊन यांस वऱ्हाडची १ ली युनिव्हर्सिटी स्कालरशिप व डा० सिलेरचें संस्कृत प्राइझ मिळालें. यामुळें यांचा कालेजांतील शिक्षणाची अनायासें सोय झाली. यांचें बुद्धिचातुर्य कॉलेजांतही अनेक वेळा दिसून आलें. संस्कृत हा विषय यांचा विशेष आवडता असल्यामुळें त्यांत त्यांनीं बरीच पारंगतता मिळविली. व बी. ए. च्या वेळेस वेदांत विषय उचलून त्यांत जें प्राविण्य त्यांनीं प्रगट केले त्या योगें उइल्सन कालेजांतील संस्कृत अध्यापक प्रो. मडकमकर याची त्याजवर मर्जी बसली. या प्रमाणें १९०० सालीं यांचा कॉलेजचा अभ्यास आटोपून यांना बी. ए. ची पदवी मिळाली. यांचे मनांतून पुढें एमेचा अभ्यास करावयाचा असूनही परिस्थिती अनुकूल नसल्यामुळें त्यांना तो बेत रहीत करावा लागला. नंतर कायद्याचा अभ्यास हातीं धरून १९०१ सालीं पहिली एल. एल. बी आटोपली. पण गेले वर्षीं अनेक कारणांनीं यांची शेवटची एल. एल. बी न झाल्यामुळें निकरानें अभ्यास करण्याच्या हेतूनें ते वऱ्हाडांत परत न येतां मुंबईसच राहिले तों त्यांना ऐन तारुण्यांत व उमेदीच्या भरांत वयाचे २३ वे वर्षीं काळानें ग्रासलें.

यांचा स्वभाव विलक्षण प्रकारें निग्रही दृढनिश्चयी, व प्रेमळ असल्यानें यांचे आयुष्यानें हळहळत नाहीं असा मनुष्य क्वचितच सांपडेल. परोपकार हें तर यांचें ब्रीदच होतें. १८९९ सालीं उइल्सन कालेजांत आगस्टमध्यें हिवतापाची साथ उसळली त्यावेळेस आपला स्वार्थ बाजूला ठेवून यांनीं जी मंडळीची शुश्रूषा केली त्याबद्दल कॉलेजचे प्रिन्सिपाल डाक्टर म्याकिकन ( हल्लींचे युनिव्हर्सिटीचे व्हाइस च्यान्सेलर ) यांनीं अतीशय वाखाणणी केली या त्यांच्या अंगच्या गुणामुळें ते आपल्या समवयस्क मंडळींतच प्रिय होते असें नाहीं तर मुंबईचे विद्वान डाक्तर देशमुख व पुण्याचे प्रसिद्ध वकील व डाक्तर विनायक रामचंद्र पटवर्धन या उभयतांचे-ही प्रेमास ते पात्र झाले होते. व आजारी असतांना या दोघा विद्वान डाक्तरांकडून शक्य तितके मानवी उपाय चालू असतांही प्लेगनें त्यास ओढून नलें.

यांचा निस्पृहपणा, यांचें बुद्धिकौशल्य, स्वत्वाचा पक्का अभिमान, निस्सीम दशभक्ति, धाडस, मनाचें खरें औदार्य, धोरण, व उल्हास या गुणामुळें यांचें हातून बरींच देशकार्यें घडलीं असतीं; पण ही कळी उमलण्याचें आधींच तोडली गेली त्यायोगें त्यांच्या पत्नीला, वृद्ध पित्याला व भावाला तर अनिवार दुःख झालेंच पण एक अतीशय होतकरू व हुशार गृहस्थ नाहींसा झाल्यामुळें इकडच्या तरुण पिढीपैकीं व विशेषतः वतनदार मंडळी पैकीं प्रत्येकाला हळहळ वाटल्या वांचून राहणार नाहीं. असो. ईश्वरी इच्छे पुढें इलाज नाहीं.

सध्याची स्थिति ह्मणजे भर्तृहरीनें वर्णन केल्या प्रमाणें:—

'कालः काल्या भुवनफलके
क्रीडति प्राणि शारैः'

अशी अक्षरशः असल्यामुळें जें हें ईश्वरी सोसणें भाग आहे. असो. मागें राहणारांचें

नुकसान तर खरेंच; पण जगन्नियंता परमेश्वर शेषरावजींनां सद्बुद्धि देवो एवढीच प्रार्थना आहे.

वऱ्हाडसमाचार

मिती माघ शुद्ध ५ शके १८२४

## मी जगाकरितां नाहीं

एक गृहस्थ आपल्या एका प्रतिष्ठित नागरिकांकडे गेले आणि कांहीं सार्वजनिक कामांत त्यांचें साहाय्य मागूं लागले. नागरिकांनीं सदराचे ठिकाणीं घातलेल्या वाक्यानें गृहस्थांस उत्तर दिलें. या उत्तरास गृहस्थ बहुतेक तयार होतेच व जाणून बुजून मदत मागण्याकरितां गेले होते. गृहस्थानीं नागरिकांस उत्तर दिलें " जर तुह्मी जगाकरितां नाहीं तर जगानें तरी तुमच्या करितां कां असावें? " नागरीकांनीं उत्तर दिलें " आह्मी कोठें जगाची मदत मागतों आहों? आह्मी आमच्या पायांवर बळकट उभे आहों. आह्मांला जगाच्या मदतीची जरूर नाहीं. गृहस्थानीं ह्मटलें ' महाराज, आपण विद्वान् अहां, मोठे अहां, पण आपला विचार थोडा चुकत आहे. आपण जरा पोक्त विचार करा ह्मणजे प्रतिक्षणीं आपणास दिसून येईल कीं जगताचे आपणावर अनंत उपकार आहेत व जगाच्या मदती वांचून आपलें क्षणमात्र चालायाचें नाहीं:— सुतार, गवंडी आणि मजूर यांनीं आपलें घर बांधलें; सोनारानें आपल्या प्रियेच्या अंगावरचे दागिने घडले; शेतकरी शेतांत खपतात ह्मणून आपणांस अन्न मिळतें व आपण जिवंत अहां, गुजराथी आपणांस पाणी पाजितो; बैल आपला तांगा ओढून आपणास कचेरींत पोंचवितात; अशा किती ह्मणून गोष्टी एक का दोन. आपणाला मीं सांगावें असें नाहीं; पण जगता वांचून आपलें घटकाभर चालणार नाहीं हें पक्कें समजा." नागरिक ह्मणाले " आहों, आपण अशा खोल पाण्यांत शिरलां काय!" गृहस्थ ह्मणाले आपण " जेव्हां ह्मटलें कीं ' मी जगाकरितां नाहीं; तेव्हां आपल्या समजुती साठीं आह्मांला खोल पाण्यांत शिरणें भाग पडलें. आपल्या सारख्या विद्वानांनीं ' मी जगा करितां नाहीं ' असें ह्मणणें जितकें अनुदारपणाचें आहे तितकेंच तें फार कोत्या दृष्टीचें, संकुचित विचाराचें आणि विद्वत्तेला न शोभणारें असें आहे. अशा गोष्टींत अविद्वानाशीं वाद केला असतां त्या पासून फायदा होईल कारण तो विचारा समजूत घेईल. पण समजून उमजून आडरानांत शिरणारे जे आपल्या सारखे विद्वान त्यांच्याशीं वाद करणें ह्मणजे व्यर्थ कालक्षय करणें होय, तथापि आपल्या सारख्या विद्वानांस मी एक गोष्ट सांगतों कीं " मी जगा करितां नाहीं " हेंच जर सर्व थोर मनुष्यांचें ब्रीद झालें असतें तर ज्या शेंकडों परोपकारी स्त्रीपुरुषांचीं नांवें इतिहासांत झळकत आहेत किंवा हजारों आबालवृद्धांच्या तोंडीं आहेत तीं आपणांस कधींच ऐकूं आलीं नसतीं. आतां आपला जास्त वेळ घेत नाहीं असें ह्मणून ते गृहस्थ चालते झाले.

जे नागरि० गृहस्थ विद्वान् असून ' मी जगा करितां नाहीं ' हें वाक्य आपल्या वर्तनाचा किल्ला करून बसले आहेत त्याचे विचार काय असले पाहिजेत या विषयीं थोडा विचार करूं. मनुष्य विद्वान् असो वा अविद्वान् असो, तो एकवार ज्या प्रकारचे विचार करून व तेही ठाम करून त्यांवर आपलें सर्व वर्तन अवलंबून ठेवितो ते विचार एका दृष्टीनें अगदीं खरे असतात. असे भिन्न भिन्न विचार आपल्या वर्तनाचे किल्ले करून भिन्न भिन्न माणसें जगतांत वागतात ह्मणूनच आपणांस जगतामध्यें वर्तनवैचित्र्य दृष्टीस पडतें. प्रकृत गोष्टींतील नागरिकाचे कुटुंबांत सुमारें पंचवीस मनुष्यें खाण्यास आहेत. याची आमदानी याच्या दुप्पट माणसांस पोसण्यासारखी आहे. तथापि उत्तम थाटानें आपण प्रपंच करावा व श्रीमंती डौलांत राहावें अशीही त्यांस इच्छा आहे.

सदर्हू नाकरिकांनीं एका साधूचें पुढील पद वाचून त्यावर विचार केला असावा.

" ज्याचें सुख त्याला, सुख त्याला
काय असे भलत्याला
ज्याचें सुख० इ०
एक जेवुनि तृप्त झाला
दुजा मारि हाका भुकेला
ज्याचें सुख० इ० "

या पदावरून मनुष्य जसा विचार करील तसें त्यांचें ठाम मत होईल. विचारांतीं कोणी आपलपोटी निघेल, कोणी परोपकारी निघेल. प्रस्तुत नागरिकांनीं असा विचार केला असला पाहिजे कीं प्रत्येक मनुष्यास परमेश्वरानें—नव्हे, चुकलों—सृष्टिस्वभावानें हात, पाय, डोळे इत्यादि सर्व उद्योग करण्याची साधनें दिलीं आहेत, तेव्हा आपण दुसऱ्याला मदत करण्याची कांहीं जरूरी नाहीं. ज्यानें त्यानें उद्योग करून आपल्या करितां अन्न वस्त्र मिळविलें पाहिजे. आंधळे, पांगळे, लुळे जे असतील यांनीं दुःख भोगावें आणि मरावें. जे धट्टेकट्टे असतील आणि आपल्या शारीर किंवा मानसिक श्रमांनीं आपणांस पुरून उरें इतकें अन्नवस्त्र मिळवीत असतील यांनीं त्यांस कांहीं मदत करूं नये. कारण आपणांस पुरून उरण्या इतकें जें त्यांस मिळतें तें त्यानीं संकटाच्या वेळेकरितां संग्रहीं राखून ठेवावें. नाहीतर त्यांच्या च तत्वा प्रमाणें ज्या अर्थीं संकटाच्या वेळीं दुसरा त्यांस मदत करणार नाहींच त्या अर्थीं यांनाही उपाशी मरण्याचीच पाळी येणार.

या नागरिकाच्या विचारांत एक चूक दिसते ती मात्र फार गमतीची आहे. हे आपली बायको आणि लहान मुलें यास पोसण्यास तयार आहेत हें ठीक आहे. पण, ते आपला भाऊ, बहीण, दूरचे नातलग वगैरे माणसांस पोसण्यास कां इच्छितात. यांस सृष्टिस्वभावानें उद्योग करण्याचीं साधनें दिलीं नाहींत कीं आपलीं मुलें, नातवंडें, पणतवंडें यांच्या चरितार्थास पुरे इतकी संपत्ति संग्रहांत टाकून ती मागें ठेवावी. यांच्या मुलाबाळांस आणि नातवंडांस वगैरे सृष्टिस्वभाव उद्योगसाधनहीन अशीं करणार आहे काय? किंवा जीं पूर्वीच झालीं आहेत तीं सृष्टिस्वभावानें तशीं केलीं आहेत काय? तेव्हां या विचारांत जरी आपलपोटेपणा आहे तथापि उदारतेचा कांहीं अंश आहे. नागरिकाचे मनांत आपण " स्वतंत्र " असावें असा विचार पहिल्या पासून असून " ज्याच्या पाशीं धनसंग्रह असतो तोच स्वतंत्र होऊं शकतो " असाही यांच्या मनाचा पूर्ण ग्रह झालेला आहे. त्या प्रमाणें यांनीं संसारास आरंभ केल्या पासून धन संग्रहाचा तडाका चालविला आहे व यांच्या आमदानी प्रमाणें त्यांनीं धनसंग्रहही केला आहे. त्यांनीं ' मी लोकांकरितां नाहीं " या यांच्या विरुद्ध प्रमाणें लोकांस जरी टाकलें आहे तथापि अगंत जवळचे जे आप्त स्वकीय त्यांस टाकलें नाहीं. ' लोक ' शब्दांत कोण टाकावें आणि कोण घ्यावें हाच काय तो प्रश्न आहे. आणि ' आपलपोटेपणा आणि उदारपणा ' हे शब्द त्याच प्रश्नाच्या उत्तरावर अवलंबून आहेत. नागरिक हे पूर्ण आपलपोटे नाहींत कारण त्यांनीं आपलेपणांत बऱ्याच व्यक्तींचा समावेश केला आहे. त्यांच्या सभोंतालच्या व्यक्ति आणि ते स्वतः यानीं उत्तम प्रकारच्या भौतिक सुखांत निरंतर असावें अशी त्यांची इच्छा आहे. या सुखास मात्र मर्यादा नाहीं हें त्यांनीं लक्षांत आणलें असेलच. कारण तींच तींच सुखें मनुष्यास नित्य मिळालीं असतां तीं त्यास साधारण वाटूं लागतात आणि मग हळू हळू त्यांचा समागमही अधिकाधिक श्रीमान् अशा लोकांशीं होत चालल्यामुळें त्याच सर्व जास्त वाढून उत्पन्नही जास्त वाढविण्याची खटपट त्यास करावी लागते. अशा रीतीनें न कळत त्याची संतोषवृत्ति कमी कमी होऊं लागून त्याच्या वृत्तींत दुःखाचा प्रवेश होऊं लागतो. तसेंच ज्या अर्थीं ' मी लोकांकरितां नाहीं " असा बाणा मिरवून नागरिक लोकांशीं बेपर्वाईनें वागतात त्या अर्थीं लौकिक ह्मणून ज्यास ह्मणतात त्यास अर्थात् ते मुकतात. " मला लोकांची पर्वा नाहीं; लोक कांहीं कां ह्मणत ना; त्यांच्याशीं मला काय करायाचें आहे " असें किती जरी मनुष्य बोलला तरी लोकांत आपली स्तुती झाली असतां ज्यास आनंद वाटत नाहीं किंवा निंदा झाली असतां ज्यास वाईट वाटत नाहीं असा मनुष्य असणें अशक्य आहे. या करितां नागरिकांना या दिशेनें ही केव्हां केव्हा उद्वेग उत्पन्न झाला पाहिजे. अभ्यासानें कालेंकरून हें दुःख नागरिकास सुटणें नाहीं. आणखी असें कीं ' दया ' हा एक मनुष्याच्या अंतःकरणाचा स्वाभाविक धर्म आहे. परदुःख पाहून ती त्या त्या वेळीं उत्पन्न होणारच. आपल्या बाण्या प्रमाणें, ती वृत्ति उचंबळेल तेव्हां तिला दाबून टाकण्याकडेही प्रयास पडतील; ते प्रयास ह्मणजे तितक्या पुरतें एक प्रकारचें दुःखच होय. नागरिकांना हें बरेंच सहन करावें लागेल. जी श्रेष्ट कोमल वृत्ति, ज्या वृद्धिंगत करण्या असें विवेकानंदा सारखे अवतारी पुरुष ह्मणतात ती वृत्ति मारून टाकणें खऱ्या सुखप्राप्तीला कितपत हितावह आहे याचा नागरिकांनीं विचार केला पाहिजे.

" मी लोकांकरितां नाहीं " या तत्वावर आधुनिक लोक चालतील तर यांस ' स्वतंत्रपणें ' ह्मणजे कोणापाशीं मदत न मागतां वागतां येईल. मात्र ती मदत ह्मणजे द्रव्याची. इतर गोष्टींत दुसऱ्याच्या मदती वांचून त्यांचें चालायाचेंच नाहीं. त्यास बोलण्या चालण्यास तरी चार मंडळी पाहिजेच. परंतु परोपकारा पासून मनुष्यास जो उच्च प्रतीचा आनंद होत असतो त्या आनंदास मात्र त्यांस मुकावें लागेल. आपलपोट्या मनुष्यास असणारें सुख उदार मनुष्याच्या सुखाच्य फार खालच्या दरजाचें असतें. मनुष्यानें आपलपोटी असावें अशी सृष्टिस्वभावाची ही योजना असेल असें वाटत नाहीं.

## सवाई सोटा.

( वायद्याची तारीख चुकवूं नका )

सरकारी वायद्याची तारीख अगदी जवळ येत चालली ह्मणजे शेतकरी लोकांचे डोळेच फाटतात. वायदा वसूल करण्याला पाटील पांडे बसले ह्मणजे नेमक्या मुदतींत सारा भरण्यासाठीं जो तो आपापली पराकाष्टा करितो. कांहींही असो, वायदा कसा तरी पटविलाच पाहिजे असा सार्वत्रिक ग्रह आहे. वऱ्हाडचे शेतकरी जात्या फार भित्रे आहेत. ते वायद्याची तारीख टळूंच देत नाहींत. इंडियाभर जर कोठे सरकारी पैसा बिनतक्रार जलदी वसूल होत असेल तर तो या प्रांतांत होतो असें आह्मी ह्मणतों. सरकारी ऋण फेडण्यासाठीं इतकी दक्ष प्रजा क्वचितच आढळेल. गेली दुष्काळाची व महर्गतेचीं वर्षें पहा ह्मणजे असेंच आढळेल कीं सरकारी वायद्यासाठीं लोकांनीं आपली प्यारी चीजही विकून टाकली.

पण अलिकडे सरकारी अंमल विशेष कडक होऊं पहात आहे. दुष्काळावर दुष्काळ येत गेले, पिकांची फार अशाश्वती होत गेली आणि जमिनी नीट न पिकल्यामुळें लोकही अगदी जेरीला येत चालले. अशा प्रसंगीं सरकार वायदा वसूल करण्यासाठीं फार सक्तीचे नियम अंमलांत आणीत आहेत हें पाहून विशेष खेद वाटतो. तशांत सारा अतोनात वाढला आहे. नव्या साऱ्याची रक्कम फिटून लोकांच्या पदरीं फार थोडी मिळकत शिल्लक राहते. लोक तंगींत आले आहेत. आणि सारा जबरदस्त वाढला आहे अशा विपत्तींत एक निराळीच आपदा ओढवीत आहे. इतके दिवस सारा वेळेवर न पटल्यामुळें रुपया आठ आणे प्रमाणे दंड पडत असे; पण या पुढें साऱ्याची तारीख चुकली तर मूळच्या साऱ्याच्या सवाईनें सारा वसूल करण्यात येईल. ही सवाई फारच घातुक होईल. या सवाईच्या नियमानें लोकांस आपला रुपयाचा माल बारा आण्याला विकावा लागेल व या रीतीनें गरीब रयतेचा चुराडाच होणार आहे. हा सवाईचा नियम

हुकूम पाहिजे होते पण आह्मी असें ऐकतों कीं सवाईचा धारा अगदीं तहाखरानें वसूल करण्यांत येईल अशी योजना चालू आहे. सरकारी तिजोरी तेव्हांच भरेल पण लोकांची बुडणूक फारच फार होणार आहे. सरकारानीं या आपल्या सवाईच्या हुकुमाचा पुन्हां विचार करावा असें आह्मी मुद्दाम सुचवितों. यंदाच्या सालीं लोकांस पिकेंही चांगलीं आलीं नाहींत. पुष्कळ लोक अगदीं ठार बुडाले आहेत व कित्येकांस साऱ्याच्या रकमेपुरतें देखील उत्पन्न झालेलें नाहीं असा वास्तविक प्रकार आहे. त्याअर्थीं सरकार आपल्या साऱ्याविषयीं कांहीं अधीक सवलती देईल अशी आह्मी उमेद बाळगतों. सरकारचा पूर्वींचा सोटा लहान हात होता ह्मणून हा सवाई केला कीं काय?

## होळकरशाही

होळकरशाहीवर एक निराळा ढग कोसळत आहे असें दिसतें. हा ढग ह्मणजे सांप्रतच्या श्रीमंत महाराजांचा वानप्रस्थ होय. गलित अवस्था प्राप्त झाली, वृद्धापकाळानें राज्यभार उचलत नाहींसा झाला आणि युवराज कर्ता सवरता झाला ह्मणजे राज्यलक्ष्मी पुत्राकडे सोंपविण्याची चाल आमच्या देशांत फार प्राचीनकालची आहे. परंतु सध्यांचा मनु फार पालटला आहे. कालचक्र असें फिरलें आहे कीं, श्रीमंत होळकर सरकारास ऐन उमेदीच्या व तरतरीच्या वयांतच अरण्यांत जाण्याची पाळी आली आहे. लोकवार्ता अशी आहे कीं होळकरशाहीच्या तख्तावर बारा वर्षांच्या युवराजांस बसविण्याचा इंडिया सरकारचा विचार ठरला आहे; आणि ही गोष्ट घडविण्यासाठीं श्रीमंत महाराज आपल्या राज्यपदाचा परित्याग करणार आहेत. ही नवी रचना झाली ह्मणजे नवें कौंसिल नेमून दयाळू ब्रिटिश सरकार होळकरशाहीचीं सूत्रें स्वतांच कांहीं वर्षे आपल्या हातीं घेतील.

ही लोकवार्ता खोटी ठरण्याचा संभव नाहीं. ती खरी केव्हां होईल हें कळण्यासाठीं मार्गप्रतीक्षा देखील फार दिवस करावी लागणार नाहीं. प्रस्तुत जो कारस्थानाचा थाट बसला आहे त्याचा उगम प्रथम जरा चमत्कारिक रितीनें झाला. श्रीमंत महाराजकडे अलिकडे कांहीं अधिकार नव्हतेच. त्यांच्या विरुद्ध पुष्कळशा कागाळ्या इंडिया सरकाराकडे गेल्या. ही ओरड करणारी मंडळी ह्मणजे आमचे आह्मीच आहों. नेटिव संस्थानांतून जे अयोग्य लोक अधिकाराला पोंचतात ते आपल्या आनंदाच्या वेळीं स्वतांची धन्यता समजतात पण दुःखाच्या ह्मणजे श्रीमंतांच्या कोपाच्या प्रसंगीं सर्व आरिष्ट श्रीमंतांच्या माथीं मारूं इच्छितात. असली मंडळी ह्मणजे कुऱ्हाडीच्या दांड्या प्रमाणें होत. श्रीमंत महाराज फार चाणाक्ष, धूर्त व कुशाग्र बुद्धीचे आहेत असें परिचया वरून कळतें; पण त्यांच्या बहुमोल गुणांची माती जवळच्याच लोकांनीं केली आहे इतकेंच नाहीं तर राज्याचा परित्याग करण्याची संकटवेळा श्रीमंतावर ओढवली. शेवटीं ब्रिटिश सरकाराची इतराजी झाली आणि श्रीमंत सत्ताहीन झाले. सर्व सत्ता कौंसिलाच्या हातीं गेली आणि ही पिंजऱ्यांत पडलेल्या सिंहाची दशा श्रीमंतांस सहन होईना. दिवाणाच्या ओंजळीनें पाणी पिणें नकोसें वाटलें. मनाच्या उद्विग्न स्थितींत त्यांनी सार्वभौम सरकारास यादी लिहिली कीं मी राज्यपदाचा परित्याग करितो, माझ्या चिरंजीवास गादीवर बसवा व मला पेनशन देऊन टाका. याच सुमारास लार्ड कर्झन साहेब इंदुरास आले. त्यांनीं श्रीमंतास मुलाखतीस येण्याविषयीं खलिता लिहिला. परंतु श्रीमंतानीं जबाब कडक दिला असें ह्मणतात. तो जबाब अशा अर्थाचा होता कीं राजधानी सार्वभौम सरकारचीच आहे. आपण सुखेनैव यावें व जावें. मी माझ्याच राज्यांत विदेशी आहे तेव्हां मला भेटीचें कारण दिसत नाहीं. त्या नंतर लार्ड कर्झन यांनीं श्रीमंतांचें मन वळविलें व महूच्या छावणींत मुद्दाम गांठ घेतली. त्या मुलाखतींत विशेष सलोखा झाला आणि पुढें श्रीमंत महाराज दिल्ली दरबारालाही गेले. पुन्हा आनंदाचा दिवस समीप येत आहे अशा मनोराज्यांत महाराज होते पण लार्ड कर्झन यांनीं आपला मुत्सद्दीपणा निराळाच लढविला. श्रीमंतांच्या यादी प्रमाणेंच सरकारानें पक्का विचार केला कीं पित्यानें राज्यपदाचा परित्याग करावा आणि पुत्रानें गादीवर बसावें. श्रीमंतांस तीन चार लक्षाचें सालिना पेनशन देण्यात येणार आहे. या प्रमाणें यादीच खरी करण्याचा इंडिया सरकारचा ठराव झाला आहे.

दिल्ली दरबाराहून परत येतांच अशी संभावना होईल असें कोणास वाटलें नव्हतें. परंतु लार्ड कर्झन साहेबांच्या कारकिर्दींत निकाल फार जलदी लागतात. वऱ्हाड प्रांताचा प्रश्न निकालास लागला आणि या बरोबरच जलदीनें होळकरशाहीचाही प्रश्न निकालास लागला. जलदीचें महात्म किती अप्रतीम आहे! वऱ्हाड प्रांत कौलपट्ट्यानें वहिवाटीला घेतला आहे, तसेंच होळकरचें राज्य भावी तरुण होळकरांच्या बाल्यावस्थे मुळें वहिवाटीला येत आहे. पक्की इंग्रजी होळकरशाहींत चालूं होईल आणि सर्व संपदांचे नद त्या राज्यात वाहूं लागतील असा सोन्याचा दिवस लवकरच उगवणार आहे! वऱ्हाड प्रांत घेतला व होळकरशाही वरीं चालून आली इतकाच फरक आहे. जांबूळ तोंडांत टाकलें काय किंवा झाडाखालीं असतांना तोंडात पडलें काय, रसास्वादाला त्याचे सर्व गुण सारखेच!

## The Berar Samachar

MONDAY FEBRUARY 2 1903

We do not know how to justify a department like that of the Abkari branch. The more we think of arguments in favour of its continuance the more alarming as well as oppressive it looks to us from every stand—point of view. There remains no optimism about it and we come to decide that an Abkari department is a nuisance to the people if nothing more. Truth will have to be admitted however unpalatable it be. Experience confirms us in our view of the Abkari department. It is an undying source of revenue to the Government. It brings annually to the Government treasury large sums of rupees every one of which the people can ill—afford to spare if they be prudent and fore-sighted to the smallest degree in regard to their personal comforts and to those of their families. The vice of intoxication has got a firm grip of the people. It is progressive and increasing on a large scale. every year it shows an increasing tendency and the manner in which this vice develops is most painful and obnoxious to our moral perception. The Government make hay while the people are rolling in the vices of drink and smoke. The abnormal proceeds of the Abkari department point to one solid fact. There is the vice of intoxication and the department gets rich because of the moral weakness of the majority of mankind in India. The Abkari department is most killing in its pauperization of the people. The drink and the smoke the people will have at any cost: and life is a burden to many if they cannot get either. This inherent weakness in human character is the play—ground for the Government. The Government interpose themselves like the moralist. They begin to philosophize to the effect that an Abkari department is a necessity in the interests of the people. The minimum of the vice is to be reached by the maximum of cost which the depart—ment will fix upon the articles of intoxication. The Government find this branch most elastic of revenue and have not yet come to their standards of vice and income there—from. In their heat of doing good to the people and of introducing a salutary check upon the spread of the vice the Government have left out of account the proper limits to which their crusade is to be pushed against intoxication. The money the vice brings to the State is a great attraction and several devices have been found out to increase the revenue of the department to the highest point. This highest point is again very variable. Like the horizon it is ever at a distance the nearer we approach it. The large revenues of the Abkari sales indicate to the self—same truth. Every year we see a systematic impoverishment of the people. We find no reason to support the Government in their act of demoralizing the people. Poverty and pauperism is like the nursery to a garden of moral depravity. These fifty years, the Government have been trying with their experiments of the Abkari department. The result is most suicidal to the people. Before the Government reach their ideal the people will be robbed of their last pice; and then the game will not be worth the price. We presume that a heavy duty on articles of intoxi—cation controls the over—growth of the vice; but further more than that it will fail to effect. The minimum of the vice is reached and we presume that the further increase in the vice is due to the growing poverty which drives people to drink or eat or smoke the intoxicating substances with a view to smother the desire for nourishment. In the absence of proper nourishment we have seen people take to this vice. We hold that the increase in intoxication is due to poverty for which the Abkari department is directly responsible. We think that it is just the time when this department should be organized on more humane principles.

## वऱ्हाडवृत्त

हवामान— रोगराई शेगांव, बाळापूर व खामगांव यांच्या आसपास खेडेगावीं विशेष आहे. मलकापुरास दररोज दोन चार प्लेगाचे मृत्यु पुन्हां होऊं लागले आहेत. आकोल्यास शांतता आहे. थंडी चांगली पडूं लागली आहे. प्लेगामुळें लोक मोठे हवालदील आहेत. संरक्षण करणार परमेश्वर समर्थ आहे!

कुमार श्रीहरमामजी साहेब हे आज येथें कचेरी करून पुन्हां दवऱ्यांत फिरण्यास जातील.

आकोल्याच्या पश्चिम भागाला लोकवस्तीच्या नजिक प्लेगाचे रोगी ठेवण्याच्या झोंपड्या आहेत. तेथेंच आकोल्यापासून पूर्व भागाला दोन दोन मैलावर प्लेग झालेल्या रोग्यास आणितात. या संबंधानें लोकांनीं तक्रार केल्यावरून कुमार साहेबांनीं झोंपड्या दूर नेण्याविषयीं हुकूम दिला आहे.

येथील रा० रा० लक्ष्मी नारायण मारवाडी यांच्या घरीं कोणी माणूस मृत झाला. तो प्लेगानें आजारी असावा असें वाटल्यावरून त्यांचें घर स्वच्छ करण्याची गर्दी झाली तेव्हां कांहीं लोक बिचलले होते परंतु कुमार साहेबांनीं त्यांस शांत करून सिव्हिल सर्जन साहेबां कडून योग्य ती व्यवस्था करून घेतली.

ब्रह्मपरिषदेचे सेक्रेटरी रा० रा० के० नारायण स्वामी हे आपल्या व्याख्यानांनीं यवतमाळास श्रोतृवृंद तल्लीन करून टाकीत आहेत. यांच्या संभाषणाचा लाभ अकोलेकरांसही लवकर मिळणार आहे.

रा० रा० जगन्नाथ रावजी टुल्लू यांनीं स्वामी विवेकानंदाच्या चरित्रावर रचलेलें आपलें सुंदर काव्य आह्मांकडे पाठविलें आहे. त्याचा आह्मी आभार पूर्वक स्वीकार करितों.

## आकोला बाजारभाव

| | |
|---|---|
| हुंडी दर्शनी | ९९॥- |
| सोनें | २४।≈ |
| चांदी | ६९॥= |
| जवस | ११६ |
| जवारी | ४९ ते ५० |
| गहू | ८९ ते १०० |
| बाजरी | ६८ ते ७० |
| मीठ | ४ रु. मण |
| चणे | ३॥- रु. मण |
| तूप | ७॥= रु. मण |
| तेल | ६८= रु. मण७॥ |
| रुई | ६३- ९ |

## वर्तमानसार

गप्पा— लार्ड कर्झन साहेब विलायतेस गेल्यावर ते मुख्य प्रधान होतील आणि त्यांच्या व्हाईसरायच्या जागीं कदाचित ड्यूक ऑफ कॉनाट येतील ह्मणतात.

चिन्पाड मल्ल— तुर्कस्थानच्या पदरीं असलेला एक मल्ल इंडियांत येणार आहे. याचा आणि आपल्या कडील प्रसिद्ध पहिलवान महमदखान याचा सामना होणार आहे. तुर्की मल्लाची उंची ६॥ फूट व वजन ३०८॥ पौंड आहे.

**धूम्रपान औषधी**— तंबाकूच्या धूम्र पानानें पटकीचे जंतू मरतात; आणि क्षयरोगनाशासही धूम्रपानाची फार चांगली मदत होते असें कांहीं डाक्टर ह्मणू लागले आहेत!

**चौर्य शिक्षण**— चीनचे भिकारी लोक आपल्या बायकापोरांना, दुकानदारांच्या फळ्यावरचे जिन्नस त्यांच्यासमक्ष चोरून नेण्याच्या कामीं शिकवून चांगले पटाईत करीत आहेत, व ह्या बद्दल तेथील कायदा कांहींच करूं शकत नाहीं ह्मणतात.

**जातिवंत खाटीक**— मोठ्या व लांब चामड्यास किंमत जास्त येते ह्या समजुतीनें कलकत्ता येथील दुष्ट खाटिक लोक जिवंत बकऱ्यांचीं चामडीं सोलून काढीत होते तें बंद करण्यांत येणार आहे.

**नवीन धूमकेतू**—आलीकडे एक धूमकेतू पूर्व दिशेस रात्रीं ७ वाजतां उगवूं लागल्याचें प्रसिद्ध झालें आहे. तो अजून डोळ्यांनीं दिसत नाहीं. दुर्बिणींतून मात्र दिसतो; तथापि दररोज १२॥ लक्ष मैल इतक्या वेगानें पृथ्वी जवळ जवळ येण्याची त्याची शीघ्रगति आहे; ह्या वरून ह्या महिन्याचे अखेरीस तो स्पष्ट दिसूं लागेल असा ज्योतिर्विदांचा अजमास आहे.

**यूरोपांतील मोठा जुगारखाना**— हा जुगारखाना बेलजियमच्या किनाऱ्यास आस्टेंड येथील हाटेलमध्यें होता. मेंबराशिवाय इतरांस ह्यांत जाण्याची व खेळण्याची मनाई असे, मेंबर होण्यास १९ रुपये फी असे. ह्याचे एकंदर मेंबर २४००० होते. इमारतीची व जुगार खेळण्याच्या जागेची बांधणी अशा प्रकारची होती कीं, बाहेरच्या लोकांस आंत किती लोक आहेत व काय करितात ह्याचें अनुमानही होत नसे. एका वेळीं तीन हजार मनुष्यें एकदम जुगार खेळूं शकतील अशा प्रकारें आतील जागा भव्य व व्यवस्थित होती! ह्या जुगारखान्यापासून परवाने वगैरे फीच्या रूपानें तेथील म्युनिसिपालिटीस दरसाल ४० हजार पौंडाचें व सरकारास २० हजार पौंडाचें उत्पन्न होत असे. जुगारखान्यातील नोकर लोकांच्या पगाराचा खर्च १० हजार पौंड असे व जाहिरातींचा खर्च २० हजार पौंड असे! जुगार खेळतांना देवघेवी करितां हलक्या धातूचे नवीन शिक्के रु. २ पासून रु. ३००० पर्यंत किंमतीचे केलेले असत. जुगारखान्याची एक पेढी केली होती, त्या पेढीवर खरें नाणें भरून आपण लागेल त्या किंमतीचे शिक्के घेऊन नंतर खेळण्यास जावें व खेळ आटोपल्यावर पुन्हां पेढीवर ते शिक्के वटवून नाणें घ्यावें अशी योजना केली होती. बेलजियम सरकारनें हा जुगारखाना बंद केल्यामुळें ओस्टेंडच्या म्युनिसिपालिटीचे ४० हजार पौंडाचें नुकसान झालें! त्याचे बदल्यात बेलजियम सरकारानें तिजोरींतून त्या मुनिसिपालिटीस २ लक्ष पौंड व जुगारखान्याच्या मालकांस त्यांच्या नुकसानीबद्दल ८० हजार पौंड दिले आहेत. अनाचाराचा मार्ग बंद करण्याकरितां बेलजियम सरकारानें इतकी नुकसानी सोसून जो इलाज घेतला तो स्तुत्य असून इतर ठिकाणच्या लोभी सरकारांनीं अनुकरण करण्यासारखा आहे.

स्तुति करतांना उत्तर हिंदुस्थानांतील एक ॲंग्लो-इंडियन पत्र असें ह्मणते कीं चुकून लॉर्ड कर्झन जर व्हाइसराय झाले नसते, तर ते एकाद्या रेल्वेचे किंवा बँकेचे उत्तम म्याने जर झाले असते!

**फारच योग्य सूचना**— प्रामिसरी नोटा प्रमाणें रा. सा., रा. ब., खा. सा., खा. ब., या पदव्या बाजारांत विकण्याची परवानगी द्यावी ह्मणजे पदव्यांस कंटाळलेल्या व त्यासाठीं हापापलेल्या अशा उभयतांचाही फायदा होईल, असें इंडियन मिरर पत्र ह्मणतें!

**अवाढव्य ज्ञान**— दरबारासंबंधानें इंग्लंडांतील लोकांत फारच ज्ञान दिसत आहे. ‘हत्तींच्या पायांचा आवाज होऊं नये ह्मणून त्यांस मखमलीचे नाल मारले होते! व त्यांस लगाम लावून संस्थानिक वर बसले होते! व्हाइसराय ड्यूक, संस्थानिक यांस यारीनें अलग उचलून हत्तीवर बसविले! अशा तऱ्हेच्या गप्पा तेथील सामान्य लोकांत पसरल्या आहेत!

**आंदिजानचा धरणीकंप**— रशियाच्या मध्य आशियांत हें शहर असून धरणीकंपानें येथील एकंदर घरें ९००० नेटिवांचीं व रशियनांचीं ३०० जमीनदोस्त होऊन २०००० लोक मरण पावले! धरणीकंपाचे दोन धक्के पहिले दिवशीं बसल्याबरोबर सर्व घरें कोसळलीं! लागलीच विजांचा कडकडाट होऊन पाऊस पडला; पण धरणीकंपानें भोंवतालचे ओढे, तलाव व झरे आटून कोरडे ठणठणीत पडले. यामुळें लोकांस अन्नपाणी चोहोंकडे मिळत नाहीं. प्रेतें कुजून रोग उद्भवले आहेत.

**भावी दिवाण**— प्रसिद्ध काँग्रेसभक्त ना० चिमणलाल सेटलवाड बी. ए. एलएल. बी. यास बडोद्याची दिवाणगिरी देण्यासंबंधानें ते व श्री. गायकवाड सरकार यांचेमध्यें पत्रव्यवहार चालला असून ते ती जागा बहुतकरून पत्करतील, असें अहमदाबादचे ‘गुजराथी पंचा’ वरून समजतें!

**दहाबारी नवें पिस्तुल**— ले. हिनो नांवाच्या जपानी लष्करी अधिकाऱ्यानें एक पिस्तुल असें तयार केलें आहे कीं, त्यांत दहा गोळ्या घालून त्या एकामागून एक त्वरेनें उडवितां येतात. एक गोळी उडाली कीं, पिस्तुल मागें येतें, व त्या जोरानें पहिल्याचे जागीं दुसरी गोळी आपोआप येऊन बसते. या व्यवस्थेनें पिस्तुल उडविणारास धक्का बसत नसून एका मिनिटांत ८० प्रमाणें यानें गोळ्या सोडतां येतात!

**मोठा सुखी गांव**— स्वीदनमधील ओर्सा शहरांतील लोकांस कोणताही कर द्यावा लागत नाहीं. तेथें शिक्षण फुकट मिळतें; तारा फुकट पाठवितात आणि ट्रामचे व गाड्या यांचें भाडें पडत नाहीं. तेथील म्युनिसिपालिटीच्या मालकीचें एक अरण्य आहे. त्याचें प्रचंड उत्पन्नावर हें सर्व चालतें!

**प्लेगवर उत्कृष्ट उपाय**— तुळस ही वनस्पती हवा शुद्ध राखण्यात रामबाण वल्ली आहे असा पुरातन हिंदू वैद्यक व त्याच प्रमाणें युरोपियन शास्त्राचाही आधार आहे. प्लेगची बाधा होणार नाहीं असा पुष्कळांस आताही अनुभव येत आहे. उपाय शुष्क आहे, ह्मणून तो करून पहावा अशी आमची सर्वत्रांस सविनय सूचना आहे.

**खरेंच कीं काय**— इंग्लंडातून दिल्लीस आलेल्या इंग्रज पत्रांच्या बातमीदारांनीं कांहीं प्रतिकूल टीका आपल्या पत्रास पाठवूं नये, अशी लार्ड कर्झन यांनीं तजवीज केली होती; परंतु एका बातमीदारानें प्रतिकूल टीका विलायतेंतील आपल्या पत्राकडे पाठविली; व त्याबद्दल व्हाइसरॉयांस घुस्सा येऊन त्यांनीं तुला येथें कशासाठीं आणलें आहे हें तुला माहीत आहे काय? असा त्या बातमीदारास प्रश्न केला; असें इंग्लंडांतील ‘मॉर्निंग लीडर’ पत्र ह्मणतें। प्रसिद्ध होणाऱ्या दरबारच्या हकिकतीवर ‘लाट साहेबांच्या इच्छेसाठीं स्तुतिपूर्ण वर्णन’ असें मोठ्या टाइपांत हेडिंग घालावें; आणि दरबारकथांपांत ठिकठिकाणीं ‘वर्तमानपत्रकारांनीं इकडे लक्ष्य द्यावें; दरबारावर प्रतिकूल टीका करूं नये’ अशा तऱ्हेच्या पाट्या लावाव्या, अशी या पत्रानें थट्टेनें सूचना केली होती!!

**इंग्रजी न्यायाची साक्ष कोण देईल तर**— आपल्या नेटिव चाकराचा खून केल्याबद्दल जेव्हां हिंदुस्थानांत युरोपियन मेजर फांशी जाईल, किंवा आपल्या नेटिव रखेलीच्या पोटीं झालेल्या पोराच्या पोषणार्थ तजवीज न केल्याबद्दल जेव्हा एकाद्या कलेक्टरास कैद होईल, तेव्हांच १०० दरबारापेक्षांही अधिक रीतीनें इंग्रजी राज्याचा न्यायीपणा सिद्ध होईल” असें खुद एक इंग्रजी पत्रच बोलत आहे.

**नाताळांत पोष्टाचें काम किती वाढतें**— नाताळांत पोष्टाचें काम इतकें वाढतें कीं तें वेळेवर आटपण्यासाठीं लंडन येथील पोस्ट मास्तरांना नवी ४१९ हजार माणसें नोकरीस ठेवावीं लागतात.

**विजेचें टपाल**— तारेच्या खांबासारखेच खांब रोवून त्या तारांवरून लहान गाड्या चालविण्यांत याव्या आणि त्यांना चालविण्याचें व थांबविण्याचें काम विजेच्या सहायानें करावें. एका पोस्टावरून इमारती नजीकचे खांबावरून जी गाडी पत्रें पार्सलें घेऊन निघावी ती दुसऱ्या पोष्टाच्या गच्चीवर नेमकी जाऊन उभी रहावी अशी व्यवस्था विलायतेंतील एक गृहस्थ करण्याच्या खटपटींत आहेत. शाबास!

**गोळीप्रूफ कापड**

न्यूयार्क येथील कॅसीमीर झॅगलीन नांवाच्या एका हुशार कारागिरानें एक कापड असें तयार केलें आहे कीं, त्या कापडांत बंदुकीची गोळी मुळींच शिरूं शकत नाहीं. याचा अनुभव नुकताच न्यूयार्क शहरीं घेऊन पाहिला. सात आठ वाराच्या अंतरावरून ह्या कापडावर गोळ्या सोडून पाहिल्या, परंतु त्या कापडास लागून खालीं पडल्या. पूर्वी जर्मनीतील तोफ करणाऱ्या कारखान्यांतील एका शोधक मनुष्यानें असेंच एक मिश्रणाचें कापड तयार केलें होतें. व त्या कापडाचा डगला एका मनुष्याच्या अंगांत घालून त्यावर गोळ्या सोडण्यांत आल्या होत्या परंतु त्यापैकीं एकही गोळी सांडलेल्या गोळ्या त्या तुळईत शिरल्या होत्या. ह्या कापडाचें डगलें तयार करून ते लढाईचे प्रसंगीं लढाऊ लोकांच्या अंगात घालण्याची योजना होणार आहे. हा नवीन शोध अपूर्वच होय.

**नोटीस**

बेशमी अमृतराम टीकाराम देशमुख राहणार मौजे रोहण ता. व पोस्ट खामगांव यांसः—

मी खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं, आपल्या नावें आमची रु. ३९७ बाकी निघाली होती. तिजवर तुमची रुजू ह्मणून सहीहि झालेली आहे. आज देऊं उद्या देऊं करतां करतां त्यास आतां २-२॥ वर्षें होत आलीं, पण अद्याप तुह्मी कांहीं निकाल करीत नाहीं. सबब ही नोटीस देणें भाग पडले. आतां ही नोटीस पावल्या आठ दिवसांत रुजूचे रुपये व त्याच हिशोबानें होणारें सर्व व्याज देऊन टाकावें. असें मुदतींत न झाल्यास कायद्या प्रमाणें तजवीज करावी लागेल. व त्या साठीं जो खर्चवेच लागेल तो तुह्मा कडून घेतला जाईल. ह्मणून अगाऊ नोटिशीनें कळविलें आहे. कळावे ता. १८ जानेवारी सन १९०३ इ०

सही

देवकिसन सदासुख मारवाडी साहू
राहणार रोहण ता० खामगांव
तर्फे मुखत्यार जानराव सखा।
राम देशमुख दस्तुर खुद्द.

**नोटीस**

बेशमी मल्हू वल्लद लक्ष्मण वाडकर कुंभार राहणार वाडेगांव ता० बाळापूर यांसः—

मी खालीं सही करणार या लेखानें कळवितों कीं माझी मुलगी नामें अंबी हीचा विवाह तुमच्याशी होऊन आज सुमारे ७-८ वर्षें होत आलीं मध्यंतरी तुह्मी तिला उगीच्या उगीच घरांतून काढून दिले. ह्मणून ती लहान पोर माझ्या घरीं एका नातलगानें कशीबशी आणून घातली. ती जाणती व न्हातीधुती झाली ह्मणजे तुह्मी तिला घेऊन जाल अशी आह्मांस खात्री वाटत होती पण तुह्मी दुसरें लग्न करण्याचा विचारांत आहा हें ऐकून आह्मांस आमच्या मुलीची काळजी वाटूं लागली आहे सबब ही नोटीस देणें भाग आले. ही नोटीस पावल्या पासून चार दिवसांत त्या मुलीला घरीं घेऊन जावें, व तिच्या निर्वाहास कांहीं धक्का लागणार नाहीं अशी चार पंचांची खात्री करून द्यावी. तसेंच ४-९ वर्षें मी तिचें पालन पोषण केलें या बद्दलचा माझा खर्च मला देऊन टाकावा. येणें प्रमाणें योग्य गोष्ट तुह्मी मुदतींत न कराल तर आह्मांस सरकार तर्फे योग्य दाद मागावी लागेल. आणि मग या कामीं अखेरपर्यंत जो खर्चवेच व नुकसानी होईल तीहि या नोटिशीच्या खर्चा सुद्धां भरून घेतली जाईल. कळावें ता० ३० माहे जानेवारी सन १९०३ इ.

सहीची निशाणी

सिताराम वल्लद तुळाजी कईसकार
कुंभार राहणार सावर ता०

REGISTERED N. No. 4

आकोल्यांतील लोकांस ..........१ रु.
बाहेरगांवीं टपालहांशिलांसह ........ २ रु.
वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंकास..........)२
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस......)१ ऽ६
दुसरे खेपेस .... ....)१

Mofussil ... ... 2 ( with postage
All Subscriptions to be paid in advance.
Single copy .................. 2 as,
Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......3 as
Repetition Per line .. 2 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXXVII AKOLA MONDAY 9 FEBRUARY 1903 NO 6

वर्ष ३७ आकोला सोमवार तारीख ९ माहे फेब्रुवारी सन १९०३ इ० अंक ६

## विज्ञापना

### ( २ रुपयांत वऱ्हाडसमाचार )

'वऱ्हाडसमाचार' पत्राची वर्गणी चालूं १९०३ साला पासून टपाल हांशिला सुद्धां २ रुपये केली आहे. राज्यारोहणाच्या सुमुहूर्तानें ही गोष्ट आह्मी मनात योजिली आहे. आजपर्यंतच्या उदार आश्रयाबद्दल आह्मी आमच्या वर्गणीदाराचे अत्यंत ऋणी आहोंत. उत्तरोत्तर अधिक लोकाश्रय मिळत ह्या मानानें आह्मी वर्तमानपत्रांत पुष्कळच सुधारणा करण्याचा संकल्प केला आहे. ईश्वर तो संकल्प सिद्धीस नेवो !

१।१।०३ } म्यानेजर— वऱ्हाडसमाचार

## सुद्दाम वैश्य लोकांच्या हितासंबंधीं

### लेख ४

### वैश्य महासभा

आज कांहीं अपरिहार्य कार्यामुळें इतर विषयांस जरा मागेंच ठेवुन अगोदर मागील १ ल्या लेखांत उल्लेख केलेल्या वैश्य महासभेसंबंधीं थोडीशी माहिती आमच्या जातीबांधवांस करून देण्याची आवश्यकता वाटते. यामुळे ती बद्दल थोडीशी माहिती माझ्या समजुती प्रमाणें देतों. वैश्य महा सभा ही संस्था इ. स. १८९२ सालीं मिरट शहरीं स्थापन झालेली आहे. पूर्व हिंदुस्थानात तसेच वायव्य प्रांतिकडेसच्या बाजूला आमचे लोक विद्येंत तसेंच व्यापारांत बरेंच पुढें गेलेले आहेत. कित्येक युनिव्हरसिट्यांतून माननीय पदव्या मिळवून कोणी कलेक्टर, सबजज्, इंजिनियर, डाक्टर वगैरे सारख्या उच्च सरकारी नोकऱ्यावर आहेत. तसेच कोणी नेटिव संस्थानांत मोठमोठाल्या जागेवर आहेत. कोणी वकील व ब्यारिस्टर आहेत. हें सर्व वाचून आपणांस मोठें आश्चर्य वाटूं लागलें असेल व खऱ्या खोट्या गोष्टीबद्दल जरा मनात शंकाही आलीच असेल, परंतु आपण जर सभेचे रिपोर्ट वाचून पहाल तर आपली खात्री झाल्यावांचून राहणार नाहीं. ह्या सभेचे मोठमोठे लोक पुरस्कर्ते आहेत. ह्या सभेच्या सुप्रयत्नानें आज अजमिरास अग्रवाल उपकारक मासिक पुस्तक निघते, हापूड मुक्कामीं "माहेश्वरी" तसेच मिरटला "वैश्यहितकारी" पत्र निघत आहे. ही सभा आपल्या सदुपदेशानें आमच्यांतील वाईट चाली हळूं हळूं एका मागून एक बंद करविण्याचे उपाय योजित आहे. तसेच ह्या सभेच्या बैठकी साल दरसाल जेथें जेथें ह्मणून आमच्या जातीबांधवांचा समुदाय जास्त असेल अशा मुख्य शहरीं भरून सर्वानुमतें ठराव पास करून असतील तितक्या वाईट चाली बंद करून होतील तितक्या सुधारणा करण्याचे प्रयत्न करीत आहे. वैश्य लोकांकारितां अनाथालय, नाइट स्कूल, बोर्डिंग हॉउस, व पुस्तकालया सारख्या संस्था स्थापिल्या गेल्या आहेत. व बाचेटेक्निकल इन्स्टिट्यूटांत व तसेच जपानांत आपल्या हुशार जातीबांधवांस स्कॉलरशिपा देऊन ह्याच संस्थेच्या द्वारें शिक्षणार्थ पाठविलें जात आहे. व गांवोगांवीं व्याख्यानें देऊन आपल्या जातींतील दुष्ट चाली मोडण्यास व सुधारणा घडवून आणण्यास उपदेशकहि ह्याच सभेकडून पाठविले जात आहेत. आतां ही संस्था आपल्या जातीबांधवास किती उपयोगाची आहे व ही आपल्या कल्याणार्थ अहर्निश कसे व किती प्रयत्न करीत आहे हें सर्व या वरील गोष्टीवरून आपणांस कळून आलेंच असेल. आतां या संस्थेकडेस आपल्या सर्वांची सहानुभूति असणें अलबत फार जरुरीचें आहे व हिला व आपल्या जातीच्या मासिक पत्रांस तनमनधनें करून मदत करणें आपलें एक कर्तव्यच आहे. शास्त्रांत ह्मटलें आहे कीं दानधर्म करणें तो देश, काल, व पात्रापात्रीं विचार पाहून करावा. उन्हाळ्यांत जर आपण आफ्रिकेंत गरम कपडे दान कराल अगर हिवाळ्यांत हिमालयाच्या शिखरावर मलमलेंचें ठाण दान कराल तर दान घेणारास काय बरें फायदा होऊं शकेल! कांहींच नाहीं. याचप्रमाणें पात्रापात्रींहि विचार केलाच पाहिजे. जर आपण सज्जन धर्मात्म्या मनुष्यास दान करूं तर त्यामुळें तो जें सुकर्म करील त्याचें कांहीं अंशीं फळ आपणांसही मिळेल, तसेंच आपण जर तेंच दान दुराचारी मनुष्यास केलें तर त्यामुळें त्याच्याकडून जें पापकर्म घडून येईल त्याचेंही आपणांस भागी व्हावें लागणारच. एक व्यर्थ दानही आहे. जसें विहीर खणणें व बांधणें हें एक पुण्य कर्म आहे परंतु एका विहिरी जवळच दुसरी खणणें, व बांधणें व्यर्थ आहे असो.

ज्यास शक्ती असेल त्यांनीं या संस्थेस आश्रय देणें जरूर आहे. हें देणें ह्मणजे हा एक आपला भाऊबंदीचा हिस्साच आहे. जर आज आपण हिला आश्रय द्याल तर उद्यां आपल्यांच मुलाबाळांना हिच्याच कडून आश्रय मिळेल. मला तर असें वाटतें कीं हिला आश्रय देणें हें आपल्या सर्वांचें परम कर्तव्यकर्मच आहे. हें सर्व येथें सांगण्याचें कारण कीं बाबू राधा मोहनजी उपदेशक हे ह्या सभेकडून इकडे आपल्या प्रांतात लवकरच येणार आहेत. व उपदेशकाची आपल्या प्रांतांत किती आवश्यकता आहे हें आपण वस्तुस्थिती वरून जाणतच आहां. तरी हे उपदेशक महाशय आल्यावर त्यांचीं व्याख्यानें मनःपूर्वक ऐकून आपल्या कडून होतील तितक्या दुष्ट चाली अमीबात बंद करून शक्य शक्य तितक्या बहुतेक सर्व सुधारणा करतील व त्यांना हस्तेंपरहस्तें अर्थद्वारेंही मदत देऊन ह्या संस्थेस आश्रय देतील व जातीच्या मासिक पत्रांची एक एक प्रत घेऊन त्यांनाही आश्रय देतील अशी आशा प्रदर्शित करून हा लेख आटोपतों.

खामगांव ता. २६।१।१९०३ } आपला एक वैश्य (मारवाडी)

## मी जगाकरितां नाहीं

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि. वि. आपल्या पत्राच्या गेल्या अंकांत "मी जगाकरिता नाहीं" ह्या मथळ्याखालीं प्रसिद्ध झालेला लेख मीं वाचला. त्यावरून कांहीं शंका उत्पन्न झाल्या आहेत त्यांचें निरसन व्हावें ह्या हेतूनें हें पत्र लिहिण्याचें धैर्य मी करीत आहे. प्रस्तुत लेखांत दर्शविलेला "नागरिक" मी नाहीं किंवा ते कोण आहेत हेंही मला माहीत नाहीं. आपले "गृहस्थ" कोण आहेत हें ही मला माहीत नाहीं, परंतु आपल्या लेखांतील विधानास एक प्रकारचें सार्वजनिक महत्व प्राप्त झालें आहे ह्मणून त्यांतील विचारसरणी संबंधानें माझे जे विचार आहेत ते प्रदर्शित करणें माझें कर्तव्य आहे असें मला वाटत असल्यामुळें मी हें पत्र लिहिण्यास धजत आहे. आपले "गृहस्थ" "नागरिकाचें" सहाय्य कोणत्या 'सार्वजनिक' कामांत मागावयास गेले होते ह्याचा खुलासा आपण आपल्या लेखांत केला असतां तर बरें झालें असतें. कारण सदर्हू 'नागरिका' नें 'सार्वजनिक' कामास मदत करण्याचें नाकारल्यामुळें त्याजवर शस्त्र आपण उचललेलें दिसतें, आणि ज्या अर्थीं सदर्हू लेखात आपण आपलीच बाजू आपल्या वाचकापुढें मांडण्याचा एकदेशीय प्रयत्न केला आहे, त्या अर्थीं आपल्या मतास अनुमोदन देण्यापूर्वीं आपल्या वाचकानें आपणांस वर दर्शविल्या प्रमाणें 'सार्वजनिक' कामाचा खुलासा करण्याविषयीं विनंती केली असतां अप्रासंगिक होणार नाहीं.

'दया' हा विकार मनुष्याच्या अन्तःकरणांत वृद्धिंगत करण्याविषयीं आपण जरूर प्रयत्न करावे असें माझें मत आहे. परंतु प्रस्तुत 'नागरिका' चे अंगीं दयेचा पाझर मुळींच नाहीं असें आपलें मत असावेंसें दिसत नाहीं, कारण स्वतः शिवाय दुसऱ्या २५।३० आप्त व इतर मंडळींच्या उदरपोषणाची जबाबदारी आपल्या शिरावर सदर्हू नागरिकानें घेतली असल्याचें आपणच आपल्या लेखांत कबूल केलें आहे. ह्मणून सदर्हू नागरिकाच्या अन्तःकरणांत "दयेला' मुळींच थारा नाहीं असें दिसून येत नाहीं. तेव्हां मला अशी शंका येते कीं, आपल्या गृहस्थास नकार देतानां, 'आपले गृहस्थ' व 'नागरिक' ह्यांजमध्यें सदर्हू कामाच्या 'सार्वजनिकते' बद्दल मतभेद पडला असला पाहिजे आणि ह्मणून 'सार्वजनिक' कामें कोणतीं ह्मणजे त्यांत कोणकोणत्या कामांचा समावेश होतो ह्याचा खुलासा आपण केला असतां तर बरें झालें असतें. कदाचित् ह्या गोष्टीचा खुलासा स्वतंत्र लेखांत करण्याचा आपला विचार असेल परंतु तसें करण्याचें हल्लींच्या लेखांत आपण वचन दिलेलें नाहीं, त्या अर्थीं वरील गोष्टीचा खुलासा करण्या विषयीं विनंती करणें भाग पडलें.

सदर्हू लेख वाचून दुसरा एक विचार मनांत आला तो येथें नमूद करणें अवश्य वाटतें. 'सार्वजनिक' कामाला प्रत्येक नागरिकानें मदत करणें हें त्याचें कर्तव्य आहे, ही गोष्ट जरी खरी आहे, तरी प्रत्येक सार्वजनिक कृत्यास मदत करणें हें आपल्या मतें प्रत्येक नागरिकाचें कर्तव्य आहे कीं काय ? ह्या प्रमाणें "जगाकरितां" प्रत्येक "सार्वजनिक" कृत्यांस मदत करण्या पुरतें पैशाचें पाठबळ नसलें तर त्यांपैकीं जीं कृत्यें आपणास विशेष संमत वाटतील तेवढ्याच कृत्यांस मदत केल्यानें प्रस्तुत "नागरिकास आपण जो दोष लावला आहे तो योग्य होईल काय ? शिवाय अशा प्रसंगीं निरनिराळीं कामें "सार्वजनिक" ह्मणून मदती करितां योग्य आहेत असें ह्मणून त्या त्या कामांतील पुढारी त्या त्या कामाची वडेजाव करूं लागले तर त्यांतून कोणत्या कामास मदत द्यावी ही गोष्ट आपण नागरिकाच्या मर्जीवर सोंपविणार किंवा मदत मागणाऱ्याच्या इच्छेवर सोंपविणार ? मदत मागणारे एकाहून अधिक असले व त्यांपैकीं कित्येकांस नकार मिळाला ह्मणजे ते नागरिकाविषयीं असंतुष्ट होणारच. तेव्हां अशा असंतुष्ट मदत मागणाऱ्यांचा कैवार घेऊन दुसरी बाजू न ऐकतां, प्रस्तुत "नागरिका" वर आपण वाक प्रहार करणें न्याय होईल काय ?

कित्येकदां मनुष्य जें विधान करितो त्याचा अर्थ पुढचा व मागचा संबंध पाहून करावा लागतो. त्याचप्रमाणें प्रस्तुत प्रसंगीं आपल्या गृहस्थानें "मी जगा करितां नाहीं" ह्या वाक्याचा अर्थ केल्या प्रमाणेंच "नागरिकानें केला असेल तर त्यास आपण दिलेलें "विद्वान्" हें उपपद कसें शोभेल? तेव्हां अर्थातच सदर्हू नागरिकानें हें वाक्य कोणत्या तरी इतर अर्थानें योजलें असलें पाहिजे; व तो अर्थ कोणता होय ह्या संबंधानें आपल्या 'गृहस्था 'नें स्वतःची खात्री करून घेऊन त्या प्रमाणेंच आपली खात्री करून दिली असेल तर माझें कांहीं एक ह्मणणें नाहीं. ह्या प्रमाणें आपण आपली खात्री करून घेतली असल्यास सदर्हू 'नागरिका 'च्या वर्तनावर टीका करण्याचा हक्क

आपणांस व आपल्या 'गृहस्था 'स पोहोंचतो ह्या विषयीं शंका नाहीं. परंतु त्या बरोबरच आपल्या "गृहस्था" नें कोणत्या "सार्वजनिक" कृत्यास मदत केली आहे ह्या संबंधानें आपण आपली खात्री करून घेतली असेलच ! माझ्या अनुभवांत "जगा" वर उपकार करूं पहाणाऱ्यांची मजल सुद्धां विवक्षित काळेजांतील, किंवा विवक्षित शाखेंतील लोकांनां मात्र मदत करण्यापलीकडे जात नाहीं. तेव्हां अशा रीतीनें आपल्या उपकाराचें पात्र अकुंचित ठेवून सुद्धां मोठें नांव धारण करणार गृहस्थ आपणांस संमत आहेत काय ? कित्येकदां माझ्या स्नेह्यांनीं मजकडे आपले उपाध्ये लोकांना मदत करण्याकरितां यादी पाठविली आहे. अशा लोकांच्या पात्रापात्रते विषयीं विचार न करितां आपल्या स्नेह्यानें शिफारस केली आहे ह्मणून त्यांनां धर्म केल्यानें मीं सार्वजनिक कृत्यास मदत केली असें होईल काय ? त्याच प्रमाणें एखादा सुसंपन्न व्यापारी मित्र आपल्या उधळेपणाच्या संवयीमुळें, व सव्यांचा व्यापार केल्यामुळें विपन्नावस्थेस पोहोंचला व त्याला सावकारांचें बरेंच कर्ज देणें झालें तर त्याला द्रव्यरूपी मदत करणें हें सार्वजनिक कृत्य होईल काय ? अशी व अन्य तऱ्हेची मदत मागण्याकरितां लोक नेहमीं येतात तेव्हां ह्या सर्वांना मदत करणें माझें कर्तव्य आहे कीं काय असा विचार सहजच मनांत उत्पन्न होतो. त्याच प्रमाणें "जगा करितां मी आहे" असें जर प्रत्येक मनुष्याचें ब्रीद असेल तर परवां ज्वालामुखी पर्वतांतून निघालेल्या आगीच्या लोटानें वेस्ट इंडीझ बेटांतील रहिवाशांचें नुकसान झालें ह्मणून त्यांना मदत करणें माझें कर्तव्य होईल; परंतु अशा प्रकारची जबाबदारी ओळखून ती प्रमाणें वागणारे गृहस्थ विरळाच. तेव्हां अशा प्रकारें सर्व जगाच्या उपयोगीं पडण्या इतकी जर आपली शक्ती नसेल, तर प्रसिद्ध मुत्सद्दी एडमंड बर्क यानें म्हटल्या प्रमाणें उपकाराचें क्षेत्र आपल्या घरापासूनच जास्त जास्त विस्तृत होत गेलें पाहिजे. उलटपक्षीं माझ्या पहाण्यांत असे कांहीं लोक आले आहेत कीं ते स्वतःच्या कुटुंबाची काळजी दुसऱ्यावर सोंपवून आपण मात्र जगाचें कल्याण करण्या विषयीं उत्सुक असतात. ह्या प्रकारचे लोक अर्थातच दोषास पात्र आहेत. तेव्हां जी कांहीं आपली पुंजी शिलक राहील तिचा विनियोग कोणत्या कामाकडे करावा हा मोठाच प्रश्न आहे. कित्येकदां आपण जीं उपकाराचीं कृत्यें करितों त्याची लोकांत टिमकी व्हावी व या योगानें आपली बडेजाव व्हावी अशी आपली इच्छा नसते आणि ह्मणूनच "गुप्त दान महा पुण्य" ही म्हण प्रचारांत आली आहे. तेव्हां सदर्हू "नागरिका" ला दोष देण्यापूर्वीं कोणत्याही सार्वजनिक कृत्यास यानें आजपर्यंत मदत केली नाहीं अशा बद्दल त्याच्या हिशोबाच्या वह्या पाहून आपण किंवा आपल्या "गृहस्था" नें खात्री करून घेतली असल्यास न कळे. माझ्या मतें ह्या संबंधाचें आपलें विधान निरर्थक आहे.

आपल्या लेखांतील शेवटच्या भागांत "लौकिका" करितां "नागरिका" नें मदत करावयास पाहिजे होती असें आपण ह्मटलें आहे. मला आपलें हें विधान संमत नाहीं. "लोक संग्रह" करणें इष्ट आहे असा जरी श्रीकृष्णानीं मुमुक्षूंस उपदेश केला आहे, तरी हल्लींच्या काळांत जेव्हां लोक अज्ञानरूपी अंधकारांत चांचपडत आहेत तेव्हां त्यांचा "संग्रह" करण्या करितां सुशिक्षित मनुष्यानें आपल्या मता विरुद्ध वागावें कीं काय हा मोठा प्रश्न आहे. सुशिक्षित मनुष्याचें कर्तव्य आपल्या देश बांधवास सुशिक्षित करून त्यांना आपल्या योग्यतेस आणणें हे होय. आपलीं मतें दाबून आपल्या अज्ञ बांधवांना खूष करण्या करितां त्यांच्या इच्छेनुरूप वागणाऱ्या पुढाऱ्यांची स्थिति "शिंगें मोडून वासरांत शिरणाऱ्या" बैला प्रमाणें होईल असें मला वाटतें. आपला स्वत्व नाश होऊं न देतां लोकसमाजास सुशिक्षित करणें हें लोकनायकाचें कर्तव्य आहे असें माझें मत आहे; सबब आपल्या विचारसरणींत जो दोष दिसून आला तो उघडपणें आपणांस दाखविल्या वाचून रहावत नाहीं. ह्याबद्दल आपली क्षमा मागतो. पत्रविस्ताराबद्दल माफी असावी.

आकोलें. ता. ९।२।०३ } आपला. साशंक

---

वऱ्हाडसमाचार

मिती माघ शुद्ध १२ शके १८२४

## हाशमशेट धर्मसंस्था

आकोल्यास राजश्री हाशमशेट हे गृहस्थ सुप्रसिद्ध आहेत. हे हल्लीं मुखवस्तु असून जवळ जवळ संन्यस्त व्रतानेंच असतात. हे चांगले श्रीमान असून यांचें वय सुमारें ६७ वर्षांचें आहे. हे मूळचे कच्छ भूजचे राहणारे. तेथून हे चाळीस वर्षांपूर्वीं वऱ्हाडांत आले आणि त्यांनीं आकोल्यास निरनिराळ्या दुकानदाऱ्या केल्या, अफूचा मक्ताही घेतला होता आणि येणेंप्रमाणें चार पैसे संपादून येथें स्थावर जंगम इस्टेट सुमारे पाऊण लाखाची यांनीं कमावली आहे. हल्लीं ते थोडीबहुत सावकारी करितात व जमीनजुमल्याच्या उत्पन्नावर सुखानें कालक्षेप करीत आहेत.

पूर्वीं पासूनच मि. हाशमशेट सालेमहमद यांचीं महत्वाकांक्षा विलक्षण होती. यांनीं जें द्रव्यार्जन केलें आहे त्यापैकीं पुष्कळसा भाग धर्मकार्याकडे लाविला आहे. गेल्या सोमवारीं यांनीं दोन सार्वजनिक संस्था आकोलेंकरांस आपल्या पैशानें करून दिल्या. ह्या दोन संस्था ह्मणजे एक धर्मशाळा व दुसरी लायब्ररी होय. ह्या संस्था येथील ताजना पेठेंतील श्रीकृष्ण रस्त्यावर एका हवाशीर जागेवर आहेत. इमारत दोन मजली असून चांगली सुशोभित केलेली आहे. सर्व प्रकारच्या सोयी केल्या असून खालच्या भागांत धर्मशाळा ठेविली आहे आणि दुसरा मजला लायब्ररीकडे दिला आहे. ह्या इमारतीला ६ हजारापर्यंत खर्च लागला असून ती भक्कम व मजबूत झाली आहे. ही धर्मशाळा फक्त मुसलमान मंडळी साठींच आहे पण लायब्ररी मात्र सर्व लोकांच्या उपयोगासाठीं देण्यांत आली आहे. लायब्ररीचा उपयोग सर्वजणांनीं फुकट करावा, कोणा पासून वर्गणी घेऊं नये असा मि. हाशमसेट यांचा मुख्य उद्देश आहे. लायब्ररीच्या पुस्तक संग्रहासाठीं दोन हजार रुपये वर्गणी शेटजींनीं आगाऊ दिली आहे आणि त्याशिवाय लायब्ररीला सालीना ८०० रुपये अविच्छिन्न येतील इतक्या उत्पन्नाचा जमीनजुमला कायमचा तोडून दिला आहे. या स्तुत्य व औदार्याच्या कृत्याबद्दल आकोल्याची नागरिक मंडळी शेटजींची फारच फार ऋणी आहेत.

'हाशमशेट लायब्ररी' व 'हाशमशेट धर्मशाळा' या दोन्ही संस्थांचा प्रवेशसमारंभ गेल्या सोमवारीं सायंकाळीं झाला. हा समारंभ येथील लोकप्रिय डिपुटी कमिशनर कुमार श्री हरभामजी रावाजी यांच्या यशस्वी हातानें करविण्यात आला. प्रारंभीं मि. बशिरुद्दीन यांनीं मि. हाशमशेट यांच्यासाठीं इंग्रजींत सर्वांचें स्वागत केलें आणि आपल्या दोन्ही संस्था लोकोपयोगासाठीं अर्पण केल्या. हाशमशेट यांचीही फार इच्छा होती आणि यांच्याच हयातींत हा सुसमय आला या बद्दल त्यांनीं खुदाचे आभार मानले. त्या नंतर मि. महमद युसूफ आणि मि. मिरझाआबासबेग यांनीं उर्दूत मि. हाशमशेट यांच्या औदार्याची फार तारीफ केली आणि त्यांचें उदाहरण श्रीमान लोकांनीं डोळ्यापुढें मांडावें असा उपदेश केला.

त्या नंतर कुमार साहेबांनीं आपला आनंद प्रदर्शित केला आणि त्यांस मोठा हर्ष वाटला कीं, आपल्या स्वतांच्या कच्छभूजच्या संस्थानांतून मि० हाशम शेट हे आले असून त्यांनीं असा सुंदर धर्मादाय केला. यांतल्या यांत परम संतोषाची गोष्ट ही कीं, या धर्मालयाचा प्रवेशसमारंभ माझ्या हातून होत आहे. मि० हाशमशेट यांचे सर्वजण धन्यवाद गात असतांना कुमार साहेबांनीं रुपेरी किल्लीनें लायब्ररी व धर्मशाळा खुल्या केल्या. ह्या नंतर पानसुपारी, अत्तर, गुलाब वगैरे होऊन सर्वजणांनीं मि. हाशमशेट यांचा मोठ्या प्रेमळपणानें निरोप घेतला.

आमखाना—मुसलमान मंडळींस गेल्या गुरुवारीं मि. हाशमशेट यांनीं एक मोठा खाना दिला. आणि ही गोष्ट त्यांनीं वरील दोन्ही धर्मालयांच्या संस्मरणार्थ केली. अन्न दाना सारखा दुसरा परोपकार नाहीं आणि हा उपकार ज्या धर्मादायाच्या प्रारंभाला आहे तो धर्मादाय अल्ला सदाच चालवील!

## शेतकरी मंडळीची संस्था

'शेतकरी मंडळी' ह्मणून एक नवी संस्था या जिल्ह्यांत सुरूं करण्याचा प्रयत्न जारीनें चालू आहे. ही संस्था प्रत्येक गांवीं झाली पाहिजे. या संस्थेच्या उत्पादकांचा विचार असा आहे कीं गांवोगांवच्या शेतकरी लोकांची एक सभा स्थापावी आणि तिच्या द्वारानें तिच्या सभासदांस शेतीच्या कामाला मदत मिळावी. प्रत्येक गांवाला एक एक सभा लहान मोठी त्या गांवाच्या मानानें असावी. 'श्री' गांवाची शेतकरी मंडळी, -ग ' गांवाची शेतकरी मंडळी अशी नांवबार मंडळी स्थापण्याचा विचार आहे. या शेतकरी मंडळीमध्यें शेताचे खातेदार व वहितदार यांचा समावेश होत जाईल. अतिशयित कर्जबाजारी, वाईट चालीचे किंवा निव्वळ मजूरदार शेतकरी यांस या सभेचे सभासद होतां येणार नाहीं. सभेचे भांडवल उभारण्याची युक्ति फार नामी काढली आहे. प्रत्येक शेतवाल्याला जशीं सरकारी बलुतें द्यावीं लागतात त्या प्रमाणें त्यानें आपल्या जमिनीच्या मानानें दर एकरा मागें निदान दोन शेर धान्य दिलेंच पाहिजे. हल्लीं सुगीचे दिवस आहेत तेव्हां सभासद मंडळीला धान्य गोळा करण्याची फारशी तसदी पडणार नाहीं. या धान्याचा संचय प्रथम जसाचा तसाच ठेवण्यांत येईल; पण पुढें जशी युक्तायुक्त गोष्ट दिसेल तसा धान्याचा संचय नवाजुना करण्यांत येईल, किंवा जुना धान्य संचय विकून त्याचा पैसा भांडवलाच्या रूपानें जतन केला जाईल सभासदांस योग्य सवड दिसली तर त्यांनीं निराळें रकमेचेंही भांडवल उभें करावें. या धान्याचा व भांडवलाचा उपयोग सभासदां पैकीं जे गरजू शेतवाले त्यांच्याकडे प्रथम करण्यांत येईल. संचित धान्याचें व तसेंच संचित धनाचें कर्ज माफक नफा घेऊन सभासदाला त्यांच्या इस्टेटीच्या मगदुरा प्रमाणें देण्यांत येईल अशा कर्जांतून त्या शेतकऱ्यानें आपलें जुनें कर्ज फेडावें, पाहिजे तर बीबियाणाकडे खर्च करावा, शेतीच्या लागवडाला पैसा लावावा किंवा शेतीला गुरें विकत घ्यावीं. सभासदा पैकीं कोणाला अशा कर्जाची जरूर नसेल तर सभासदाच्या खात्रीवर दुसऱ्याही माणसाला कर्ज देण्यांत येईल. या शेतकरी मंडळीचा सर्व व्यवहार कंपनीच्या व्यापारा प्रमाणें राहिला पाहिजे, आणि हिशोब वगैरे चोख ठेवण्याची विशेष खबरदारी घेण्यांत आली पाहिजे. अशा प्रकारची कांहीं योजना राव साहेब देवराव विनायक यांनीं आपल्या शेतीच्या गांवीं केली आहे. नुकतांच प्रारंभ झाला आहे तरी त्यास बळकट आशा आहे कीं, या 'शेतकरी मंडळीच्या संस्थेला चांगलें यश लवकरच येईल. या संबंधानें त्यांनीं नियम वगैरे केले आहेत. ते नियम आह्मी पुढील एखाद्या अंकीं सविस्तर प्रसिद्ध करूं.

शेतकऱ्यांची पेढी पाहिजे ह्मणून पुष्कळ वर्षांची ओरड आहे. ही उणीव दूर करण्या साठीं ही 'शेतकरी मंडळी' काढण्यांत येणार आहे. कांहीं कालानें प्रत्येक गांवीं अशी एक एक उत्कृष्ट पेढी चालेल. या मंडळीला जसें स्थैर्य व बळकटी येईल [illegible]

प्रत्येक गांवाच्या मंडळीला योग्य ती मदत सरकारसपाशीं मागण्यांत येईल. गांवोगांव अशा संस्था उत्पन्न झाल्या ह्मणजे प्रत्येक गांवासंबंधानें कांहीं विचार कर्तव्य झाला तर तो या 'शेतकरी मंडळी'च्या द्वारानें होईल. अशी जूट प्रत्येक गांवीं होत जाईल तर वाटेल ती हितकारक गोष्ट तत्काळ घडून येईल. गांवाची संघशक्ति मोठी आहे आणि तिचा उपयोग करावा असा कुमारश्री हरभामजी रावाजी यांचा पक्का संकल्प आहे. ते आपली पराकाष्ठा करून लोकांस विनवितात कीं या धान्यसंचयाच्या व धनसंचयाच्या द्वारानें सर्वांनीं पुष्कळसें मांडवल उभारावें, प्रत्येक गांवचा स्वतंत्र संघ करावा आणि अशा संघाचें पुढारीपण शिकलेल्या लोकांनीं परोपकारबुद्धीनें घ्यावें. साहेब बहादुरांस उमेद आहे कीं, शिष्ट शिष्ट लोक कंबर बांधतील तर या 'शेतकरी मंडळी'ला अद्भुत शक्ति येईल आणि शेतकऱ्यांची पेढी चालेल इतकेंच नाहीं तर या गांवोगांवच्या शेतकऱ्यांच्या मंडळ्या ह्मणजे औद्योगिक मंडळींच्या उपशाखाच किंवा उत्कृष्ट साधनेंच बनतील. लोकांनीं प्रयत्न करावा, प्रत्येक गांवची एक संस्था उभारावी, आणि आपली संघशक्ति सरकारला दाखवावी ह्मणजे सरकार आपोआप आपला उदार हस्त पुढें करून शेतकरी वर्गाच्या अडचणी दूर करण्याला प्रवृत्त होईल. ही शेतकरी मंडळी ह्मणजे परस्पर साह्यकर्त्री मंडळी होऊन शिवाय सरकारी दरबाराची कडी ठोठाणारी जबरदस्त मंडळी होईल. ईश्वर करो आणि या नव्या कल्पनेची नीट उभारणी होवो!

---

## औषधोपचार

प्लेगाचें ठाणें आकोल्यास पक्कें बसत चाललें आहे. पूर्वी येथील व बाहेरून आलेले मिळून ११ लोक मेले होते; परंतु आतां चार दिवसांत येथील मंगळवाऱ्यांतील भागांत पांच सहा माणसें प्लेगानें मृत झालीं. या वरून या रोगाची वृद्धि दिसते आणि बाहेरून आलेलाच माणूस मेला असें ह्मणतां ह्मणतां आकोल्यांतच रोगाचें बीज पसरत चाललें आहे. आकोल्याचे अधिकारी डाक्टर रेली साहेब अतोनात झटत आहेत आणि कुमार श्री हरभामजी साहेबहि डाक्टर साहेबांच्या ह्मणण्या प्रमाणें सर्व गोष्टी घडवून आणीत आहेत. माणसाचे प्रयत्न चालू आहेत ईश्वरानेंच यश द्यावें. येथील प्लेगाची व्यवस्था नीट आहे पण उत्तरोत्तर संकटें वाढतात त्या मानानें सर्व साधनांची विपुलता बरीशी नाहीं. पैशाच्या कमताईमुळें चांगला सा बंदोबस्त नाहीं आणि प्लेगाच्या झोंपडींत नेलेल्या इसमांस औषधोपचार व त्याच्या खाण्यापिण्याच्या सोयी पाहिजेत तितक्या पुरेशा नसतात. ही उणीव लवकर दूर झाली पाहिजे. खामगांवाला हा रोग अगदीं शमला आहे, शेगांवाला त्याचें पाऊल मागेंच आहे. बाळापुरास किल्ल्याच्या भागाला प्लेग सुरूं झाला आहे तथापि एकंदर मृत्यूचें प्रमाण कमी कमी होत आहे ही आनंदाची गोष्ट होय. अशा या प्लेगाच्या झपाट्यांत बाळापुरास कांहीं मोठ्या इमारती आगीनें जळाल्या. आग कशी लागली हें समजत नाहीं पण या आगीनें या भागाची शुद्धी होऊन प्लेग नाहींसा होईल असा भरंवसा आहे.

प्लेग हा रामबाण मृत्यु खरा. तथापि त्यावर कांहीं उपाय करून पाहणें हें मनुष्याचें काम आहे त्यावर औषधी इंग्रजी द्या, वा मराठी द्या, तिचें मुख्य धोरण असें असावें कीं शरीराला वाफारा मिळून रोमरंध्रें खुलीं व्हावींत शौचासाठीं सौम्य ढाळकही दिलें पाहिजे. गांठ फुटेल असा उपाय ह्मणजे गळूं पिकविणारीं पोटिसें लावावीं. रोग्याला जडान्न खाण्याला देऊं नये, होतां होईल तो दूध, चहा इत्यादि पेयेंच फक्त द्यावींत. यांत कसर करू नये, या चारही उपायांची योजना एक सारखी चालूं ठेवावी ह्मणजे रोगी पुष्कळदांच बरे होतात. हे उपाय वैद्यशास्त्र जाणणाऱ्याकडून करवावेत पण मुख्य गोष्ट ही कीं, हे चारहि उपाय एकदम चालूं ठेविले पाहिजेत.

या रोगाला प्रतिबंधक उपाय ह्मटला ह्मणजे स्थानत्याग होय, रोग जेथें होतो तें स्थान सोडलें आणि इतरत्र रोग्याची शुश्रूषा केली तर संसर्गाचा दोष लागत नाहीं, असें पुष्कळ डाक्टराचें मत आहे. स्थलान्तर अवश्य करावें. या पासून फायदा झाल्या खेरीज राहणार नाहीं.

---

# The Berar Samachar

---

MONDAY FEBRUARY 9 1903

The satisfactory record of the Revenue administration for the year 1901—02 is a pleasant reading. It is perhaps the last annual report from the pen of Mr. A. Elliott the officiating Commissioner. It is rumoured that he is going on a long leave preparatory to his final retirement Besides there is the probable transfer of this province to either the Bombay presidency or the Central provinces. If the event happens at an early period, there will then be no separate report on the revenue administration of this province. The whole report is full of facts condensed in a systematic manner. The old arrangements of the report still continue, but Mr. Elliott has done to them the full justice in so far as he has collated the different statistics in a brief though prosaic manner. Mr. Elliott does not like to write explanatory notes and suggestive remarks. He restricts himself to some trite remarks about the recovery of the people from the effects of the famine or some such similar observations. Thus he leaves his facts and figures to tell their own tale.

From a perusal of the report one is inclined to notice at first the probable remissions of some of the arrears of the land—revenue in the Buldana district. The land—revenue in arrears on 31st July 1901, amounted to Rs. 3,85,973—As. 7—Pies. 3. These arrears are due on account of the famine year. Of this amount a sum of a little above than 2 lacs and a half was realized in the financial year of the report and about twenty thousand Rupees were remitted. About a lac of rupees is still over—due but it is presumed that a sum of 85 thousand and some odd rupees is not likely to be recovered.

Mr. Rustomji Faridoonji, the able and popular Deputy Commissioner of the Buldana District has persuaded the higher authorities to allow a remission of nearly 85 thousand rupees because of the peculiar and distressed condition of the people in his district and because of their utter inability of pay off the dues of the land—revenue. This is, no doubt, a large sum which Mr. Rustomji recommends to be remitted. But he has made out a case of the real condition of the people and it is a great compliment to his sympathetic administration that Mr. Elliott supports his views and deplores with him the succcessive failures of the Rabi crops in the Buldana district. We are obliged to the Resident for approving his recommendation about the remission of land revenue. We congratulate Mr. Rustomji on the success of his proposal and would like to see other Deputy Commissioners profit by his example and represent with the moral boldness of their convictions the real grievances of the people to their superiors. We presume that the state of the Buldana district was similar to that of the many portions in other districts. But the fact is that one Deputy Commissioner takes so much pain on account of his people while others let the things go on and on as they will. It hardly happens that the Government sanctions a partial remission of their land—revenue. The bad harvests and the total failures of crops fall to the lot of the occupiers of fields whereas the Government are perfectly free from them and realize their revenue to almost the last pie. It is a question whether the Government have made any serious inquiries about the failures of crops in 1901—02 in particular portions of different districts. There seems to have been not the slightest attempt in that direction. The land—revenue demand for 1901—02 amounted to Rs. 77,46,136—9—9. Out of this amount 99.7 per cent were realized towards the close of July last. Besides it is not likely that with the easy collection of the land—revenue the Government will see any reason to doubt the growing *prosperity* of the people. We may observe here that there prevails an impression that a default in paying the land—tax will more or less make a holder of the land liable to lose his field. In the face of the improved methods of coercing people to pay land—revenue and the large demand for fields put to sale, by auction, it is likely that there will be no delay in the payment of the land—tax.

In this connection we note with regret the rapid transfers of agricultural holdings into the hands of the non—agriculturists. This fact will point to the extreme poverty of the agriculturists and to the fact that the better classes of people are driving the cultivators away from their ownership of the fields. The large class of agriculturists is now fast dwindling into a class of labourers on the field—work. This aspect of life is most subversive of hope that the new changes of administration will bring us some prospect of a better and prosperous day.

---

## वऱ्हाडवृत्त

मि. ए. डी. बार साहेब असिस्टंट कमिशनर यांस जस्टिस आफ् दी पीसचा अधिकार देण्यांत आला.

१६ मार्च तारखे पासून लोअर हायरच्या परीक्षेला जाणाऱ्या आफिसरांची परीक्षा उमरावतीस घेण्यांत येईल.

मि. करी साहेब असिस्टंट कमिशनर हे रजेवरून परत आकोल्यास लवकरच दाखल होतील.

आणि त्यांच्या येण्यामुळें हल्लींचे आफिशिएटिंग एक्स्ट्रा असिस्टंट रा० रा० रामराव बापूजी पतकी हे पुन्हां तहशिलदार होतील आणि त्यांची बदली पांढरकवड्याच्या तहशिलीवर झाल्यामुळें ते तिकडे जातील.

आणि तेथील रा. रा. बळवंत यादव खोलकुटे बी.ए. तहशिलदार हे दीड महिन्यांच्या रजेवर गेल्या कारणामुळें त्या रजेंत हल्लीं आफिशिएटिंग काम करणारे रा० रा० दवलत झाबाजी देशमुख हे तेथेंच पुनः नायब तहशिलदारच राहातील.

प्लेगाचे मृत्यु—१९०२ च्या डिसेंबर २० तारखेपर्यंत सरासरी अकरा महिन्यांत खालील प्रमाणें मृत्यु झाले:—

| जिल्हा | मृत्यु |
|---|---|
| आकोला | १३८९ |
| बुलढाणा | २२४८ |
| उमरावती | २४ |
| वणी | ३ |
| | ३६६० |

आणि त्या नंतरच्या गेल्या तीन आठवड्यांची बेरीज येणें प्रमाणें.

| जिल्हा | मृत्यु |
|---|---|
| आकोला | ४२६ |
| बुलढाणा | ३९९ |
| उमरावती | २९ |
| | ८९४ |

या आंकड्यावरून प्रस्तुतच्या वाढत्या प्रम[illegible] रो[illegible] आ[illegible]

माण[illegible]

---

[illegible]

हलगर्जीपणा- बेळगांवास एक तीन वर्षांची मुलगी घरच्या माणसांच्या हलगर्जीपणानें अंथरुणात गुंडाळली गेली, आणि गुदमरून बिचारी मरण पावली !

१ मिनिटांत २०० शब्द— मार्कोनीची तारांशिवाय बातमी पाठविण्याची संदेशपद्धति फारच यशस्वी होत आहे. एका मिनिटांत २०० शब्द घेतां येतील अशी यांची उमेद असून हल्लीं ते प्रयत्न पहात आहेत.

कीटक औषधी—न्यूइंग्लंडमध्यें कोळ्याच्या जाळ्याच्या गोळ्या करून हिंवतापावर देतात. चिनई लोक निरनिराळ्या आजारावर निरनिराळ्या किड्यांचा उपयोग करितात. काड लिव्हिर याच तऱ्हेचें नव्हे काय !

शिक्का मारण्याचें विजेचें यंत्र- पोस्टाचा शिक्का मारण्याचें अमेरिकेंत विजेचें यंत्र निघालें आहे. याच्या सहायानें एका तासांत ६०००० पत्रांवर छाप मारतां येतो.

रशियांतील कायदा.—स्त्रियांनीं शेतकीचें काम शिकलेंच पाहिजे असा रशियांत कायदा आहे. व तेथें याकरितां एक कॉलेज निघणार आहे.

दुधाची पूड—गोटनबर्ग येथील डाक्टरानें दुधाची पूड तयार करण्याची युक्ती काढिली आहे.

नवीन कालवा—भूमध्य समुद्र आणि बिस्केचा उपसागर यांच्यामध्यें एक कालवा खणून दोन्ही समुद्र एकमेकाला जोडावे असा फ्रांसचा विचार आहे. हा कालवा सुमारें ३०० मैल लांबीचा व मोठमोठ्या बोटी जाण्या इतका रुंद होणार असून यास ८० कोटी फ्रँक खर्च लागेल असा अदमास आहे. अटलांटिक महासागरांतून भूमध्य समुद्रांत जाण्याला १२०० मैल हल्लीं जावें लागतें त्यापेक्षां हा ३०० मैलांचा कालवा फार फायदेशीर होणार आहे. हा कालवा झाला तर यांतून बोटी जाण्याला हल्लींपेक्षां ६७ तास कमी लागतील व कोळशांचाही खर्च कमी लागेल असें ह्मणतात.

[illegible]ची साखर— मध्यहिंदुस्थानला [illegible] आपो- [illegible] फळांची [illegible] लवकरच [illegible] दुसरा [illegible] काढिला [illegible] आणखी [illegible] ते साख- [illegible] येईल [illegible]

[illegible]

[illegible] होतें, [illegible] तेथें [illegible] आहों [illegible], एक- [illegible] त्यास [illegible]

[illegible] राजवाड्या [illegible] देवळापर्यंत

दोन्ही बाजूंनीं अत्तरांचे दिवे लावीत असत. या दोन्ही ठिकाणांतील अंतर २-२॥ मैल आहे.

राजानवळ पांढरा हत्ती असे. त्यास कधीं गवत खाणेस देत नसत. तो नेहमीं, केळीं, खोबरें व परदेशांतून आलेलीं उंचीं फळें यांजवर पाळलेला होता. याचीं पाणी पिण्याचीं भांडीं सोन्याचीं असत.

राजवाड्यांत राजाचा पलंग सोन्याचा रत्नजडित असे, आणि इतर सर्व भांडीं सोन्याशिवाय इतर धातूचीं कधींही नसत. राजवाडा आंतून सुवर्ण वर्खानें मढविलेला असे, आणि हल्लीं मंडालेंत असलेला राजवाडा, सुवर्णवलयांकितच आहे.

राजाची स्वारी बाहेर फिरणेस निघाली कीं, पुढें चांदीचे नाण्यांनें भरलेल्या गाड्या असत आणि यांतील लोक एकसारखे दोन्ही बाजूंस नाणीं उधळीत असत. अशीं आणखी लाखों उदाहरणें यांचे उदारपणाबद्दल तेथील लोक सांगतात.

नवें पिस्तुल— एका जपानी लष्करी अधिकाऱ्यानें एक नव्या प्रकारचें व थोड्या किंमतीचें पिस्तुल बनविलें आहे, त्यांतून बऱ्याच अंतरावर ८० गोळ्या नेम धरून मारतां येतात असें कळतें.

खरे खादाड—अमेरिकनांचे अंगीं कला कौशल्य आहे, त्याच प्रमाणे ते इमामदांडगे आहेत. चार्लस ओव्या आणि प्याट्रीक डायव्हर यांची मांस खाण्याबद्दल पैज लागली. तेव्हां एका बैठकीला सात पौंड मांस चार्लस ओव्या यानें गट्ट केलें. हें कांहींच नव्हे, प्याट्रीक हा आजारी असल्यामुळें या खेपेला हरला. मागच्या एका पैजेंत या राक्षसानें एका बैठकीला चौदा पौंड—ह्मणजे पक्के २८ शेर मांस गट्ट केलें होतें.

मार्मिक अर्थ— निजामसाहेबांनीं आधीं वऱ्हाड प्रांत देऊन नंतर दिल्लीस जाऊन G. C. B. ( जी. सी. बी. ) पदवी मिळविली, हें हैद्राबादेच्या उर्दूपत्रांस मुळींस पसंत नाहीं G. C. B. या पदवीचा अर्थ Gave Curzon Berar ( गेव्ह, कर्झन, बेरार कर्झन साहेबांस वऱ्हाड देणारे ) असा तेथील मुखबीर डेकन या उर्दू पत्रानें केला आहे हा अर्थ मनांतील हजारों गोष्टीचे बद्दल बाहेर फोडीत आहे.

अद्भुत फूल—गया येथील राव बैजनाथसिंग बहादर यांच्या बागेंत एक अद्भुत फुलझाड आहे. या फुलास पतंगा सारखे काळे टिपकें असलेल्या अशा दोनच पाकळ्या आहेत, व त्या सदा हालत असल्या सारख्या दिसतात. या दोन पानांच्यामध्यें हुबेहूब सापाच्या डोक्याच्या आकारासारखा देठ आहे. या देठाची बरीच आकृती सर्पाच्या आकृतीशी जमते. फुलास वास फुलकोबीसारखा येतो.

आख्यायिका—त्रिविक्रम स्वामी हे अवतारी पुरुष श्रीरामतीर्थी होऊन गेले. यांनीं समाधी घेऊन आजला ३०१३९ वर्षे होत आलीं. स्वामींनीं समाध घेतल्या नंतर एक महिन्यानें समाधीचा एक धोंडा काढून पाहिलें असतां स्वामींची मूर्ती नशीच्या तशीच ताज्या पुष्पांनीं पूजित असलेली दृष्टीस पडली हें प्रत्यक्ष पाहिलेले हल्लीं कांहीं वृद्ध लोक आहेत. पुन्हां असाच चमत्कार दिसेल काय !

चिकटलेलीं तिकिटें सोडविणेची युक्ती— तिकिटें अगदीं थोडा वेळ-पांच सहा सेकंद--पाण्यांत बुचकळून काढावी, मग त्यांजवर फाजील पाणी असेल तें झाडून टाकावें, व नंतर तीं तिकटें चेतवलेल्या काडीवर न जळतील अशीं धरून ऊन करावी. ह्मणजे दोन तिकिटांच्या दरम्यान जें पाणी गेलेलें असतें तें तापून विस्तृत होऊन तिकिटें आपोआप सुटतात. आपण थोडी ओढलीं ह्मणजे झालें. त्यांचा गोंद मात्र निघून जात नाहीं.

बेडकांचें कातडें—बेडकांच्या चामडीचा उपयोग पुस्तकें बांधण्याचे कामीं फार चांगला होतो असें ह्मणतात. हें चामडें अति नरम असतें व त्यावर पाहिजे तो रंग फार लवकर व चांगला चढतो. मोरोक्कोच्या चामड्या ऐवजीं पुस्तकांच्या पाठीस पुष्कळ ठिकाणीं बेडकाच्या चामड्याचा उपयोग करूं लागले आहेत व ते मोरोक्कोपेक्षां विशेष खुमासदार दिसत आहे.

हा माल इंग्लंडांत व अमेरिकेंत पुष्कळ खपत असल्यामुळें हिंदुस्थानांत कोणी तरी बेडूक मारण्याचा कारखाना काढावा असें एकजण सुचवितात ! डाक्याच्या मलमलीचा कारखाना ठार झाला; आतां बेडकांची कातडी इंग्रज कारखानदास पुरविण्याची लायकी आह्मास हे साहेब लेखक सांगत आहेत!

दुधाचें झाड— ब्राझीलच्या अरण्यांत कांहीं झाडें आहेत. त्यापासून गाईच्या दुधा सारखा एक पदार्थ निघतो. तो फार पुष्टीदायक असतो, व त्यापासून सायही निघते.

पुरुष वेषधारी स्त्री— मेरिजस नांवचा एक मनुष्य पारीस येथील वर्तमानपत्रकारांच्या आफिसांत होता. तो एकाएकी मेला ह्मणून तपासतां तो स्त्री आहे असें आढळून आलें. याचें वय ६२ वर्षांचें होतें व जन्मापासून या बाईनें पुरुषाचा वेष घेतला होता व तो शेवटपर्यंत कोणासही कळला नाहीं. अशा वेषाचें काय कारण असेल बरें।

नवीन औषधी—क्षयरोग्याच्या धमनींतून सिनामेट आफ् सोडा हें द्रव्य घातलें असतां तो रोगी पुष्कळ थकला असला तरी बरा होतो असा अनुभव आला आहे ह्मणतात.

भिकारी- रावसाहिब, मला कांहीं द्याहो, एक पैसा तरी द्या, मी फार फार गरीब आहे.

रावसा०— एक पैसा याच्या हातावर ठेवून ह्मणतात- अरे, तूं गरीब कशानें झालास!

भिकारी- महाराज, आपल्या सारखाच मी धर्म करीत गेलों ह्मणून.

सिंहाच्या पिंजऱ्यांत फूट बाल— बुडापेस्ट शहरीं दोन गृहस्थानीं चार सिंहांच्या एका मोठ्या पिंजऱ्यांत एक घटकाभर फूट बालचा खेळ केला. ते सिंह मोठ्या ऐटीनें तो खेळ पहात होते. सर्वांस फारच आश्चर्य वाटलें.

अतिविस्तीर्ण राजवाडा- स्पेनदेशांत एक १२० मैल परिघाचा राजवाडा आहे तो सर्व वाडा आंतील खोल्या भाग वगैरे हिंडून पाहण्यास चार दिवस लागतात.

ग्यासाचा प्रदीप्तपणा- जर्मनी देशांत सिग्नलकरितां असेटिलिन नामक ग्यास वापरतात. ह्या ग्यासात आक्सिजन मिसळला असतां त्या दिव्याचा उजेड पाहिल्याच्या तिप्पट जास्त पडतो. ह्या उजेडानें दिवसा पांच मैल आणि रात्रीं १९ मैलांवरील गाडी वगैरे दिसते.

कापूर मिसळला असतां फुलांचा टवटवीतपणा अमळ जास्त वेळ टिकतो असा अनुभव आहे.

तीन नव्या प्रयोगाबद्दल खटपट- हल्लीं तीन नवे शोध चालू आहेत असें पॅरिस व अमेरिकेंतून आलेले बातम्यावरून कळतें. फ्रान्समध्यें शिजविण्याचे कामीं गॅसचा उपयोग करतां येण्याइतका स्वस्त गॅस कसा करतां येईल याचे प्रयोग चालले आहेत

दुसरा प्रयोग- अमेरिकेंत चालू असून हवेंत पंखांशिवाय पतंगा प्रमाणें उडतां येणें यंत्राचे साान्निध्यानें शक्य आहे, असें ठरविण्यास एक विद्वान लागले असून यंत्रें जोडून पतंग आकाशांत झोकूं लागले आहेत!

तिसरा प्रयोग- मि. आलफ्रेड व्हिटनें हे चिकागोस करीत असून त्यांचे मतें आकाशात १९० मैल उंचीवर वीज आहे व ती फुकटांत भूमीवर आणण्याचा त्यांचा विचार आहे.

युरोपिनांची भूतदया.

महिना दोन महिने सुमारें ६० घोड्यांस उत्तम प्रकारचें पौष्टिक गवत व दाणावैरण देऊन तयार करून व शेवटीं यांस मारून यांचे ६०० पौन्ड मासावर बर्लिनच्या 'पशुक्लेशनिवारणी' सभेच्या ६०० सभासदांनीं ता० ८ जानेवारी रोजीं ताव मारला घोड्यांच्या मालकांनीं घोडे ह्मातारे झाले ह्मणजे त्यांजकडून काम करून घेण्याचा क्रूरपणा न करतां त्यास पुष्ट करून व नंतर त्यास ठार मारून यांचें मास खावें हें बरें असें एक सभासद बोलला! १९०१ सालांत बर्लिनमध्यें १०००० घोड्याचें मास खाण्यात आलें व ही संख्या लवकरच दसपट होईल! अशी एका सभासदानें आशा प्रगट केली.

खोंच अशी आहे काय!- विचार केलाच पाहिजे. आपला वरिष्ठ कोणीही असो, त्याच्या चरणरजी सत्य, स्वाभिमान वगैरे गुणांची (!) होळी केली, त्या वरिष्ठाचा कल हाच कायदा, खुषी हाच स्वाभिमान, मर्जी हीच वागण्याची पद्धत असें वागलें तरच नोकरीवर पोटाची खळगी भरण्याची आशा करावी. वरिष्ठाच्या नाराजीपुढें योग्य नजरा आंधळा होतात, न्यायाचीं कोर्टें यंत्रें बनतात, पुरावा स्वयंभु रूप धरून उत्पन्न होतो, व पंचमतें सुद्धां प्रतिकूल होतात.

पोलिस व फौजदारी कोर्टें ह्मणजे लोकांच्या सौख्याचे आधार, परंतु तींच कधीं कधीं लोकांचीं नुकसान करण्याचीं कायदेशीर यंत्रें बनतात. महामाये प्रमाणें पोलिसाची शक्ति अपूर्व आहे, सृष्टिनियमा प्रमाणें कोर्टयंत्रांची गति निश्चित आहे, आणि दैवाच्या गतीप्रमाणें माजिस्त्रेटांच्या–विशेषतः हां हुजर नेटिव्ह माजिस्त्रेटांच्या– नजरा अतर्क्य आहेत. व या तिघांचीही प्रगति चोहोंकडे झपाट्यानें होत आहे.


## जाहिरात

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं, आठवडे बाजारचा कर वसूल करण्याचे, कमेटीचे हद्दींतील कचरा वाहून नेण्याचे, व दोन्ही स्लाटर हाऊसीसचे कर वसूल करण्याचे, सन १९०३–१९०४ सालचे हक्कांचा लिलाव ता. १६ फेब्रुआरी १९०३ रोजीं सकळीं आठ वाजतां टौनहालांत केला जाणार आहे. ज्यांस घेण्याची इच्छा असेल त्यांनी सदर्हू तारखेस सदर्हू वेळीं टौनहालांत हजर व्हावें. कळावें ता० १७ जानुआरी १९०३ इसवी.

V. A. Kane.
सेक्रेटरी म्युनसिपाल कमिटी
आकोला.

विक्रीसतयार.
सोहोनीकृत भरपूर टिपांसहित मराठी

## कायद्याचीं पुस्तकें

सिव्हिल प्रोसिजर कोड–आवृत्ती दुसरी, पानें अदमासें ९०० निवाड्याची संख्या ६००० किंमत अति स्वस्त केली आहे. व्ही. पी. सुद्धा रु. ३

क्रिमिनल प्रोसिजर कोड – ( सन १८९८ चा आक्ट ५ वा, १८९९ चा आक्ट १२ वा यानें सुधारल्या प्रमाणें ) किंमत ५ रुपये व टपालखर्च ०१० आणे.

क्रिमिनल प्रोसिजर कोड — जुना आक्ट ( सन १८८२ चा १० वा ) किंमत ५ रुपये व टपाल खर्च ०१० आणे.

जुनें नवें क्रिमिनल प्रोसिजर कोड एकत्र बांधविलेलें घेतल्यास वरील दोन्ही पुस्तकांची किंमत टपाल खर्चासुद्धां ८४.

दिवाणी आक्टसंग्रह– ( यांत दिवाणी कामास लागणारे सर्व आक्ट आहेत, पानें अदमासें ५०० ) किंमत टपाल खर्चा सुद्धां २८

म्यानेजर, डेक्कनबुक एजन्सी,
सदाशिवपेठ, पूना सिटी.
नारो अपाजी गोडबोले
बुकसेलर बुधवार पेठ.

## जाहिरात

गीताभाष्य. पूर्ण तयार, मराठी भाषांतर व विस्तृत स्पष्टीकरण यांसह. पाडव्यापर्यंतच किंमत रुपये १०

श्रीमच्छंकराचार्यांचें शारीरभाष्य. मराठी भाषांतर व विवेचन यांसह. मार्चपासून. मासिक पु. द्वारें निघेल. गीताभाष्यापेक्षां तिप्पट. ३ वर्षांत संपेल. वर्षाची अ. व. ५०६ पहिल्या २०० ग्राहकांस बालकांड व योगवासिष्ठवैराग्यप्रकरण हे ३ रु. किंमतीचे उत्कृष्ट ग्रंथ.स. भा. सह बक्षिस.

का० वा० लेले वाई.

Kadi हें काय आहे ?

डाक्टर डी. एम. दस्तुर यांनीं तयार केलेली दमा व खोकला या वरील रामबाण औषधी.

दमा आणि खालील सर्व रोगांवर तात्कालिक व गुणकारक उपाय हाच आहे. जेथें डाक्तरांचा व इतरांचा कोणाचाही उपाय चालत नाहीं तेथें हें फार उपयोगी पडतें. याच्या गुणाबद्दल हिंदुस्थान, इंग्लंड व अमेरिका येथील रोगग्रस्तांचे व डाक्तरांचे शेंकडों चांगले अभिप्राय आहेत. कितीही जुनाट दमा, फार दिवसांचा खोकला, घशांत घरघर अवाज होणें, वारंवार सरदी व पडसें होणें, व ताप येणे, ससनी, ब्रान्कायटीस इनफ्ल्युएन्झा इत्यादि रोगांवर हें फार उपयोगी आहे. बाटलीची किंमत सारा १॥ रुपया आहे. परंतु हें रोग्यांस एक हजार रुपयांच्या किमतीचें वाटतें.

पत्ता--मेसर्स पेस्तनजी आणि सन दुकान आकोला.

## मुंबई बॅंकची ठेव ठेवण्याची बॅंक

या सेव्हिंग बॅंक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल:—

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारी च्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपयापर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक
आकोला १।७।०२ } J. Kinniburgh
एजंट

## दन्तकुसुमाकर

खालीं लिहिलेल्यां दताच्या आजारा वर आणि इतर हरएक प्रकारच्या दाताच्या बिमारीवर हें औषध एक रामबाण मात्राच आहे.

काम अक्सीर का दतो मे दिखाते है हम ।
चोट डंके की हरेक मर्ज उडाते हम ॥

मोठी डबी.... १ रु.
लहान ,, .... ·॥·




देखना चाहिये क्या मुश्क कदर करती हे ।
ढूंढते फिरते हरेक सिम्त कदरदां हैं हम ॥

दांतावर जाळें जमणें, ते पिवळे होणें, हिरड्या दुखणें, दांत आंबणें, हलूं लागणें, कमजोर होणें, भेगा पडणें, किडे पडणें, वांकडें तिकडे होणें, नेहमीं खपल्या पडणें कठीण वस्तु दातांनीं फोडतां न येणें, दांत मळकट घाणेरडे राहणें, त्यांतून रक्त वाहणें किंवा दुःख होणें इत्यादि सर्व प्रकारचीं दुखणीं नाहीं-शीं होतात, प्रत्येक दिवशीं याचा उपयोग केल्यानें वर लिहिलेले कोणत्याही प्रकारचे रोग या पासून राहणार नाहींत. निरंतर दांत स्वच्छ आणि चकचकीत राहतात. कोणत्याही प्रकारची बिमारी न होतां तोंड स्वादिष्ट व सुवासिक राहतें.

एजंट—कृष्णाजी गणेश पटवर्धन आफ मेसर्स भास्कर कृष्ण जनरल मर्चंटस्
आकोला.

पत्ता— नंदलाल वर्मा
म्यानेजर फ्रेण्ड अँण्ड कंम्पनी मथुरा.

K. N. ESMAYAL & Co.

यांची अनेक रोगांवरील जगप्रसिद्ध ३७ प्रकारची औषधीं विक्रीस तयार आहे. कार्डांत पत्ता लिहून कळवा ह्मणजे क्याटलाग फुकट पाठवूं.

पत्ता— खोजानुरा इस्मायल आणि कंपनी. जी. बी.
वर्धा. सी. पी.

### मासिक सुबोध इंदु.

उत्कृष्ट नाव्हेल्स, सं० नाटकें तऱ्हेवाईक विषयांसह येत्या मार्चात निघेल.

नांवें नोंदण्यास लिहा. वि० मा० पत्र मागवा. वर्षाची वर्गणी ट० हं० सह आगाऊ १।.

पत्ता– के. डी. फोटो आर्टिस्ट
वर्धा सी. पी.


## NOTICE

Under rule 12 of the Municipal Election rules, it is hereby published for general information that the election to fill up the vacancies caused by the retirement of the members in the Akola Municipal Committee under operation of rule 31 of the said rules, will take place, from 7 A. M. to 5 P. M. on the 26th, 27th and 28th February 1903. The following table gives for each ward the name of the out—going members, the date, and place of election, the name of the Polling Officer and the dates before which nomination papers under rule 13 of the Municipal Rules shall have to be delivered to this Polling Officer.

Dated Akola
6th February
1903 } V. A. Kane
Secretary
Municipal Committee
*Akola.*

| Ward | Names of out-going members | Date of election | Place of election | Name of the Polling Officer | Dates before which nomination papers should be delivered | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|
| I | Mr. Laxman Govind Oka.<br>,, Mirza Alibaeg. | 26th. February 1903 | Patel's Chowri | C. H. Price Esq.<br>Extra Assistant<br>Commissioner | 19th. February 1903 | |
| II | ,, Amankhan.<br>,, Laxminarayan.<br>,, Umarkhan Lalkhan. | 27th. February 1903 | Grain Market Office | | 20th. February 1903 | |
| III | ,, R. V. Mahajani. | 28th. February 1903 | Town Hall | | 21th. February 1903 | |

Dated Akola
6th. February 1903

V. A. Kane
Secretary
Municipal Committee Akola

## जाहिरात

मुनिसिपाल निवडणुकीचे नियमांतील नियम १२ अन्वयें जाहीर करण्यांत येतें कीं अकोले मुनसिपाल कमिटीतील ज्या मेंबरांच्या जागा सदहु नियमा प्रमाणें नियम १३ अन्वयेंच्या खालीं होतील त्या भरण्याकारितां ता. २६।२७।२८ माहे फेब्रुवारी सन १९०३ इसवी. रोजीं सकाळचे ७ वाजल्या पासून सायंकाळचे ६ वाजे पावेतों निवडणूक होणार आहे, खालीं लिहिलेल्या तक्त्यांत वार्डांपैकीं मेंबर निघाले यांची नांवें, त्या वार्डी करितां होणारे निवडणुकीची, तारीख, जागा, पोलींग आफिसरचे नांव, उमेदवार यानीं कोणत्या तारखे पर्यंत पोलिंग आफिसरकडे मुनिसिपाल नियम १३ अन्वयें आपले अर्ज द्यावेत वगैरे माहिती दिली आहे. ता० ६।२।१९०३ इ०

Akola 6-2-1903 } V. A. Kane Secretary Municipal C. Akola.


| वार्ड नं. | निघणार मेंबरांची नांवें. | निवडणुकीची तारीख. | निवडणुकीची जागा. | पोलींग आफिसरचें नांव. | उमेदवारांनीं कोणत्या तारखेचे आंत नांवचं कागद द्यावयाचे. |
|---|---|---|---|---|---|
| १ | मि० लक्ष्मण गोविंद ओक. मि० मिरझा अब्बासबेग. | २६-२-०३ | पाटील चावडी. | सी. एच, प्राइस. | १९-२-०३ |
| २ | मि० अमानखान मि० लक्ष्मीनारायण. | २७-२-०३ | ग्रेनमार्केट आफिस. | " | २०-२-०३ |
| ३ | मि० उमरखान. मि० रामचंद्र विष्णू महाजनी. | २८-२-०३ | टाऊनहाल. | " | २१-२-०३ |

Akola 6-2-1903, V. A. Kane. Secretary Municipal C. Akola.

## खरेदी करा !
### रास्कोपची थेट व खरी पेटंट वॉचेस
### नकली मालास भुलून पैसे खर्चू नका !!!

रेल्वेच्या व इतर अवजड कामास हेंच वॉच अत्यंत उपयुक्त आहे. हें वॉच पहिल्या प्रतीचें बिनचूक वेळ दाखविणारें असून इतर वाचेस प्रमाणें यांस नेहमीं रिपेरची जरूर नसून या बद्दल विशेष काळजी व लक्ष पुरविण्याची अवश्यकता नाहीं. म्हणून जंगलांत बाहेर फिरणारे लोकांचें तर हें सोबतीच आहे असें अनुभवास आलें आहे. यासकरितां ज्याला अपली वेळ बरोबर राखण्याची जरूरी आहे अशा लोकांस म्हणजे इंजिनियर, कॉन्ट्रॅक्टर, ओव्हरसियर, फारेस्ट कान्सरव्हेटर व इतर प्रवासी लोकांस हें वाच घेणें विषयीं आम्ही खात्रीपूर्वक शिफारस करितों. आमची **स्कोपच्या पेटंट वॉचेस** संबंधीं याहून जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं कारण त्यांच्या गुणांची प्रचीती तींच आपोआप दाखवितात, इतकें लिहिलें असतां बस्स आहे. हीं घड्याळें आपली स्वतःच शिफारस आजपर्यंत करीत आलीं आहेत, करीत आहेत व पुढेंही अशीच करीत राहतील. प्रत्येक वॉच फार काळजी पूर्वक तपासून चालवून तें वेळ बरोबर दाखविते अशाबद्दल ग्यारंटी देण्यांत येतें, व त्या बद्दलची जोखीमदारी आमचे शिरावर आहे.

**सूचनाः**—पुढील नमुना २१ लाईनच्या मोठ्या आकाराच्या वॉचचा आहे.



मोठे मध्यम १६ रु. १७ रु. लहान

**रोल्ड गोल्ड ४ वर्षांच्या ग्यारंटीचें**

१९ लाईन ओपनफेस....................४०
१९ " हंटिंग....................५०

**गोल्ड ५ वर्षांच्या ग्यारंटीचें.**

१८ लाईन ओपन फेस फिरत्या झांकणाचे ........१५०
१९ " हंटिंग, नकशीचे ............२५०

**मेटलचें तीन वर्षे ग्यारंटीचें.**

रास्कॉप पेटंट २१ लाईन एकस्ट्रा स्ट्रांग १८
१९ " सेंकंद कांट्यासह..........२०
१९ " मध्यमागी सेकंद काटा असलेलें ..............२२
१९ " हाफ हंटिंगचें..............२०
१९ " हंटिंगचें ..................२०
१४ " रिस्ट वॉच ...............२०

**इनगन्‌मेटल ३ वर्षांच्या ग्यारंटीचे**

१९ लाईन ओपन फेस............२०
१९ " हंटिंग.....................२०
१४ " रिस्टवॉच..................२०

**सिल्व्हर वाच ४ वर्षांच्या ग्यारंटीचे**

१४ लाईन रिस्ट वॉच...........३०
१४ " हंटिंग......................३५
१८ व १९ " ओपनफेस ...........३०
१९ " सेकंद कांट्यासह...........३२
१९ " मध्यमागीं सेंकंद कांटा असलेलें ...............३५
१९ " ओपनफेस सुंदर नकशीचें....३५
१९ " हंटिंग ..................४९

लेडीज वॉचीस १४. १८, क्यारेटगोल्ड रुपये ६५-२०० पर्यंत.

**सी. हिनीगर आणि कंपनी.**
ओरिजनल जिनीयन रास्कोप पेटंट वॉचेसचे सोल एजंट.
५ हार्नबी रोड, मुंबई.

---

(१००० चे वर दर आठवड्यास पाठविले जाते.)

## १० आणे त किं० रु० १५ चें फुकट.

कंपनीचें दहा आण्याचें तिकीट विकत घ्या. त्याबरोबर रु० २॥ पाठवून ४ तिकीटांसह हक्काचे सरटीफिकीट मिळवा. (किंवा एकदम तीन रुपये दोन आणे पाठवा) तीं चार तिकिटें दुसऱ्यास विकून आपले अडीच रुपये वसूल करून घ्या. विकत घेणाराकडून अगर तुमचे मार्फत प्रत्येक तिकिटासह रु० २॥ प्रमाणें एकंदर रु० १० पाठवून तीकिटांसह ४ सरटीफिकिटें व फुकट चांदीचे पॉकेट वॉच किंवा भिंतीस लावण्याचे ८ दिवसाच वाजणारें मोठे क्लॉक मागवा. अर्थात दहा आण्यांत १५ रु० चें फुकट !!!

**जी. बी नाईक आणि कंपनी.**
ठाकूरद्वार रोड मुंबई.

---

ॐ नमः श्री गणेशाय.

आर्यवनौषधालय— मुर्डी ता० दापोली आमच्या खात्रीच्या औषधांचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित् न आला तर पैसे परत देऊं व यांचे आरोग्यार्थ आणखी एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकट देऊं.

### मदनामृतसंजीवनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक. मनोत्साहक, कांतिबुद्धिवर्धक, अशी सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत

## गुटिका

उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून खालील विकारावर त्या अत्यंत उपयोगी आहेत.

याच्या सेवनानें नपुसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे, इंद्रिय शिथिलता कडकी, गर्मी संबंधीं मुरलेले विकार, मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींतील रोग, हातपाय, मूत्रस्थान व नेत्र यांचा दाह, क्षय पांडुरोग, मुलाची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य, मस्तकशूल, मूळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार, बाळंतरोग, मुष्टिमैथुनादि घातक संवयींनें आलेली कृशता, इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनतें; पचन शक्ति व धारण शक्ति भरपूर वाढून धातु व रक्त याची वृद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें. शक्ती भरपूर वाढून मनास उत्साह येतो. दूध व जडान्न भरपूर पचूं लागते. गुणाबद्दल असंख्य सर्टीफिकिटा मिळाल्या व नित्य मिळत आहेत. पथ्य सेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहे.

गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम चार रुपयांवर कितीही घेणारास टपाल खर्च माफ. चार रुपयांचे आंत ट० ८६ आणे पडेल. अनुपान खर्डा सोबत. रोखीनें किंवा व्ही. पी. नें खालील पत्यावर मिळतील. दरः—

| | | | |
|---|---|---|---|
| ३५ गो० | १ रु० | ७५ गो० | २ रु० |
| ११५ गो० | ३ रु० | १६५ गो० | ४ रु० |
| २७५ गो० | ६ रु० | ५५० गो० | १० रु० |

आमचेकडे या शिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें असून ग्रंतस्थ रसायनें धातूंचीं भस्में, पाक गुटिका वगैरेही माफक दरानें मिळतात. विशेष गुणवर्णनाचा सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा, फुकट देऊं. टपाल खर्च वेगळा पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं.

**सूचना**— अलीकडे २।३। वर्षे आजरलें वगैरे ठिकाणीं केवळ आपमतलबी ढोंगी लोकांच्या जाहिरातीस ऊत आला असून त्यांनीं आमचेच जाहिरातीची हुबेहूब कापी करून ते ग्राहकांचे डोळ्यांत धूळ फेकीत आहेत. करितां आमची सकल देशबंधूस अशी सविनय प्रार्थना आहे कीं, ज्यांस खरी शास्त्रोक्त औषधें घेणें असतील त्यांनीं आमचीच औषधें, खालील बिनचूक सहीं पत्यावरच मागवावी.

पत्ता—कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.
मु० मुर्डी ता. दापोली
जि० रत्नागिरी.

---

अति स्वस्त ! **ज्ञानविलास** अति स्वस्त !!

हें अत्यंत चटकदार व लोक प्रिय मासिक पुस्तक पोस्टेजसह अवघ्या १२ आण्यांत मिळून, शिवाय प्रत्येक वर्षारंभीं उपयुक्त माहितीची सर्वोत्कृष्ट डायरी बक्षीस मिळते. त्वरा करा आणि अंक रोखीनें किंवा व्ही. पी० नें मागवा.

पत्ता—संपादक, ज्ञानविलास
खणदाळ; पो० गडइंग्लज,
इ० कोल्हापूर.

---

☞ हे पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यानीं छापून प्रसिद्ध केलें.

REGISTERED N. No. 4

बाहेरगांवीं टपालहाशिलांसह........ २ रु.
वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंकास.......................८२
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........८१ ०६
दुसरे खेपेस.... ......८१

Mofussil ...... ... 2 ( with postage )
All Subscriptions to be paid in advance.
Single copy ...................... 2 as.
Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......3 as
Repetition Per line ...2 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXVII AKOLA MONDAY 16 FEBRUARY 1903 NO 7

वर्ष ३७ आकोला सोमवार तारीख १६ माहे फेब्रुवारी सन १९०३ इ० अंक ७

## विज्ञापना

( २ रुपयांत वऱ्हाडसमाचार )

'वऱ्हाडसमाचार ' पत्राची वर्गणी चालूं १९०३ साला पासून टपाल हांशिला सुद्धां २ रुपये केली आहे. राज्यारोहणाच्या सुमुहूर्तानें ही गोष्ट आह्मी मनांत योजिली आहे. आजपर्यंतच्या उदार आश्रयाबद्दल आह्मी आमच्या वर्गणीदाराचे अत्यंतऋणी आहोंत. उत्तरोत्तर अधिक लोकाश्रय मिळेल या मानानें आह्मी वर्तमानपत्रांत पुष्कळच सुधारणा करण्याचा संकल्प केला आहे. ईश्वर तो संकल्प सिद्धीस नेवो !

१।१।०३ | म्यानेजर— वऱ्हाडसमाचार

## नोटीस

रा० रा० जयकृष्ण नारायण ऊर्फ बाबा मुंने राहणार आकोट. यास.

खालीं सही करणार यानकडून नोटीस देण्यांत येते कीं सुमारें ६।७ महिन्यापूर्वी माझे नांवचा रकम रुपये ३०० चा दस्तेवज माझ संमती वाचून तुह्मीं केला असे मला तुह्मी तारीख २५ जनवारी सन १९०३ रोजी आकोट येथील आठवडे बाजारांत रुपये मागितले यावरून कळलें. सदरहु दस्तेवज मी करून दिला नसून तुमचे हा तो मला कांहीं एक देणें नाहींत. ही नोटीस पावल्या पासून चार दिवसांचे आंत माझा कोणचाहि दस्तेवज तुमच्याकडे नाहीं असें लेखी कळवावें. असें मुदतींत न केल्यास तुह्मी खोटा दस्तेवज केला आहे असें समजून मी फौजदारींत फिर्याद दाखल करण्याची व्यवस्था करीन. ह्मणून अगाऊ कळविलें आहे. कळावे, तारीख १०-२-०३ इसवी.

( सहीची निशाणी. )
चिंधजी वल्लद कान्होजी बारी
राहणार आकोट याचे
हातची रेघ—

## जाहीरनामा.

रावसाहेब मामलेदार तालुके माण जि० सातारा याचे कडून:—

सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं, श्री शंभू महादेव शिखर शिंगणापुर तालुके माण जि० सातारा येथें दरसाल चैत्रमासी यात्रा भरत असते. त्याप्रमाणें चालू सालीं चैत्र शुद्ध ९ शके १८२५ ते चैत्र शुद्ध १५ शके मजकूर पावेतों ह्मणजे तारीख २ माहे एप्रिल सन १९०३ रोज गुरुवार पासून ११ माहे एप्रिल सन १९०३ रोज शनिवार पावेतो दोन्ही दिवस धरून यात्रा भरणार आहे करितां ज्या लोकांस यात्रेस येण्याचे असेल त्यांनीं यावें कळावे, ता. १९ माहे जानेवारी १९०३ इसवी.

S. H. Tagare.
मामलेदार ता० माण व व्हाईस प्रेसिडेंट.

## प्रभुत्व प्रभुलाच द्या. मनुष्याला देऊं नका.

( ४९ व्या अंकावरून पुढें. )

( नंबर ४ )

मागील विवेचना वरून हें ध्यानांत आलें असेल कीं, मनुष्यास ( इतर जीवजंतूंची कथा काय ) सर्व शक्तिमान्, सर्वज्ञ, सर्व व्यापी, सर्व पवित्र, न्यायी, दयाळू अशा जगचालकाची उपमा आपण देतों, तेव्हा आपण मोठाच प्रमाद करितों.

ही सृष्टि जशी आतां तशीच पूर्वकाळींही होती असें आपण मानिलें ह्मणजे हें अनियमित समीकरण सुटण्यास उशीर लागणार नाहीं. ही सृष्टि आतां पेक्षा भिन्न कधींही नव्हती, असें समजणें हा सरळ विचारसरणीचा पायाच होय, या प्रमाणें पायाची शुद्धता राखिली ह्मणजे " सिद्धवत गृहीत कृत्यांची " आपणास गरज पडणार नाहीं. स्वाभाविक विचार शक्ति आणि तिच्या सहायास मिळालेलें शिक्षण यांचा यथायोग्य उपयोग केल्यानें, गूढ व्यवहार आपोआप उकलतात खरें आणि खोटें यांच्यावर प्रकाश पडतो. व अशा विचारपद्धतीचा अवलंब केल्यानें कोणाच्याहि योग्यतेंत उणीव येण्याचें प्रयोजन राहत नाहीं.

\+ \+ \+

रघु, अज, दशरथ, रामचंद्र हे महापराक्रमी सूर्यवंशीय राजे होते. ते सत्यशील, प्रजावत्सल, नयनीतिनिपुण होते. श्रीरामचंद्र एक वचनी, एक पत्नी व एक बाणी होता, असें वर्णन केलेलें आहे. या गुणांचा बारीक दृष्टीनें विचार केला ह्मणजे त्यांतील काठिन्य कळून येईल. बोलण्यांत सर्व गोष्टी सोप्या दिसतात पण आचरण्यास कठीण. अशा या आर्य राजपुत्रास प्रवासांत रानटी अतएव मेसूर व क्रूर लोकांकडून, व तशाच प्रकारच्या त्याच्या राजाकडून फार त्रास झाला. आपण अद्याप पाहतों व ऐकतों कीं, ह्या पृथ्वीवर जीं बेटें व निरनिराळें टापू व प्रदेश आहेत तेथें मनुष्यवधाच्या भयंकर चाली, व नरमांस भक्षक लोक आहेत. तेव्हां अशा मोठ्या भयंकर शत्रूस युक्तीने व शौर्यानेंही जरजर करून रामचंद्रानें सर्वत्र शांतता केली. स्वतःच्या सुखाची पर्वा न करितां, प्रजाजनांस अनुपम सौख्य दिलें, व सर्वांशीं स्पृहणीय गुणांचें आपण केवळ अधिष्ठान होऊन प्रजाजनांच्या गळ्यांतील ताईत झाला. अशा सर्व प्रकारें योग्य राजपुत्रास लोकांनीं देवा प्रमाणें मानल्यास नवल नाहीं. राजानें याहून दुसरें काय करावें ? या योग्यतेचा, अल्पांश देखील संपादन केलेल्या राजांची केवढी दुर्मिळता आहे ?

इतकें जरी असलें, तरी देव व मनुष्य, यांतील भेद न कळण्या इतकें अज्ञान आपण प्रगट करूं नये.

जशा रामायणांतील, तशाच भारतांतील कथा आहेत. त्यांतीलही सर्व व्यक्तींस देवत्व दिलें आहे. त्यांच्या उत्पत्तीच्या कथा फार चमत्कारिक सांगितल्या आहेत, व त्यांच्या पराक्रमाची वर्णनें हि फार तऱ्हेवाईक दिलीं आहेत. त्यांच्या विषयीं कल्पना करितां येत नाहीं व कांहीं उलगडा होत नाहीं. एकेक गोष्ट ऐकावी तों चित्ताच्या स्थैर्याची भंग करणारी ती असते. आपण वाचतों काय, ऐकतों काय, व समजतों काय याचा विचार करण्यास मनाला शक्ति राहत नाहीं. अशा जातीचे चमत्कार वर्णिले नाहींत, असें एक पृष्ठ, किंबहुना, एक पद्य देखील मिळणार नाहीं. अशा कथा भारतांत संग्रहित केल्या आहेत. व त्यांची रचना किंवा जुळणी याच पद्धतीची आहे. ह्मणून विचार शक्तीस दूर ठेवून भारत रामायणादि ग्रंथ जे कोणी वाचतात त्यांची अवस्था भ्रमिष्टा सारखी होते. त्यांच्या बुद्धीस मांद्य येतें व कुतर्कांच्या पायावर त्यांचे सिद्धांत रचलेले असतात. मग असंभवनीय कथा ऐकल्या वांचून त्यांची जिज्ञासा तृप्त होत नाहीं. आणि असल्या वर्णना मुळेंच ते या ग्रंथांस थोरवी देतात. गुणांची परीक्षा करून मान देणें, ही एक गोष्ट, व तद्विपरीत प्रकार ही दुसरी. पहिल्या रीतीनें गुणवान संतुष्ट होईल, त्याच्या शतांश दुसरीनें होणार नाहीं. प्रश्न हा कीं, या ग्रंथांची अशी स्थिति आहे तर हे ग्रंथ फुकट गेले काय? व कवि दोषी ठरले काय? उत्तर हें कीं, ग्रंथ फुकट गेले नाहींत, व कवि तर निर्दोष आहेत. आमच्या बुद्धींत, व समजुतींत, विपर्यास आहे. ही आमची स्थिति, सगळा दोष आमच्या पदरांत आणून बांधिते. भारताच्या योग्यतेचा ग्रंथ पृथ्वीच्या पाठीवर एकादाच असेल असें ह्मणतात तें खोटें आहे कीं काय? त्यांत काय पहावयाचें, हें ज्याच्या जवळ, तो ग्रंथ वाचतांना, सारासार बुद्धि, साह्य द्यावयास बसलों असेल त्यास समजेल. व ग्रंथाची थोरवी त्यास कळेल. त्या थोरवीचा स्वरूपांत देखील येथें उल्लेख करितां येणार नाहीं.

\+ \+ \+ \+

निरंकुशः कवयः— कवींचें निरंकुशत्व सुप्रसिद्ध, व सुसंमत आहे. जेथपर्यंत त्यांच्या कल्पनाशक्तीची सीमा असेल तेथपर्यंत प्रवेश करून, ती कल्पनामय सृष्टि आपल्या काव्याचा विषय करण्यास ते सिद्ध असतात ह्या कल्पनामय सृष्टीशीही आपली सृष्टि बहुधा विसदृश असते ह्मणून कल्पना सृष्टींतील कवींचीं वर्णनें, साकल्यें करून, बहुधा आपल्या उपयोगाचीं असतातच असें नाहीं. त्यांतील प्रसंग परत्वें मोठा भागही अग्राह्य असतो, व ग्राह्य तितकाच घेतल्यानें लाभप्रद होतो.

कवींचें निरंकुशत्व, कवींचें लाघव, भाषेचा गौरव, काव्य मनोरंजकत्व इत्यादि हेतु ध्यानांत आणिले ह्मणजे त्यांतील ९/१० असत्य व अग्राह्य समजून आपणास सोडून द्यावे लागतील. व राहिलेला अल्प भाग ग्राह्य होय असेंच आढळून येईल. या अल्पांशामुळें भारताची योग्यता अगदींच हलकी झाली असें कोणी समजेल तर तें समजणें भ्रांतिमूलक ठरेल. या अल्पांशांत जितका शहाणपणा सांठविला आहे, तितक्याची बरोबरी करण्यास, निरनिराळ्या राष्ट्रांच्या सर्वमान्य ग्रंथांतील शहाणपणाची भर घालावी लागेल. ह्मणून भारता सारखा सर्वमान्य ग्रंथ फार विरळ ही त्याची योग्य ख्याति आहे असें ह्मटलें पाहिजे.

कवींनीं वर्णन केलें ह्मणून कवि दोषी ठरत नाहींत. सारासार विचार करण्याचें काम आमचें आहे. असा विचार आह्मी करीत गेलों, तर आमच्या सिद्धांतावर कोणाचे आक्षेप येणार नाहींत, व भ्रमाचें जाळें आमच्या भोंवतीं पसरणार नाहीं. याच पद्धतीस अनुसरल्यानें देव आणि मनुष्य, यांतील अंतर आह्मांस काढतां येईल. आणि जेथें श्रीरामचंद्रा सारखे व श्रीकृष्णा सारखे पुण्यश्लोक राजे, ( यांची स्वतंत्र योग्यता केवढीही मोठी असली, तरी ) सर्व समर्थ प्रभूच्या साम्य तेनें, कस्पटा सारिखे भासतात, तेथें तुकाराम नामदेव, ज्ञानदेव, यांच्या थोरवीचें देव ह्या नामानें, वर्णन करावयाचें आह्मी मनांत तरी कसें आणावें या विषयीं आमचा आह्मांस बोध होईल.

ता० १९।२।०३ वि०

वऱ्हाडसमाचार

मिती माघ वद्य ९ शके १८२४

## टिळक प्रकरण

रा. रा. बाळ गंगाधर टिळक हे सर्वश्रुत आहेत. त्यांच्या तोडीचा बुद्धिमान व चतुर लोकनायक क्वचितूच आह्मास मिळेल. प्रथम प्रथम डेक्कन कालेजांतून जीं अप्रतिम विद्वद्रत्नें बाहेर पडलीं व ज्यांचा प्रकाश महाराष्ट्रातील निरनिराळ्या सार्वजनिक संस्थांवर पडला आहे त्या रत्नांच्या हारामधील राजश्री टिळक हे एक मुख्य रत्नापैकीं आहेत. त्यांच्यावर हल्लीं जी फौजदारी चालू आहे तिचा अर्थ आह्मी त्रयस्थ प्रांतवाले लोक असा घेतो कीं एका सन्मान्य थोर पुरुषाचा छळ करण्याचें एक खरोखरीचें नाटकच पुण्यास चालूं आहे. परधन शिवस्त्र ह्मणून राजश्री टिळकानीं आपल्या मृत मित्राच्या इस्टेटीची व्यवस्था आपल्याकडे घेतली आणि तसेंच करण्याविषयीं त्यांस श्रीमंत बाबा महाराज यांची मरते वेळची आज्ञा होती. ही आज्ञा मित्रत्वाच्या नात्यानें होती, आणि तें मैत्रीचें ऋण फेडीत असतांना आपमतलबी लोकांनीं त्यांस फार फार आडवाटा दाखविल्या. ताई महाराज ह्या तरुणपणी विधवा झाल्यामुळें त्यांच्या नाना कल्पना स्वैर खेळूं लागल्या आणि शेवटीं दत्तक मुलाच्या संबंधानें हजार प्रकार झाले. सरकार दरबारांत सर्व गोष्टी गेल्या आणि तेथें मात्र तोंडच्या साक्षीवर इमारत बांधीत आहेत. मुंबई सरकारानें पुढाकार घेतला आहे. राजश्री टिळकांनीं ताई महाराजास त्यांच्याच वाड्यांत अटकाव केला व दत्तविधाना संबंधानें खोटीं विधानें केली अशा बद्दल फौजदारी सध्यां चालूं आहे. जेथें ताई महाराजांचे पालक ह्मणून पितृस्थानीं राजश्री टिळक होते तेथें आतां ताई महाराज राजश्री टिळकांविरुद्ध फौजदारी चालवीत आहेत. ज्यानीं ज्यानीं या प्रकरणांतील साक्षीपुरावा वाचला असेल त्यांस वाटेल कीं, घरोघर मातीच्याच चुली आहेत. पण श्रीमंती असली, स्त्रीराज्य झालें व वासना स्वतंत्रपणें खेळूं लागल्या ह्मणजे जें हल्लीं प्रमाणें नाटक उभारतें तें लिहिण्याला शेक्सपिअर्स कवीच पाहिजे ह्मणजे त्याच्या अत्युत्तम नाटकाची रचना या टिळक प्रकरणांतच होईल. मैत्रीसाटीं कोणही क्षीज !

राजश्री टिळकांचें कांहींही होवो, ते पाहिजे त्या गोष्टीला उभेच आहेत. पण त्यांच्या संबंधानें आमच्या प्रांतांतले रा. रा. गणेश श्रीकृष्ण खापर्डे यांजवरही पकड–वारंट निघालें होतें. ताई-महाराजांचे राजश्री खापर्डे हे प्रत्यक्ष ज्याही आहेत. त्यांच्याच सल्यानें राजश्री टिळक यांनीं सर्व गोष्टी केल्या आहेत. राजश्री टिळक यांनीं राजश्री खापर्डे यांची साक्ष दिली आहे. दिल्ली दरबाराहून आल्या नंतर प्रकृती नीट नसल्यामुळें ते गेल्या १० वे तारखेला पुण्याला हजर झाले नाहींत. गैर हजिरीमुळें त्यांच्यावर वारंट काढावें अशा विषयीं पुणें कोर्टात खल चालला होता. ब्रिटिश अंमलांतील कोर्टाला निजामच्या राज्यातील इसमांवर पकड वारंट काढतां येत नाहीं अशा विषयीं कायद्याचा एक मुद्दा निघाला होता; तेव्हां उलट पक्षानें असें प्रतिपादन केलें कीं वऱ्हाड प्रांत कायमच्या कौलपट्यानें ब्रिटिश अमलांत आला आहे तेव्हां पकड वारंट काढण्याला हरकत नाहीं. कोर्टाकडून कांहींच निकाल न मिळतां तें वारंट बजावण्याची किंवा न बजावण्याची गोष्ट वऱ्हाडच्या अधिकाऱ्यांवरच ठेवण्यांत आली. युक्तायुक्तता व कायदेशीरपणा हीं इकडील अधिकाऱ्यांनीं निश्चित करावी अशी धरसोड पुण्याच्या कोर्टानें केली होती; परंतु राजश्री खापर्डे हे पुण्याला न जाण्या इतके आजारी असल्या विषयींचें सरटिफिकीट कोर्टापुढें गेल्यामुळें पुन्हां त्यांच्यावर साक्षी–समन्स २६ फेब्रुवारीला हजर राहण्याविषयीं काढावें असा ठराव झाला. या पुढें राजश्री खापर्डे साहेब साक्ष देण्याला जातात किंवा काय करतात तें आणखी दहा दिवसांनीं कळेल.

## इनकम टॅक्स

वरील टिळक प्रकरणांत जो पकड–वारंटा संबंधीं कायद्याचा प्रश्न निघाला आहे तसाच प्रश्न इनकम टॅक्स संबंधानें लवकरच निघेल असा रंग दिसतो. वऱ्हाड प्रांत ब्रिटिश अमला खालीं कायमचा गेला खरा पण या प्रांतांतील लोक निजाम सरकारची प्रजा समजावयाची किंवा कौल पट्टेवाल्या ब्रिटिश सरकारची प्रजा समजावयाची हा प्रश्न अजून निकालाला लागावयाचा आहे. नव्या तहनाम्यांत निजाम सरकारचें स्वामित्व कबूल केलेलें आहे, आणि कौलपट्टेवाला व स्वामी या मधील महदंतर स्पष्टच दिसत आहे, तेव्हां या प्रांताचे लोक ह्मणजे निजाम सरकारच्या पदरची प्रजा समजली जाईल. हा विचार कांहीं अवघड नाहीं किंबहुना त्या प्रश्नांतील शद्वांमध्येंच उत्तराचा उल्लेख आहे. आह्मी निजाम सरकाराची प्रजा ठरलों तर आह्मावर इनकम टॅक्स बसवितां येणार नाहीं. इनकम व्याक्स ह्मणून ब्रिटिश मुलुखांतील प्रजेला उत्पन्नाच्या मानानें कर द्यावा लागतो. हा कर बादशाही कर आहे. बादशाही कराला निजाम सरकारची प्रजा पात्र नाहीं असाच कर निजाम सरकार बसवितील तर तो आह्माला कदाचित् द्यावा लागेल. निजामाची प्रजा या नात्यानें आह्मी इनकम टॅक्सला पात्र नाहीं व अशीच वहिवाट आज पर्यंत चालूं आहे. वऱ्हाडात जे सरकारी चाकर आहेत त्यांच्या पासून इनकम टॅक्स घेत असतात परंतु इतर प्रजेकडून हा कर घेत नसतात. वऱ्हाडचे लोक निजामाची प्रजा आहेत किंवा नाहींत अशा बद्दल थोड्या महिन्यापूर्वीं आमच्या मुसलमान भाईमध्यें तट पडला होता. निजामाच्या वेळीं निजाम सरकारच्या नाम निर्देशानें सलामती दर जुम्याच्या दिवशीं होत असत. ती सलामती बंद करावी ह्मणून प्रश्न निघाला होता परंतु या संबंधानें चर्चा होऊन अखेरीला सलामतीचा प्रकार पूर्ववत् चालूं झाला.

सारांश, वऱ्हाडच्या लोकांवर इनकम-टॅक्स बसवितां येत नाहीं असा आमचा अभिप्राय आहे, पण आह्मांस खात्रीलायक बातमी वरून कळतें कीं इनकम टॅक्स-वसूल करावयाच्या यादी प्रत्येक तहशिलींत तयार होत आहेत आणि त्या यादी वरिष्ट सरकारांनीं फार तावडतोब मागतल्या आहेत. या जलदीवरून असें दिसतें कीं इनकमटॅक्स लागूं केल्याचा जाहिर ठराव लवकरच बाहेर येईल. अस्सल इंग्रजीची पहिली खूण ह्मणजे हा उत्पन्नावरील कर दिसतो. आम्हास उमेद आहे कीं हा कर न बसविण्या संबंधानें यथायोग्य विचार वरिष्ठ सरकार अगोदर करितील.

## कापूस.

( आकोला पेठेची भरभराट )

आकोल्याची व्यापारी पेठ आजकाल फार प्रसिद्ध आहे. येथील व्यापार अती वाढला आहे आणि त्या मानानें या शहराची वाढ फार मोठी आहे. येथील पठेला महत्व आणणाऱ्या व्यापारामध्यें मुख्य व्यापार कापसाचा होय. यंदा आमची समजूत प्रथम अशी होती कीं कापूस या पेठेंत पुष्कळच पुष्कळ आला आहे, पण प्रत्यक्ष आंकडे पाहतां ही समजूत चुकीची ठरली. असें वाटण्याला कारण असें झालें कीं प्लेगामुळें खामगांवचा बाजार बसला आणि शेगांवाच्या पेठेंचीही तशीच दुर्दशा उडाली. अर्थात् त्या दोन बाजारात जाणारा कापूस आकोल्याच्या पेठेंत एकदम येऊं लागला लागला व त्या कारणानें कापसाच्या मार्केटांत गाडी उभी ठेवण्याला जागा मिळेनाशी झाली पण या आकस्मिक कारणा मुळें येथील पेठेला जी भरभराटी आली तिला प्रतिबंधकही कारणें कांहीं निराळींच झालीं. गुदस्ता पक्षा यंदा कापसाचें उत्पन्न मुलुखात कमी आहे आणि त्या खेरीज बारशीटाकळी बाळापूर, पंचगव्हाण, तेल्हारा इत्यादि ठिकाणीं जिनिंगचे कारखाने चांगले जोरानें चालल्यामुळें आकोल्यास येणारा माल बराचसा कमी पडला १९०१–०२ सालांत एप्रिल १ पासून १५ फब्रुवारी पर्यंत ४५०७५ रुईचे बोजे व ८३३९४ कापसाच्या गाड्या इतका माल आकोल्याच्या बाजारांत आला होता पण यंदा ह्मणजे १९०२ च्या एप्रिल पासून कालच्या रविवारपर्यंत २९६९० रुईचे बोजे व ८१७६६ कापसाच्या गाड्या येथें आल्या. या आंकड्या वरून पाहतां बोजे पुष्कळ कमी आले पण कापसाच्या गाड्या फारशा कमी आल्या नाहींत. वाशिमच्या मार्गाला जे जिन चालूं आहेत त्या जिनांतील तिकडून येणाऱ्या रुईचे बोजे नुकतेच अधिकाधीक येऊं लागले आहेत आणि या महिनाभरात गेल्या साला इतकेच बोजाचे व कापसाच्या गाड्यांचे आंकडे यंदाही येतील तरी देखील साधारण मान हेंच खरें कीं यंदा कापसाचें पीक मध्यम झालें.

हल्लीं जिनांच्या कारखान्याला ऊत आला आहे. जीन ह्मणजे यंत्राचा रेचा. हात रेचाचा उद्योग बुडाल्या सारखा झाला आहे. खेड्यापाड्यांतून जे हातरेचे होते ते बंद पडले आहेत. खेड्यापाड्यांतून गांवागांव हातरेचे दृष्टीस पडत असत तेथें क्वचित् एक दोन असे थोडे दृष्टीस पडतात. खेडेवाल्यांचा उद्योग नाहींसा होऊन सध्यां यांत्रिक रेचेवाल्यांची पोळी पिकली आहे. जो उठतो तो जिनिंगचा कारखाना काढतो. ही उलथापालथ कांहीं जिनवाल्या गावाची व शहराची भरभराट करील परंतु त्या मानानें पुष्कळ गावाचा ऱ्हास होईल. आकोला शहराचा जो अफाट विस्तार वाढला आहे तो कापूस वटणाऱ्या जिनिंग कारखान्यामुळें पुष्कळसा झालेला आहे. यांत्रिक रेचांनीं पुष्कळशा खेडेवाल्या लोकांच्या तोंडांतली भाकरी श्रीमान कारखानदाराच्या घशांत घातली आहे. आमच्या येथील सुखवस्तु लोकाना या कारखान्यांनीं अगदीं भंडावून सोडलें आहे. सर्वत्र एंजिनच्या धुराचे लोळ, चिमण्यांचे आवाज, रस्त्यावरील गाड्यांची धूळ, व्यापारानें वाढलेल्या लोकवस्तीची गर्दी सर्पणाची महर्गता, मजूरीचे जबर दर इत्यादि गोष्टींनीं सर्वजणांस या नव्या कारखान्यांचें आस्तित्व क्षणोक्षणीं गांजीत असते. कारखानदार चांगले श्रीमान होऊनही मुनसिपल करा विरुद्ध ओरडतच असतात. उत्तरोत्तर यांत्रिक कला वाढणार आहेत तेव्हां ही होत असलेली अदलाबदल आह्मांस भावी कालाकडे प्रवृत्त करीत आहे हें विसरतां कामा नये.

## चलविचल.

गेल्या तीन आठवड्यांत येथील कापसाच्या बाजारांत बरीच घडामोड झाली आहे. ही घडामोड येथील जिनिंग कारखानदारामध्यें शाली आहे. इतके दिवसपर्यंत कापूस वटण्याचा भाव एकच होता. सर्व कारखानेवाले दर बोजा मागें ४ रु. १० आणे ६ पै घेत होते. सर्वांचा एक कट होता आणि त्या मुळें येथील कारखानदारांस चांगली किफायत होते. परंतु कांहीं छोटे छोटे कारखाने निघाले व त्याचे मालकही या कटापासून होणाऱ्या फायद्याचे शराकतदार होऊं लागले ह्मणून कारखानदारामध्यें दुफळी झाली आणि हा कट मोडण्यांत आला तेव्हांपासून कापूस वटण्याचा दर कमी होत होत ३ रुपयापर्यंत उतरला आहे. अजून कारखान्यांच्या मैदानांत पर्वतप्राय कापसाचे ढीग दिसत आहेत. तो कापूस वटला गेल्या नंतर या पेक्षांही थोडा दर उतरेल असा संभव आहे. इकडे जीनवाल्याचा कट मोडला पण त्यांच्या उलट रुईची गठडी बांधणाऱ्या कारखानदारांचा नवा कट झाला आहे. दर गठडी मागें १॥ रुपया पासून १॥।- रुपये पर्यंत गठडी बांधण्याचा खर्च पडत असे तेथें आतां ही कटवाली कारखानदार मंडळी दर गठडीला ३॥ रुपये आकार ठोंकून घेतील. एकीकडे कट मोडला तर दुसरी कडे नवा कट झाला आणि या रितीनें येथील कापसाच्या बाजारांत मोठी गडबड उडाली आहे. आमच्या

दृष्टीनें असे कट असतां कामा नयेत आणि कायद्यानेंही असे कट मोडतील तितकें चांगलें. कारखानदारांची दृष्टी याच्या उल असली पाहिजे आणि ती आह्मी ओळखून आहों. पण ही गोष्ट खरी कीं कट नसावा व सर्व व्यापार कृत्रिम प्रतिबंधा शिवाय चालावा ह्मणजे त्यांत कोणाची नुकसानी होणार नाहीं.

# The Berar Samachar

MONDAY FEBRUARY 16 1903

In the last week there was the jubilee of the Bengal Chember of Commerce. Lord Curzon took this opportunity to deliver a long speech on the economic position of India. We have in His Excellency a great orator and it must be confessed to his greatness that he himself mastered the elementary principles that have brought about the present development of India. It is a pleasure to note that he has got a clear insight into the wonders which foreign capital has wrought in this nation. We admit that foreign capital is a powerful agent in exploiting India on the grand scale of the modern times This is all true and we are at one with His Excellency when he speaks in high platitudes about the vast expansion of India due to the introduction of Railways, and tele—graphs. The resources of the country have been highly utilized to aggran—dize the manufactures and industries of the Great Britain and this country is now the greatest market for English goods in the world. A country which is so rich in its mineral wealth, so fertile in its agriculture produce and so great a wonder of ancient civilization on all sides of human activities is now the ever—increasing spring of wealth to the British empire. It is a diadem in the British empire and is a perfect example of what a foreign rule and a foreign capitalist can do for the ruling uation of large capitalists But for the sons of the soil, India is a poor nation and the growth of poverty is alarming. We admit that India is highly exploited for the advantages of the English people but if the argument is pushed further and we are asked to congratulate ourselves upon the grand development and expansion of the Indian empire we shall have to pause for a while and to differ altogether from the sangnine and hopeful prospects of the future economical condition of India. Lord Curzon wants to disabuse our minds of the foolish and dangerous illusions to which we fall a victim owing to the ignoranee of the rudiments of economic science. Foreign capital in India is a blessing to the British capitalist but is a curse of our people in so far as it takes a hold of the wealth—producing resources of the country. This fact is stubborn and no economic science can hope to ignore it. Our present position is something like this. We are driven from our little homes and are stationed in large palacial buildings for the use of which we are forced to pay a very high rent. If without foreign capital; the splendid em—poriums of Calcutta, and Bombay will have been no where, but we would say that we never wanted them. The drain of wealth is due to the use of foreign capital. It is the cause of our ruin. India is almost dead. Her pulse of life beats high because of the intrduction of the foreign capital in her economic system. She must fall as a nation if she does not get back to her former commerce and industry. We read a similar thought even in the speech of Lord Curzon when he directs our attention in the following eloquent manner.

"Look facts in the face. Recognize that capital does not wrap itself in the flag of any one country. It is interna-tional. It is like the wind which bloweth where it listeth, and comes and goes as it will. The whole industrial and mercantile world is one great field for the tiller to till: and if the man who lives on the spot will not cultivate it with his own spade, then he has no right to blame the outsider, who enters it with his plough. Of course the country is in the strongest position whose capital is self—generated and self—employed; and it is for this reason that I say that the first duty of the patriotic Indian is, instead of carping at those who have profited by his neglect, to enter the field though late in the day, and to utilise the wealth that he has inherited or acquired for the benefit and the development of his own people."

Here is a clear admission. We do not shut our eyes to the fact that the foreign capital got the uppermost of the Native capital because it was the inevitable result of the times when India was in a stage of political transition. We take to heart the noble advice of Lord Curzon when he expresses the hope that the hoarded wealth will come forth to build up India on a new commercial and industrial foot—ing. It is equally gratifying to find that the hoarded wealth amounts to something like 825 crores of Rupees. This is no doubt a big capital but we doubt very much the correctness of the calculation. We are sorry that no special concessions are put forth for reviving the commercial and industrial embers of the nation. We hope for a great future provided the Government equip us with the necessary education for the beginning of the race upon which we shall ere long enter. The law of economic gravitation tells us that we must do without foreign capital and foreign manufacture. A national resolve to reduce our wants to whatever we get in our own nation will alone guide our people to a successful issue. We want most the noble spirit of insular aloofness. Indepenence of tone and character will speak for itself in our humble walk of life and the less we have to do with the Government the better will it be for us.

## वऱ्हाडवृत्त

हवामान— मध्यंतरीं उष्मा चांगला होत होता पण पुनः थंडीचें मान कडक झालें. हवा निरोगी व आरोग्यकारक आहे प्लेगाचा जोर मंदावला आहे. ईश्वर कृपा करील तर सर्व अरिष्ट दूर होईल!

कुमार श्री हरमामजी डेपुटी कमिशनर हे आकोट तालुक्यांत फिरण्यास गेले आहेत. आकोट तालुक्याचा दवरा या महिन्या अखेर पुरा होईल. पक्षकारांच्या सोयी करितां त्यांचे मुक्काम येणें प्रमाणें:—

| तारीख | मुक्काम |
|---|---|
| १५।१६ फेब्रुवारी | आसेगांव |
| १७ | पनज |
| १८ | आकोलखेड |
| १९ ते २१ | आकोट |
| २२ | आकोटपास परत |
| २३ | कचेरी आकोला |
| २४ | परत आकोटाला |
| २५ | आकोट |
| २६ | बोर्डी |
| २७–२८ | नरनाळा |

मि० करी साहेब असि० कमिशनर हे गेल्या मंगळवारीं आकोल्यास रुजूं झाल्या सध्यां यांच्याकडे खजिन्याचें व सबार्डिनेट जज्जाचें काम आहे.

रा. रा. रामराव बापूजी पतकी यांनीं आपल्या कोर्टाचा चार्ज दिला व ते उमरावतीस रवाना झाले. हे पांढरकवड्याला तहशिलदारीवर रुजूं न होतां एक महिन्याच्या हक्काच्या रजेवर जात आहेत.

मे० इलियट साहेब कमिशनर हे येत्या १० मार्च पासून रजेवर जाणार असल्या विषयीं प्रमोदसिंधुकर्ते कळवितात पण यांच्यामतें ही रजा मिळण्याचा संभव थोडा कमी आहे.

वऱ्हाड प्रांत मुंबई इलाख्याला जोडला जाईल व त्या संबंधानें लवकरच सरकारी ठराव बाहेर पडणार आहे अशा विषयीं मुंबईच आडव्होकेट पत्रकर्ते लिहितात अखेरचा ठराव गुलदस्तांतच आहे आणि तोंपर्यंत कल्पनेला स्वैर खेळूं देणें मोठ्या मौजेचें आहे!

रा. रा. मुकुंद यशवंत सबरजिष्ट्रार चांदूर यांस प्लेगामुळें देवाज्ञा झाली हें कळविण्यास वाईट वाटतें. याचें डोकें बिघडलें ह्मणून हे पेनशनदार पंधरा वीस वर्षें होते. यांनीं जीवापाड श्रम केले, पुष्कळशा फुकट उमेदवाऱ्या केल्या, व डाक्टर रो साहेबांचे सरटिफिकीट मिळविलें आणि इनस्पेक्टर जनरल यानीं पाच सात दिवसापूर्वीं त्यांस सबरजिष्ट्रार पुनः चांदुरास नेमिलें. मनोरथाची सिद्धी किती तरी हृदयंगम! पण बिचारा मृत्युमुखीं पडला!

आह्मांस लिहिण्यास दुःख वाटतें कीं मि० हाशम शेट साले महमद हे गेल्या शुक्रवारीं रात्रीं मरण पावले. परिपक्व पानें गळतात. तेव्हां दुःखाचा उद्गार नको, परंतु यांच्या उदार कृत्याची आठवण आह्मास तो उद्गार काढविते.

बाजारभाव—मागील आठवड्या प्रमाणेंच आहेत.

पंजाब नादारी मुकदमा नंबर १ / १९०३

नादारी नियमा अन्वयें नादाराला नादार ठरविणें विषयीं त्याचे सावकारास नोटिशीचा नमुना.

जी.

विद्यमान नादारी कोर्ट वाशीम यांचे कोर्टात.

सर्वत्रास नोटीस देण्यात येतें कीं कृष्ण्या वा। श्रावण्या राहणार वरूड प्रगणे नर्सी तालुके वाशीम हा नादार आहे असा आज तारीख ९ माहे फेब्रुवारी सन १९०३ इसवी रोजीं ठराव झाला आहे. आणि तारीख ४ माहे एप्रील सन १९०३ हा दिवस नादाराचे सावकारांनीं जमण्याकरितां आणि सावकारांनीं आपले तर्फेचा असायनी नेमून देण्याकरितां व नादारानें आपल्या सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा निकाल करण्या करितां नेमिला आहे.

नादाराच्या सुटके संबधीं ज्या सावकाराला तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्यांनीं त्या बद्दल आठ आण्याच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून या अर्जानें नोटीस द्यावी. या नोटिशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल ते व त्याजबद्दल ज्या साक्षीदारास सपन्स करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नांवें नमुद करावीं. ही नोटीस नेमण्या करितां नेमलेल्या तारखेच्या दोन तीन दिवस तरी पूर्वीं दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पहाण्या करितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत. ज्यास नादारावर दावे नोंदविणें असतील त्यांनीं आठ आण्याचें स्टांपावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी. व ते दावे खरें असल्या बद्दलचा प्रतिज्ञा लेख लिहून त्याजवर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दुरचे राहणारे असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशियल आफीसरापुढें तिच्या खरेपणाविषयीं शपथ करावी आणि ती यादी टपाला मार्फत कोर्टास पाठवावी. ह्मणजे दावा रजिस्टरांत दाखल होईल. ता. १०।२।१९०३ इ.

S. H. King

नादारी कोर्टाचे जड्ज.—वाशीम

## नोटीस

रा. रा. रामचंद्र सिताराम मारवाडी साहू दुकान खामगांव यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमचेकडे आमची रकम संमत १९५७ आश्वीन वद्य ३० अमावास्ये पर्यंत तुह्मी आमची जमा ( १९०८ ) एकुणवीसशें आठ रुपयें दाखविले परंतु आमचे वह्याचे हिशेबानें जास्त निघत आहे आह्मी प्लेगमुळें खामगांव सोडून दोन वर्षें झालीं आकोल्यांत असतो ह्मणून आज मिती पावेतो आमचे आपल्याकडे येणें व्याजासुद्धां ( २२०० ) बावीसशें रुपये आकारानें निघतात.

या शिवाय आणखी तुमचेपासून घेणें तें येणें प्रमाणें : —

| | |
|---|---|
| १३ | रा. बाबूलाल |
| १८०८ | आमचे पंचायती बद्दल |
| १०८४ ,, | वेलजी भाई |
| ६८८ ,, | मोती लड्डा |
| ४८८४ | |

येणें प्रमाणें ४८८४ व मागील २२०० व या नोटिशिचा खर्च ३॥ मिळून रुपये ९२९।८।१२ हे नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत हे सर्व रुपये देऊन आमचे हातची पावती घेणें असें न झाल्यास कोर्ट मार्फत फिर्याद करून कोर्टखर्चासुद्धां पैसे भरून घेतले जातील. कळावें. तारीख १४।२।०३

सही

किसनदास चापसी दस्तुर खुद्द.

## वर्तमानसार

**विठ्ठल रूपधारी अत्यंज**—हैदराबादेस शालीबंड्यावर कांहीं ब्राह्मणांनीं नाम सप्ताह केला. त्याची ब्राह्मण भोजनानें समाप्ती झाली. पुढें दुसरे दिवशीं सूर्योदया बरोबर एक काळा कुळकुळीत धटिंगण समारंभ झालेल्या ठिकाणीं येऊन उभा राहिला या धटींगणाला पाहिल्याबरोबर कांहीं भाविक लोकानां हा पंढरपूरचा विठोबाच येऊन उभा राहिला असा भास झाला ! मग काय विचारावयाचें आहे ? त्याला एकानें साष्टांग नमस्कार घातला, दुसऱ्यानें घातला असें होतां होतां सारे लोक त्याच्या पाया पडूं लागले. हां हां ह्मणतां गांवभर ही बातमी पसरली. लोकांच्या झुंडीच्या झुंडी विठोबाच्या दर्शनास येऊं लागल्या. आपली भक्ति पाहून विठोबा प्रत्यक्ष दर्शन देण्याला धावले अशी सर्वांची समजूत झाली ! मंडळीनें त्या धटिंगणाला उच्च स्थानावर नेऊन बसविलें, अभ्यंग स्नानाची तयारी केली. अंगाला सुवासिक तेलाची उटी लाविली. पंचामृत स्नान घालून तीर्थ ग्रहण केलें. स्नानविधी झाल्यावर त्याला उंची धोतर नेसवून अंगावर शालजोडी घातली, गळ्यांत माळा घातल्या, दिवे ओंवाळले, कोणी पादसेवा करूं लागले, कोणी वारा घालूं लागले. नंतर पांडुरंगाची उपहाराची तयारी झाली. फळफळावळ आणि पेढे बर्फीचीं ताटें येऊन पडलीं, कोणी पुढें दक्षिणा ठेवूं लागले, कोणी नवस केला, कोणी प्रार्थना केली. या प्रमाणें मंडळीनें मोठी गर्दी उडवून दिली. या वेळीं मंडळी देहभानावर नव्हती झटलें तरी चिंता नाहीं, हा सर्व प्रकार चालला होता, पण विठोबांनीं तोंडांतून ब्र देखील काढला नाहीं ! स्वारी मुकाट्यानें भोगोपचार घेत होती. इतक्यांत पोलिसचे लोक तेथें आले आणि त्यांनीं या विठोबाला पछाडलें ! विठोबाच्या दोन मुसक्यांत देऊन त्याला ते दस्तगीर करून घेऊन गेले ! शिव शिव ! तेव्हां मंडळीला समजलें कीं, हा विठोबा नव्हे, तर हा जातीचा महार आणि पक्का चोर !

मग मंडळीला काय वाटलें असेल आणि काय झालें असेल तें आह्मी सांगण्यापेक्षां लोकांनींच ओळखावें ! तीर्थ प्राशन केलेल्या लोकांनां ओकतां ओकतां पुरें झालें असेल. चा.

**आठ हजार वर्षांच्या पूर्वींचा हत्ती**—सेंटपिटर्सबर्ग येथील संग्रहालयांतील दोन शोधक रशियन गृहस्थांनीं सैबेरियांतील गव्हर्नराच्या सुचनेवरून शीत कटिबंधांतील बर्फाच्या डोंगरांत सांपडलेल्या एका हत्तीचा शोध लावून त्याचें शरीर सेंटपिटर्सबर्ग येथील संग्रहालयांत ते घेऊन आले आहेत. ऐतिहासिक माहितीवरून असें समजतें कीं, हा हत्ती आठ हजार वर्षांपूर्वीं चरत असतां बर्फाच्या डोंगरांत सांपडला गेला होता व त्या वेळेपासून आजपर्यंत तो तसाच त्या बर्फाचे कपारींत उभा होता. प्राणाशिवाय त्याचें शरीर जसेंच्या तसें ताजें होतें इतकेंच नव्हे तर त्याच्या शरीराचे सर्व अवयव जशाच्या तसे ताजे असून त्यानें खाल्लेलें अन्न व दाढेंतील चाराही अगदीं ताजा असा होता, ह्या हत्तीचें शरीर हल्लीं सेंटपिटर्सबर्ग येथील संग्रहालयांत सर्वांस पाहण्याकरितां ठेवलें आहे. बर्फाचे अंगीं निजा जशाच तसेंच ठेवण्याचा चांगलाच गुण असावा असें दिसतें. आ०

**मध्यस्थांचें प्रसंगावधान**—कलकत्ता येथें एका श्रीमान व्यापाऱ्यानें व्हाईसराय साहेबांस खुष करण्यासाठीं ३०,००० गरीब भिकाऱ्यास 'पुलावा' वाटला. या समारंभांत व्हाइसराय साहेब स्वतः हिंडत असतां एका भिकाऱ्यानें ओरडून सांगितलें, 'हम भूका है सरकार !' व्हाइसराय साहब चटकन वळले व शेजारच्या गृहस्थास त्यांनीं इंग्रजींत विचारिलें, "हा काय ह्मणतो आहे ?" त्यांनीं लागलीच सांगितलें 'तो तुमची स्तुति करीत आहे मेहेरबान ?' हें समयोचित उत्तर एकदम दिलेलें पाहून व्हाइसराय साहेबांची स्वारी गार झाली आणि या प्रसंगीं आपण स्वतः देखरेख केली ह्मणून आपणास कृतकार्य मानून चालती झाली !

**हम भूका है सरकार**—ही हिंदुस्थानची आरोळी या प्रमाणें किती मध्यस्थानीं आपल्या वरिष्ठांस अशीच या पूर्वीं समजावून सांगितली आहे याचा विचार केला असतां अंतःकरण कापून गेल्यावांचून रहात नाहीं !

**आह्मी सरकारचे दोस्त आहों गुलाम नाहीं**—इनव्हेस्टर रिव्ह्यू असें एक विधान करतें आहे कीं, आपला व आपल्या बायकोचा झगा सावरून धरण्यासाठीं लार्ड कर्झन यांनीं राजे लोकांच्या तरुण मुलांस पाठवून देण्याविषयीं हुकूम सोडिला होता पण या विनंतीचा राजे लोकांस राग येऊन त्यांनीं उलट लिहिलें कीं, आह्मी इंग्रज सरकारचे दोस्त आहों, गुलाम नाहीं. या मुळें लाट साहेबांना पश्चात्ताप मात्र झाला. या विधानास काय आधार असेल तो असो व्हाइसराय साहेबांनीं 'पेजेस आफ आनर' होण्यांत कमीपणा नाहीं अशा अर्थाचा मजकूर मुद्दाम प्रसिद्ध केला होता. एवढ्या वरून हा व्यूह रचला असल्यास कोण जाणें ! बाकी व्हाइसरायसाहेब व त्यांची पत्नी यांचे झगे सांवरण्यास राजपुत्र मिळण्याची मुळींच अडचण पडली नाहीं. आणि त्यांस असें स्पष्ट उत्तर लिहील असा एकही संस्थानिक आज हयात नाहीं. सु०

**शंभर दिवस झोंपच**—सेंट्रालिया येथें एका बाईचें आपल्या नवऱ्याशीं गेल्या सप्टेंबरमध्यें भांडण झालें, त्यामुळें त्यांचें बनेनासें झालें. ती बाई लागलीच आजारी पडली आणि तीस लवकरच झोंप लागली. ती आज १०० दिवसपर्यंत झोंपेंतच आहे ! पुष्कळ डाक्टर लोक तिला पहावयास जात आहेत. तिला निद्रारोग तर झाला नसेलना !

**डाक्टरी मत**— दारू पिण्याची संवय लागते ती रुधिराभिसरण विशेष जोरानें ज्याचें चालतें त्यास लागण्याचा विशेष संभव असतो असें एका शास्त्रज्ञानें मत आहे. मुलास लहानपणापासूनच सात्विक अन्न खाण्याची संवय लावावी ह्मणजे त्यास दारूची संवय लागणार नाहीं असें हे ह्मणतात. अर्धपोटी राहणारे लोकही या व्यसनांत पडतात त्याची मीमांसा हे शास्त्रज्ञ कशी करणार ?

सुरतेस एका वैराग्यानें क्षुधाशांत्यर्थ एक प्रेत उकरून खाल्लें त्याबद्दल सक्तमजुरीची शिक्षा झाली. असो. आतां बिचाऱ्याच्या पोटाची आयतीच सोय झाली.

**एक्सरेजचा उपयोग**— एक्सरेजच्या यंत्राच्या साहाय्यानें मनुष्याच्या शरीरांतील भाग स्पष्टपणें पहातां येतो. या यंत्राचा उपयोग जपानच्या टंकशाळेंत करितात. मजुरांपैकीं कोणी रुपये गिळून लांबवितो असा संशय आल्यास हें यंत्र लावून पाहतांच त्याच्या पोटांतील रुपये दिसतात. मो.

**विडा उचलला**— न्यूयार्क मधील बर्कले संस्थानांतील मि. ले. रॉय मेकेटियर नांवाच्या एका साहासिक मनुष्यानें पायीं चालून जाऊन उत्तर ध्रुवाचा शोध लावण्याचा विडा उचलला आहे. यांनीं कित्येक वर्षांपासून मांसाहार टाकून दिला आहे व त्याचें मत असें आहे कीं, वनस्पतीचा आहार करणारास शीत कटिबंधांतील थंडी बाधत नाहीं. यांनीं आपल्या ह्या प्रवासाकरितां बर्फावरून चालणारी एक गाडी तयार केली असून, ही गाडी ओढण्याकरितां दांडगे असे पांच शिकारी कुत्रे तयार केले आहेत.

**इमानीपणाची शपथ**— ब्रह्मदेशांत जो नवीन प्रधान अगर सरदार बने, त्यास राजवाड्यांतील देवळांत नेऊन यास देवास मोर उभा करून एका कागदावर मी राजद्रोह करणार नाहीं, राजाज्ञा पाळीन, आपलें काम निःपक्षपातानें करीन, लांच खाणार नाहीं वगैरे सर्व आज्ञा पाळीन आणि तसें न करीन तर माझ पूर्वींचे ६० कुळींचे आणि पुढील ६० कुळींचे पूर्वज नरकांत जावोत अशी शपथ लिहून तो कागद त्यांजकडून देवासमक्ष आणि सर्व लोकांसमक्ष तीन वार वाचवितात. नंतर तो जाळून एका कांशेच्या पेल्यांत देवाचें तीर्थ घालून त्यांत घालतात व तें पंच हत्यारानें ढवळून पिणेस देतात ह्मणजे तो आपले कामावर जाऊन रुजू होणेंस पात्र होतो. वि० वि०

### अमृतसंजीवनीचा शोध !

जनावरांच्या 'मूत्रपिंडा' चे वरचे बाजूस फुगवट्या असतात; त्यापासून आड्रेनलिन नांवाचा पदार्थ निघतो. याचे योगानें मेलेल्या प्राण्यास जिवंत करतां येतें असा शोध क्लेव्हलंड मेडिकल कालेजांतील शस्त्रवैद्यक प्रो० डा० कईल यांनीं लावला आहे! एका कुत्र्याचा श्वासोच्छ्वास त्याची श्वासनलिका दाबून बंद करून त्यास ठार केलें. नंतर त्याच्या पोटांत आड्रेनलिन घालून व इतर उपचारांनीं त्याचें काळीज व फुप्फुसाची क्रिया सुरू करून त्यास जिवंत केलें; व हा कुत्रा अजून चांगला व जिवंत आहे! आड्रेनलिन ह्या पदार्थाचे अंगीं रक्तावर दाब उत्पन्न करून त्याचे योगानें रक्ताभिसरण सुरूं करण्याचा धर्म आहे. विजेच्या धक्क्यानें, ती पडल्यानें, शस्त्रप्रयोगानें अथवा श्वास गुदमरून मेलेल्या मनुष्यांस ह्या पदार्थानें सजीव करतां येईल असें सदर डाक्टरांचें ह्मणणें आहे. के०

**पूर्वीची चाळिशीची उमेद**— हें वय ह्मणजे ऐन सामर्थ्याचें आणि पराक्रमाचें होय. ह्या वयांत राजे आपलीं वस्त्रें कावेच्या रंगानें न रंगवितां शत्रूच्या रक्तानें रंगवीत असत. ह्या वयांत राजे आपल्या अंगाला राख लावीत नसून शत्रूच्या पाठीला रणांगणांतील धूळ फासीत असत. ह्या वयांत त्यांच्या हातांत रुद्राक्षाची माळ नसून शत्रूंची रुंडमाळा असे, आणि ह्या वयांत ते मुक्तीमार्गीं ध्यानस्थ बसत नसून विजयश्रीसाठीं सैरावैरा धांवत असत. हें वय त्यांच्या तपश्चर्येचें नव्हे, त्यांच्या कर्तबगारीचें होतें. असा पूर्वींचा क्रम होता. पण हा. आतां—

एक इंग्रजी पत्र काय ह्मणतें पहा:- नेटिव राजांच्या मुलांना आपल्या पुढें चालविल्यानें किंवा त्यांना हुजऱ्यांचीं कामें करावयाला लाविल्यानें नेटिव राजांची राजनिष्ठा जास्त वाढेल असें कोणाला तरी वाटेल काय? मनुष्य स्वभावाचें आतां पर्यंत जें ज्ञान आहे त्यावरून पाहतां तरी निदान असे परिणाम घडून येण्याचा संभव नाहीं. उलट मनांतून द्वेष मात्र जास्त वाढण्याचा संभव आहे.

राज्यकर्त्यांच्या जुलमी अंमलानें राष्ट्रें नष्ट झाल्याचीं उदाहरणें इतिहासामध्यें आहेत. आणि कदाचित् हिंदुस्थानचाही तसाच शेवट होण्याचा संभव आहे. परंतु एखाद्या सरपटणाऱ्या प्राण्याला धक्का लागला तर तेही उलटतो. आणि इतिहासामध्यें तशींही उदाहरणें आहेत. आर्दी भित्र्या स्वभावाचे लोकही उलटलेले आहेत, आणि हिंदुस्थानांतील रजपूत, मराठे मुसलमान ह्यांच्यामध्यें मर्दुमकीचा जोम अजून कायम आहे, दिल्ली दरबारच्या योगानें प्रज्वलित झालेला मत्सर किंवा क्रोध ह्याच्या योगानें जर या लोकांचीं डोकीं फिरून गेलीं तर कसें होईल!

तसेंच भकेच्या आगीनें त्यांची चित्तवृत्ति न खवळेल अशाबद्दल कांहीं व्यवस्था करणें जरूर आहे. इन्व्हेस्टर रिव्ह्यूमधील लेखकाचे हे विचार फारच दूरवर गेले आहेत. पण दिल्लीदरबारामुळें इतकें वाईट कोणत्याही राजाला वाटलें नाहीं किंवा इतका राग कोणत्याही महाराजाला आला नाहीं तसेंच इतकी भुकेची आगहि अजून कोणाच्याच पोटांत पेटली नाहीं. आणि इतकी स्थिती येईपर्यंत सरकारास भितीचें कारण नाहीं.

**कसें चुकलें**— लार्ड कर्झन साहेबांना विहिणी प्रमाणें मिरवून घेण्याची फार होस आहे. मिरवणुकींत हत्तीवरील मिरवणूक चांगलीच पण पायघड्यावरील विशेष खुबी असती व या पायघड्यास नवीन कोरीं वस्त्रें न आणितां जमलेल्या राजे रजवाड्यांच्या मंदिलांच्या पायघड्या केल्या असत्या तर त्यांच्या सार्वभौमत्वास फारच शोभलें असतें. मग हें चुकलें कसें ?

**जंटलमन वाघ**— श्रीमंत शिंदे सरकारच्या राज्यांतील रानटी पशू सुद्धां जंटलमन (सद्गृहस्थ) आहेतसे दिसत. कारण परवां शिंदे सरकार ह्मणाले कीं, माझ्या राज्यांतील एक वाघ ड्यूक आफ् कानाट यांनीं मारला याबद्दल त्या वाघाला आनंदच झाला असावा अलीकडे वाघाची शिकार क्वचित सांपडते. तरी तो वाघ त्यांचे पुढें हजर झाला, यावरून तो 'जंटलमन' वाघ असला पाहिजे सुदैवानें आपण एका महा पवित्र नरपुंगवाच्या हातीं जाणार हें त्यास उपजत बुद्धीनेंच उमगलें व ह्मणून त्यानें आपला देह त्यांचे करवीं पावन करवून मुक्ती मिळविली.

**आकाश निळें कां**— आकाशांत धुळीचे कण मिसळत असल्यामुळें त्याचा रंग निळा असतो असें प्रसिद्ध शास्त्रज्ञ मि टिंडाल यांचें मत होतें, परंतु स्प्रिन्ग नांवाच्या एका विद्वानानें असें ह्मणणें आहे कीं, हवेंत असलेल्या आक्सिजनमुळें यांस हा रंग आलेला आहे.

**सुधारणा वाटते?**—एका जपानी रेलवे कंपनीनें असें योजिलें आहे कीं रिफ्रेशमेंटकारमध्यें, सुंदर, सुशिक्षित, आरोग्यसंपन्न, चांगल्या वर्तणुकीच्या आणि निर्मळ किर्तीच्या अशा मुलींची योजना करावयाची. त्यांस उतारूंशीं गप्पा मारीत बसण्याची मनाई आहे. हा सर्वच पोरकटपणा दिसत आहे. या सुधारणेबद्दल कंपनीस पश्चात्ताप झाल्याशिवाय रहाणार नाहीं, ज्ञा.

**नवान युक्ती**— फ्रान्समध्यें सल्फ्युरिक असिडच्या सोल्युशनचा कागद तयार करण्याची एकानें युक्ती काढली आहे, या असिडाच्या योगानें कागदावरील लेख तर समूळ नाहींसा होतोच पण असिड कमी जास्त लावावें त्या मानानें तो कागद कमी अधीक मुदतींत नाहींसा होतो.

## नोटीस

फुली मर्द तुक्या जात माहार राहणार पळसो वढ्याची पोष्ट बोरगांवमंजू इजकडून.

तुक्या वल्लद दोन्या माहार राहणार नागठाण पोस्ट मूर्तिजापूर यास:—

नोटीस देण्यांत येते कीं तुमचे माझ्याशीं लग्न होऊन अजमासें १४।१६ वर्षें झालीं तुमच्या दुर्दैवानें तुह्मास रक्तपितीचा रोग होऊन बरींच वर्षें झालीं संसार सुखाचे तुह्मी अगदीं उपयोगी नाहीं, दुसरा घरठाव करण्याबद्दल मी तुह्मास विचारले तर तुह्मी बोलत नाहीं. याजकरितां तुह्मास या नोटिशीनें असें कळवितें कीं सदर्हू बद्दल तुमचें काय ह्मणणें आहे तें ही नोटीस पावल्यापासून ८ दिवसांत कळवावें तसें तुमचेकडून न झाल्यांस हीच कायमची फारकती समजून मी दुसरा घरठाव करीन. कळावें, तारीख १२।२।१९०३ इसवी,

सही

सहीची निशानी फुली मर्द
तुक्या इचे हातची बांगडी ०

## जाहिरात

गीताभाष्य. पूर्ण तयार, मराठी भाषांतर व विस्तृत स्पष्टीकरण यांसह. पाडव्यापर्यंतच किंमत रुपये १०


श्रीमच्छंकराचार्यांचें शारिरभाष्य. मराठी भाषांतर व विवेचन यांसह. मार्चपासून मासिक पु. द्वारें निघेल. गीताभाष्यापेक्षां तिप्पट. ३ वर्षांत संपेल. वर्षाची अ. व ५८६ पहिल्या २०० ग्राहकांस बालकांड व योगवासिष्ठवैराग्यप्रकरण हे ३ रु. किंमतीचे उत्कृष्ट ग्रंथ स. भा. सह बक्षिस.

का० वा० लेले वाई.

## खरेदी करा !
## रास्कोपची थेट व खरी पेटंट वॉचेस
## नकली मालास भुलून पैसे खर्चू नका !!!

रेलवेच्या व इतर अवजड कामास हेंच वॉच अत्यंत उपयुक्त आहे. हें वॉच पहिल्या प्रतीचें बिनचूक वेळ दाखविणारें असून इतर वाचेस प्रमाणें यांस नेहमीं रिपेरची जरूर नसून या बद्दल विशेष काळजी व लक्ष पुरविण्याची अवश्यकता नाहीं. ह्मणून जंगलांत बाहेर फिरणारे लोकांचें तर हें सोबतीच आहे असें अनुभवास आलें आहे. याजकरितां ज्याला अचूक वेळ बरोबर राखण्याची जरूरी आहे अशा लोकांस ह्मणजे इंजिनियर, कंट्राक्टर, ओव्हरसियर, फारेस्ट कान्सरव्हेटर व इतर प्रवासी लोकांस हें वाच घेणें विषयीं आह्मी खात्रीपूर्वक शिफारस करितों. आमची रास्कोपच्या पेटंट वॉचेस संबंधीं याहून जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं कारण त्यांच्या गुणांची प्रचीती तींच आपोआप दाखवितात, इतकें लिहिलें असतां बस्स आहे. हीं घड्याळें आपली स्वतःच शिफारस आजपर्यंत करीत आलीं आहेत, करीत आहेत व पुढेंही अशीच करीत राहतील. प्रत्येक वॉच फार काळजी पूर्वक तपासून चालवून तें वेळ बरोबर दाखविते अशाबद्दल ग्यारंटी देण्यांत येते, व त्या बद्दलची जोखीमदारी आमचे शिरावर आहे.

**सूचनाः**—पुढील नमुना २१ लाईनच्या मोठ्या आकाराच्या वॉचचा आहे.



मोठे मध्यम १६ रु. १७ रु. लहान

**रोल्ड गोल्ड ४ वर्षांच्या ग्यारंटीचें**

१९ लाईन ओपनफेस.......................४०
१९ ,, हंटिंग..............................५०

**गोल्ड ५ वर्षांच्या ग्यारंटीचें.**

१८ लाईन ओपन फेस फिरत्या झांकणाचे ........१५०
१९ ,, हंटिंग, नकशीचे ..............२५०

**मेटलचें तीन वर्षें ग्यारंटीचें.**

रास्कॉप पेटंट २१ लाईन एकस्ट्रा स्ट्रांग १८
१९ ,, सेकंद कांट्यासह...............१०
१९ ,, मध्यभागी सेकंद कांटा असलेलें ...............१२
१९ ,, हाफ हंटिंगचें...................२०
१९ ,, हंटिंगचें .........................२०
१४ ,, रिस्ट वॉच.......................२०

**इनगनमेटल ३ वर्षांच्या ग्यारंटीचे**

१९ लाईन ओपन फेस..............२०
१९ ,, हंटिंग.............................२०
१४ ,, रिस्टवॉच........................२०

**सिल्व्हर वाच ४ वर्षांच्या ग्यारंटीचे**

१४ लाईन रिस्ट वॉच ..............३०
१४ ,, हंटिंग................................३५
१८ व १९ ,, ओपनफेस ..............३०
१९ ,, सेकंद कांट्यासह...............३२
१९ ,, मध्यभागीं सेकंद कांटा असलेलें ..................३५
१९ ,, ओपनफेस सुंदर नकशीचें....३५
१९ ,, हंटिंग .......................४९

लेडीज वॉचीस १४. १८, क्यारेटगोल्ड रुपये ६५-२०० पर्यंत.

**सी. हिनीगर आणि कंपनी.**
ओरिजनल जिनीयन रास्कोप पेटंट वॉचेसचे सोल एजंट.
५ हार्नबी रोड, मुंबई.

---

( १००० चे वर दर आठवड्यास पाठविले जात. )

## १० आणे त किं० रु० १५ चें फुकट.

कंपनीचें दहा आण्याचें तिकीट विकत घ्या. त्याबरोबर रु० २॥ पाठवून ४ तिकीटांसह हक्काचे सरटीफिकीट मिळवा. ( किंवा एकदम तीन रुपये दोन आणे पाठवा ) तीं चार तिकिटें दुसऱ्यास विकून आपले अडीच रुपये वसूल करून घ्या. विकत घेणाराकडून अगर तुमचे मार्फत प्रत्येक तिकिटासह रु० २॥ प्रमाणें एकंदर रु० १० पाठवून तिकिटांसह ४ सारटीफिकिटें व फुकट चांदीचे पॉकेट वॉच किंवा भिंतीस लावण्याचे ८ दिवसांच वाजणारें मोठे क्लॉक मागवा. अर्थात दहा आण्यांत १५ रु० चें फुकट ! ! !

जी. बी नाईक आणि कंपनी.
ठाकूरद्वार रोड मुंबई.

---

## ॐ नमः श्री गणेशाय.

आर्यवनौषधालय— मुर्डी ता० दापोली

आमच्या खात्रीच्या औषधांचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित् न आला तर पैसे परत देऊं व यांचे आरोग्यार्थ आणखी एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकट देऊं.

## मदनामृतसंजीवनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक. मनोत्साहक, कांतिबुद्धिवर्धक, अशी सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत

## गुटिका

उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून खालील विकारावर त्या अत्यंत उपयोगी आहेत.

याच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे, इंद्रिय शिथिलता कडकी, गर्मी संबंधीं मुरलेले विकार, मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींतील रोग, हातपाय, मूत्रस्थान व नेत्र यांचा दाह, क्षय पांडुरोग, मुलाची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य, मस्तकशूळ, मूळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार, बाळंतरोग, मुष्टिमैथुनादि घातक संवयीनें आलेली कृशता, इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनतें; पचन शक्ति व स्मरण शक्ति भरपूर वाढून धातु व रक्त याची वृद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें. शक्ती भरपूर वाढून मनास उत्साह येतो. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें. गुणाबद्दल असंख्य सर्टीफिकिटें मिळाल्या व नित्य मिळत आहेत. पथ्य सेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहे.

गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम चार रुपयांवर कितीही घेणारास टपाल खर्च माफ. चार रुपयांचे आंत ट० ८६ आणे पडेल. अनुपान खर्डा सोबत. रोखीनें किंवा व्ही. पी. नें खालील पत्यावर मिळतील. दरः —

३५ गो० १ रु० ७५ गो० २ रु०
११५ गो० ३ रु० १६५ गो० ४ रु०
२७५ गो० ६ रु० ५५० गो० १० रु०

आमचेकडे या शिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें असून ग्रंतस्थ रसायनें धातूंचीं भस्में, पाक गुटिका वगैरेही माफक दरानें मिळतात, विशेष गुणवर्णनाचा सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा, फुकट देऊं. टपाल खर्च वेगळा पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं.

**सूचना**—— अलिकडे २।३। वर्षें आजरलें वगैरे ठिकाणीं केवळ आपमतलबी ढोंगी लोकांच्या जाहिरातीस ऊत आला असून त्यांनीं आमचेच जाहिरातीची हुबेहूब कापी करून ते ग्राहकांचे डोळयांत धूळ फेकीत आहेत. करितां आमची सकल देशबंधूंस अशी सविनय प्रार्थना आहे कीं, ज्यांस खरी शास्त्रोक्त औषधें घेणें असतील त्यांनीं आमचीच औषधें खालील बिनचूक सही पत्यावरच मागवावी.

पत्ता—कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.
मु० मुर्डी ता. दापोली
जि० रत्नागिरी

---

विक्रीस तयार.

सोहांनीकृत भरपूर टिपांसहित मराठी

## कायद्याचीं पुस्तकें

सिव्हिल प्रोसिजर कोड- आवृत्ती दुसरी, पानें अदमासें ९०० निवाड्याची संख्या ६००० किंमत अति स्वस्त केली आहे. व्ही. पी. सुद्धा रु. ३

क्रिमिनल प्रोसिजर कोड – ( सन १८९८ चा आक्ट ५ वा, १८९९ चा आक्ट १२ वा यानें सुधारल्या प्रमाणें ) किंमत ५ रुपये व टपालखर्च ०१० आणे.

क्रिमिनल प्रोसिजर कोड — जुना आक्ट ( सन १८८२ चा १० वा ) किंमत ५ रुपये व टपाल खर्च ०१० आणे.

जुनें नवें क्रिमिनल प्रोसिजर कोड एकत्र बांधविलेलें घेतल्यास वरील दोन्हीं पुस्तकांची किंमत टपाल खर्चासुद्धां ८८४.

दिवाणी आक्टसंग्रह- ( यांत दिवाणी कामास लागणारे सर्व आक्ट आहेत, पानें अदमासें ५०० ) किंमत टपाल खर्चा सुद्धां २८८

म्यानेजर, डेक्कनबुक एजन्सी,
सदाशिवपेठ, पूना सिटी.

नारो अपाजी गोडबोले
बुकसेलर बुधवार पेठ.

## Kadi हें काय आहे ?

दाक्टर डी. एम. दस्तुर यांनीं तयार केलेली दमा व खोकला या वरील रामबाण औषधी.

दमा आणि खालील सर्व रोगांवर तात्कालिक व गुणकारक उपाय हाच आहे. जेथें डाक्तरांचा व इतरांचा कोणाचाही उपाय चालत नाहीं तेथें हें फार उपयोगी पडतें. याच्या गुणाबद्दल हिंदुस्थान, इंग्लंड व अमेरिका येथील रोगग्रस्तांचे व डाक्तरांचे शेंकडों चांगले अभिप्राय आहेत. कितीही जुनाट दमा, फार दिवसांचा खोकला, घशांत घरघर अवाज होणें, वारंवार सरदी व पडसें होणें, व ताप येणें, सरदी, ब्रान्कायटीस इनफ्ल्युएन्झा इत्यादि रोगांवर हें फार उपयोगी आहे. बाटलीची किंमत सारा १॥ रुपया आहे. परंतु हें रोग्यांस एक हजार रुपयांच्या किंमतीचें वाटतें.

पत्ता--मेसर्स पेस्तनजी आणि सन दुकान आकोला.

## मुंबई बँकची ठेव ठवण्याची बँक

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल:—

कोणत्याही एका वर्षांत म्हणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपयापर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १।७।०२ } J. Kiniburgh एजंट

## ORIENTAL GOVERNMENT SECURITY LIFE ASSURANCE COMPANY LIMITED

Established 1874.

Head Office,—*BOMBAY.*

*Chief Agency for C. P. Berar & Khandesh*

Head—quarters—Nagpur, C. P.

—:0:—

FUNDS EXCEED TWO CRORES

Claims paid for over One Crore and Ten Lakhs.

———

IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS.

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when Claims arise, that the amount due under the Policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the "Oriental" keep well before them and act up to—treating their clients with the utmost liberality.

*Unquestionable Security*

It is not sufficient to read that a Company's Funds amount to a given sum, but it is essential to know how such Funds are invested—if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives and endowment policies matured.

———

Government Officers, Professional men, Tradesmen and others, by employing a portion of their annual income or profits in effecting life policies, at once create a fund equivalent to the savings of many years.

Creditors who expect the repayment of debts at some future period may protect themselves from loss by the failure of life in the intermediate period, by an assurance on the life of the debtor.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet if he die early, before he has had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is got over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month and less, has left the family without the intended provision.

———

Influential and energetic Agents wanted. For terms please apply to undersigned.

Prospectuses, forms, and any further information can be obtained on application to

M. De SOUZA,
CHIEF AGENT,
*for C. P. Berars & Khandesh.*


## जाहिरात

मुनिसिपाल निवडणुकीचे नियमांतील नियम १२ अन्वयें जाहीर करण्यांत येतें कीं अकोले मुनसिपाल कमिटींतील जागा मेंबरांच्या जागा सदरहू नियमा प्रमाणें नियम ३१ अन्वयेंच्या खालीं होतील त्या भरण्याकरितां ता. २६।२७।२८ माहे फेब्रुवारी सन १९०३ इसवी रोजीं सकाळचे ७ वाजल्यापासून सायंकाळचे ५ वाजे पावेतों निवडणूक होणार आहे, खालीं लिहिलेल्या तक्त्यांत वार्डांपैकीं मेंबर निघाले त्यांचीं नांवें, त्या वार्डा करितां होणारे निवडणुकीची तारीख, जागा, पोलींग आफिसरचें नांव, उमेदवार यांनीं कोणत्या तारखे पर्यंत पोलिंग आफिसरकडे मुनिसिपाल नियम १३ अन्वयें आपले अर्ज द्यावेत वगैरे माहिती दिली आहे. ता० ६।२।१९०३ इ०

Akola 6—2—1903 } V. A. KANE Secretary Municipal C. Akola.

| वार्ड नं. | निघणार मेंबरांचीं नांवें. | निवडणुकीची तारीख. | निवडणुकीची जागा | पोलिंग आफिसरचें नांव. | उमेदवारांनीं कोणत्या तारखेचे आंत नांवचे कागद द्यावयाचे |
|---|---|---|---|---|---|
| १ | मि. लक्ष्मण गोविंद ओक<br>मि. मिरझा अब्बासबेग | २६-२-०३ | पाटील चावडी. | | १९-२-०३ |
| २ | मि. अमानखान<br>मि. लक्ष्मीनारायण | २७-२-०३ | प्रेमर्माकेट आफिस | मि० सी. एच. प्राईस. | २०-२-०३ |
| ३ | मि. उमरखान<br>मि. रामचंद्र विष्णु महाजनी | २८-२-०३ | टाऊनहाल. | ए. अ. कामिशनर | २१-२-०३ |

Akola 6—2—1903.

V. A. Kane. Secretary Municipal C. Akola.


## दन्तकुसुमाकर

खालीं लिहिलेल्या दताच्या आजारा वर आणि इतर हरएक प्रकारच्या दाताच्या बिमारीवर हें औषध एक रामबाण मात्राच आहे.

काम अक्सीर का दतो मे दिखाते है हम।
चोट डंके की हरेक मर्ज उडाते हम ॥




देखना चाहिये क्या मुल्क कदर करती हे
ढूंढते फिरते हरेक सिम्त कदरदां हैं हम ॥

मोठी डबी.... १ रु.
लहान ,, .... ॥-

दांतावर जाळें जमणें, ते पिवळे होणें, हिरड्या दुखणें, दांत आंबणें, हलूं लागणें, कमजोर होणें, भेगा पडणें, किडे पडणें, वांकडें तिकडे होणें, नेहमीं खपल्या पडणें कठीण वस्तु दातांनीं फोडतां न येणें, दांत मळकट घाणेरडे राहणें, त्यातून रक्त वाहणें किंवा दुःख होणें इत्यादि सर्व प्रकारचीं दुखणीं नाहींशीं होतात, प्रत्येक दिवशीं याचा उपयोग केल्यानें वर लिहिलेले कोणत्याही प्रकारचे रोग या पासून राहणार नाहींत. निरंतर दांत स्वच्छ आणि चकचकीत राहतात. कोणत्याही प्रकारची बिमारी न होतां तोंड स्वादिष्ट व सुवासिक राहतें.

एजंट—कृष्णाजी गणेश पटवर्धन आफ मेसर्स भास्कर कृष्ण जनरल मर्चंटस् आकोला.

पत्ता— नंदलाल वर्मा म्यानजर फ्रेण्ड अँण्ड कंम्पनी मथुरा.

K. N. ESMAYAL & Co

यांची अनेक रोगांवरील जगप्रसिद्ध ३७ प्रकारची औषधीं विक्रीस तयार आहे. कार्डांत पत्ता लिहून कळवा म्हणजे क्याटलाग फुकट पाठवूं.

पत्ता— खोजानुरा इस्मायल आणि कंपनी. जी. बी वर्धा. सी. पी.

अति स्वस्त! ज्ञानविलास अति स्वस्त!!

हें अत्यंत चटकदार व लोकप्रिय मासिक पुस्तक पोस्टेजसह अवघ्या १२ आण्यांत लष्करी, शिवाय प्रत्येक वर्षीं उपयुक्त माहितीची सर्वोत्कृष्ट डायरी बक्षीस मिळते. त्वरा करा आणि अंक रोखीनें किंवा व्ही. पी० नें मागवा.

पत्ता–संपादक, ज्ञानविलास खणदाळ; पो० गडहिंग्लज. इ० कोल्हापूर.


☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

REGISTERED N. No. 4

बाहेरगांवीं टपालहाशिलांसह........ २ रु.
वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंकास ............................८२
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस.........८१ ०६
दुसरे खेपेस.... .... ....८१

All Subscriptions to be paid in advance.
Single copy ........................ 2 as,
Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......8 as
Repetition Per line ...2 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXVII AKOLA MONDAY 23 FEBRUARY 1903 NO 8

वर्ष ३७ आकोला सोमवार तारीख २३ माहे फेब्रुवारी सन १९०३ इ० अंक ८

वऱ्हाडसमाचार

मिती माघ वद्य १२ शके १८२४

## मी जगाकरितां नाहीं

वरील सदराखालीं आम्ही ता० २ मिनहूच्या आमचे अंकांत जो "नायक" लेख छापला होता तो एका 'साशंकास' झोंबल्यामुळें त्यानें आमच्याकडे आमच्या लेखास प्रत्युत्तरात्मक जें पत्र पाठविलें तें आमच्या ता. ९ च्या अंकांत 'साशंक' या सहीखालीं प्रसिद्ध झालें, तें वाचकांनीं पाहिलें असेलच. साशंकपणा सारखी दुःखकारक स्थिति जगतांत नाहीं. 'संशयात्मा विनश्यति' 'नायं लोकोऽस्ति न परो न सुखं संशयात्मनः' इत्यादि वचनें श्री० भ० गीतेंत प्रसिद्ध आहेतच. या करितां सहानुभूतीच्या आणि अनुकंपेच्या विचारानें 'साशंका'चें समाधान करून त्याच्या उद्वेगापासुन त्यास मुक्त करणें आवश्यक असल्यामुळें त्याच्या पत्राला अनुलक्षून चार शब्द लिहिणें आम्हांस प्राप्त झालें आहे.

प्रथमतः 'साशंकास' सत्यशील मानणें दुर्घट आहे असें म्हटल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं. कारण 'नागरिक' कोण आहे, 'गृहस्थ' कोण आहे हें मला ठाऊक माहीत नाहीं असें 'साशंक' म्हणतो आणि त्याचा कैवार घेऊन तो आमच्याशीं वाद करण्यास उभा राहतो. तेव्हां या व्यक्तींच्या तादात्म्याविषयीं त्यानें जो अज्ञानाचा बुरखा धारण केला आहे तो वस्तुतः बुरखा आहे किंवा तें वास्तविक अज्ञान आहे याचा विचार आमचें वाचकरूपी जें न्यायाधीशमंडळ आहे तें करील. त्या बद्दल आम्ही स्वतः कांहीं लिहिलें पाहिजे असें नाहीं. वकीलपत्र घेऊन कोर्टांत वाद सांगण्यास जायाचें आणि कोणत्या पक्षकाराकडून मी वकील आहें हें मला माहीत नाहीं असें सांगायाचें हा वेडेपणा कोठला! या पेक्षां व्यक्तितादात्म्याच्या अज्ञानतेसंबंधानें कांहीं उल्लेख न करणें अधिक प्रशस्त झालें असतें.

आमचा लेख ज्यांनीं लक्षपूर्वक वाचला असेल त्यांच्या ध्यानांत हें आलें असेल कीं 'नागरिक' हा विद्वान् आहे, दयालु आहे, लौकिकाची पर्वा बाळगणारा आहे इत्यादि गोष्टी आम्ही कबूल केल्या आहेत. परंतु 'मी जगाकरितां नाहीं' या त्याच्या समजुतीच्या दृढीभवनानें तो दुःखी होईल आणि मनुष्यतेच्या उत्तम गुणांपासून कालेंकरून च्युत होऊं लागेल अशा भीतीनें, अनुकंपेच्या दृष्टीनें, आम्ही त्यास इषारा दिला होता. "मी जगा करितां नाहीं" असें कितीही जरी मनुष्य तोंडानें बोलला तरी तो जगांत राहतो आहे तोंपर्यंत तो जगा करितां आहे व जग त्याच्या करितां आहे. हा अन्योन्य संबंध कधींही सुटायाचा नाहीं. "साशंकाचे" बहुतेक विचार आम्हांस मान्य आहेत. Charity must begin at home "न तद्दानं प्रशंसंति येन वृत्ति र्विपद्यते" इत्यादि वचनांच्या आधारें "साशंकानें" केलेलीं विधानें आम्हांस मान्य आहेत. "नागरिकाचें" वकीलपत्र घेऊन "साशंक" यांचें संरक्षण करण्यास प्रवृत्त झाले हें ठीक आहे. परंतु आमचा "गृहस्थ" मात्र यांस बरोबर अनुमानितां आला नाहीं यामुळें मिथ्याभिनिविष्ट सद्गृहस्था संबधानें त्यांच्या अंतःकरणाचे विकल्प विनाकारण बहिर्मुख झाले. आमचा गृहस्थ भिषग्विद्यावृत्ति आहे. तो 'नागरिका' कडे खास सार्वजनिक अनाथ कामाकरितां गेला होता. त्यानें आपला उपाध्यायही पाठविला नव्हता किंवा दिवाळें निघालेल्या सावकारास मदत मागण्याकरिताही तो गेला नव्हता. सार्वजनिक कामाचें स्वरूप काय असतें हें आमच्या गृहस्थास कळत नाहीं इतका तो वेडा नाहीं. व्यक्तिविषयक आणि सार्वजनिक हे शब्द 'साशंका' च्या कंपू बाहेरील जगतास चांगले समजत नाहींत असें साशंक समजत असतील तर त्यास अहंतेची बाधा फार आहे असें म्हणावें लागेल. असो. साशंकाचा आमचा मतभेद फारसा नाहीं असें आम्ही समजतों. आमचा कटाक्ष 'मी जगा करितां नाहीं' असे जे 'नागरिक' वारंवार म्हणत असतात त्या त्यांच्या भाषणावर होता. 'नागरिक' जगाकरितां आहेत व अनेक दिशांनीं ते जगताच्या उपयोगीं पडत आहेत व पुढेंही पडतील. जगताच्या उपयोगीं पडल्या वांचून त्यांचें चालणार नाहीं. त्यांनीं एखाद्याच्या शिफारशी उपाध्यायास जरी धुडकावून लाविलें असेल तरी एखाद्या काशीयात्रेस निघालेल्या ब्राह्मणास, त्यांनीं न मागतां, पांच रुपये आपखुषीनें दिलेही असतील.

आतां एका गोष्टीच्या संबंधानें मात्र 'साशंकाचा' आमचा मतभेद आहे. त्या गोष्टीचा विचार करूं. प्रथम असें सांगायाचें कीं, जर नागरिक 'मी जगाकरितां नाहीं' हें आपलें ठरीव वचन प्रत्येकापुढें मांडतात हें आमच्या "गृहस्थास" (शिक्षकाचा धंदा करणाऱ्या गृहस्थास) नव्हे तर वैद्यकी करणाऱ्या गृहस्थास माहीत आहे तर तो "नागरिका" कडे दिवाळें निघालेल्या सावकारास मदत करण्या बद्दल प्रश्न करण्यासाठीं जाणार नाहीं व गेलाही नाहीं. कारण खऱ्या सार्वजनिक कामास मदत देण्यास जे कुरकुरतात त्याजकडे अशा व्यक्तिविषयक कामास साहाय्य मागण्या साठीं कोण शहाणा मनुष्य जाणार आहे! आतां "साशंक" असें ध्वनित करतात कीं, जो आपल्या उधळेपणानें वागून आणि सट्टयाचे व्यापार करून स्वतःच्या मूर्खपणानें संकटांत पडला असेल तो साहाय्यास पात्र नाहीं. त्याला त्याच्या कर्माचीं फळें लोकांनीं उदासीनपणानें भोगूं द्यावीं आणि पाहिजे तर त्याची गम्मत किंवा तमाशा पाहात राहावें. म्हणजे, साधारणतः जेव्हां मनुष्याच्या मूर्खपणामुळें किंवा अविचारिपणामुळें त्यानें आपणांवर संकटें आणून घेतलीं असतील तेव्हां त्यास कोणीं मदत करूं नये. असें "साशंकांचें" मत. मतभेदाची बाब जी आम्ही म्हटली ती हीच.

या संबंधानें आमचें मत असें कीं, जितकीं म्हणून संकटें मनुष्यांवर येतात त्यांतील शेंकडा ९९ त्यांच्या मूर्खपणानें आलेलीं असतात. निव्वळ अस्मानी सुलतानीचें आलेलें संकट शंभरांत एक सांपडलें तर फार. याचीं आपण कांहीं उदाहरणें घेऊं.

१ चोरी करणारा, २ वेश्यागमनानें उपदंश झालेला, ३ रागाच्या आवेशांत दुसऱ्यास दुखापत करणारा, ४ परस्त्रीगामी पुरुष, किंवा घरांतील नोकर चाकराशीं रत होणारी स्त्री, ५ अविचारानें गाडी हांकून ती उलथून पडल्यामुळें दुखापत झालेला, ६ घरांत शिकण्याची सोय असून विद्याभ्यास न करणारा विद्यार्थी, ७ आगगाडींत झोंप लागल्यामुळें आपलें दागिन्यांचें गांठोडें हरवणारा, ८ वर्तमानपत्रांत वरिष्ठाविरुद्ध लेख लिहिण्याच्या कारणानें नोकरींत नुकसान पावणारा, ९ घोड्यावरून पडणारा, १० अविचारानें आहारविहार केल्यामुळें रोगग्रस्त होणारा, ११ आळशीपणामुळें दारिद्र्यावस्थेस प्राप्त झालेला १२ गर्भपात करणारी विधवा इत्यादि हजारों किंवा लाखों लोक आमच्या "साशंका" मतें साहाय्यास पात्र नाहींत.

प्रथम धर्मार्थ दवाखाने आणि इतर सर्व संस्था बंद केल्या पाहिजेत; आणि या सर्व विपन्न लोकांस जमा करून आणि ओळीनें उभे करून तोफेच्या तोंडीं देऊन "साशंकांस" व त्यांच्या अनुयायांस गम्मत पाहण्यास जवळ उभें केलें पाहिजे. पण "साशंक" महाराजांनीं खूप लक्षांत ठेविलें पाहिजे कीं एक दिवशीं त्यांनाही तोफेच्या तोंडीं जावें लागेल. ते मनुष्यच आहेत आणि चुकीस व अविचारास पात्र आहेत. "साशंक" हे तरुण असतील, इतक्यांत त्यांनीं गडबड करूं नये. जग काय आहे हें अद्यापि त्यांस कळण्याचें आहे.

"साशंक" महाराजांनीं लक्षांत ठेवावें कीं मनुष्यें जीं विपन्नावस्थेस पावतात तीं सर्व त्याच्या कर्मांच्या योगानें पावतात. पूर्ण शहाणे आणि पूर्ण योगी असे जगतांत फारच थोडे मनुष्य असतात. निष्काळजीपणानें फोडणी देत असल्यामुळें जर एखादी बाई जळून मरत असली किंवा उपदंशाच्या भयंकर यातना जर एखादा रोगी भोगीत असला तर तेथें "साशंक" जाऊन टिऱ्या पिटीत "भली झाली, भली झाली" असें जर म्हणत कुदूं लागतील तर त्यांस अत्यंत निर्दय, नीच, चांडाळ असेंच लोक म्हणतील. त्या वेळीं "साशंकास" अत्यंत दुःख होऊन जर ते रडूं लागतील तरच त्यांस मनुष्य म्हणतां येईल. फांशीची शिक्षा सुनावणारा न्यायाधीश हा कोमल अंतःकरणाचा मनुष्य असल्यास त्यास त्या वेळीं रडूं येतें अशीं उदाहरणें आहेत. तारुण्य, विद्या, धन आणि एकंदरीनें सुस्थिति याच्या घमेंडींत "साशंक" असतील म्हणून मोठ्या पांडित्याच्या गोष्टी सांगत असतील. परंतु जगांत जे आज पर्यंत थोर किंवा महात्मे म्हटले गेले व आज म्हटले जात आहेत यांची विचारसरणी अशी नाहीं. ते असें समजतात कीं, सर्व मनुष्यें मायाधीन असल्यामुळें तीं चुकीस पात्र आहेत आणि चुकांच्या योगानें तीं संकटांत पडतात. कोणी कशाही कारणानें संकटांत पडलेला असो त्यास हात देऊन वर काढणें हे दयाळू मनुष्याचें काम आहे. व याच विचारानें सर्वत्र विपन्नास मदत करण्याची वहिवाट आहे. दिवाळें निघालेल्या सावकारास मदत देण्याची व्यापारी मंडळींत वहिवाट आहे. व कित्येक तर हें साहाय्य बेमालुमपणानें करतात. उधळेपणानें रघुराजा आणि चारुदत्त या सारखे पुरुष दरिद्री झाले होते पण कवींनीं त्याचे पोवाडेच गाईले आहेत. पण तें असो. सध्या आपणास विपन्नास साहाय्य करण्या संबंधानें विचार करण्याचा आहे. कन्येनें व्यभिचार केलेला आढळला म्हणून बाप तिला घरातून बाहेर काढून देऊन भिक्षा मागण्यास पाठवीत नाहीं. "पोर आहे; चुकली" असें म्हणून क्षमाच करितो. आपली वेदांतांत सांगितलेली कर्माची उपपत्ति पाहिली तर जितकीं म्हणून दुःखें मनुष्यें भोगतात तीं सर्व त्यांच्या कर्मांचीं फळें होत. म्हणून त्या मनुष्यांस साहाय्य करायाचें नाहीं असें म्हणायाचें काय? शिव शिव! हा मोठा निर्दयपणा होईल. साहाय्य करण्याची शक्ति नसेल तर तें करा असें कोण म्हणेल? पण विपन्नाबद्दल वाईट तरी वाटलें पाहिजे. तरच माणुसकी. विपन्नाची थट्टा करणें किंवा गम्मत पाहणें ही मनुष्यता नव्हे.

आमचा लेख बराच लांबला. "साशंकांचे विचार आम्हांस मान्य आहेत हें

आह्मी पूर्वीच सांगितलें आहे. जो थोडा मतभेद होता त्या विषयीं आह्मी आमचे अल्प विचार दिले आहेत. त्यां विषयीं " साशं कानीं " स्वस्थ मनानें पर्यालोचन करावें. " नागरिकांस " आह्मीं इतकाच दोष दिला होता कीं- बहुतेक प्रकारें ते जगाप्रमाणें वागत असून " मी जगाकरिता नाहीं " हें वाक्य त्यांनीं विनाकारण कां उच्चारावें !

## गराडा

(कालः क्रीडति प्राणिशारेः)

वऱ्हाड प्रांतांतून पश्चिमेकडून पूर्वेकडे जाणाऱ्या रेलवेच्या आजूबाजूच्या भागांत प्लेगाचा अंमल अधिकाधीक बसत चालला आहे, इतकेंच नाहीं तर प्लेगाचा प्रसार आंत आंत वाढत आहे. बुलढाणें जिल्ह्यात देऊळगांव राजा, गांगलगाव, चांदोल, मलकापूर इत्यादि भागांत प्लेगाचें प्रयाण एका आठवड्यांत ९०।७९ माणसापर्यंत येऊन पोंचलें आहे. आकोला जिल्ह्यांत खामगांवास प्लेग नमला आहे तसेंच त्याचें मान बाळापूर, शेगांव व आसपासचीं गावें येथें उतरतें आहे. पण दररोज पांच सात माणसाची झडती होतच असतें आकोल्यास या रोगानें गेल्या दोन चार दिवसांत जरा विशेष नेट धरला आहे. येथील काळाचबुतरा, मंगळवारा, ताजनापेठ इत्यादि नदीच्या पूर्वभागाला प्लेग खानेसुमारी घेतच चालला आहे. नदीच्या पश्चिम तटाकडे अजून फैलाव नाहीं. दररोज पांच सात माणसें मरत आहेत. उमरावती जिल्ह्यात आजपर्यंत रेलवे चांदुरास ११ माणसें मेलीं, धामणगांवास २४३ माणसें मेलीं, बडनेऱ्याचे दोन तीन इसम आजारी झाले व उमरावतीसही कांहीं तीन चार मृत्यू संबधानें प्लेगाचा संशय येतो. अशा रितीनें एकंदर रेलवे नजिकच्या भागाला प्लेगाचा गराडा पडला आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

## खबरदारी.

प्लेगाचें अरिष्ट डोळ्यापुढें दत्त ह्मणून उभें आहे. हा ईश्वरी क्षोभ ह्मणा किंवा काळपुरुषाचा खेळ ह्मणा, ज्यांच्यावर हा प्रसंग येतो त्यानें ईश्वराच्या मर्जीला सादर होण्याला शिकलें पाहिजे. हा रोग एक विलक्षण अंजनच आहे. मनुष्याला त्याचा निर्बळीपणा चांगला कळावतो. या रोगापुढें माणसाचे हात टेकल्यासारखे होतात तेव्हां अलम दुनियेच्या पालनवाल्याचा आश्रय उत्तम होतो. अशा वेळीं जसा निर्धार करावा व ईश्वरावर निष्ठा ठेवावी, आणि त्याच्या दुनियेच्या घडामोडींत सर्व गोष्टी अगम्यपणें नीटच होतात असा जसा मनाचा संकल्प करावा तसें विलक्षण धैर्य येतें. आयुष्याचे चमत्कार रडवितांना देखील विस्मित व चकित करितात, व एका प्रकारें ब्रह्मज्ञानाचा अमोल धडा डोळ्यापुढें खेळत राहतो.

आपली सर्वांची प्लेगा संबंधानें पहिली खबरदारी ही पाहिजे कीं आपल्या मनोवृत्ती सुप्रसन्न राहतील. जगाच्या गोष्टीकडे नजर फेंकलीं व आपण त्यांतला ध्वनितार्थ समजून घेतला ह्मणजे प्रसन्नता येऊं लागते. दुःखाच्या रडकथा चालल्याच आहेत, पण आपण आपल्या भयभीत व साशंक वृत्तीला जरा झुगारण्याचा प्रयत्न निराशेच्या दृष्टीनें केला पाहिजे, आणि विपत्तकालीं धैर्य येण्याला पुष्कळशा आवडत्या गोष्टी ज्या दूर होतात त्या कःपदार्थ वाटल्या पाहिजेत. ही खबरदारी मानसिक झाली.

दुसरी खबरदारी स्थलान्तरा संबंधाची आहे. वणवा पेटतो व सर्व जंगल प्रज्वलित होतें तेव्हां हरिण सैरावैरा धांवतात व पुष्कळसे मृत्यु पावतात पण कांहीं कांहीं अशा वणव्यांतूनही बचावतात. हरिणा प्रमाणेंच माणसांची स्थिती आहे ज्याला जशी अनुकूळता असेल त्यानें त्या मानानें स्थलान्तर करावें. स्थलान्तर करण्याचे उद्देश दोन आहेत. नेहमींचीं वस्तीचीं ठिकाणें पुष्कळ वर्षांच्या वस्तीनें खराब झालीं आहेत. तेथून निघून उघड्या हवेंत राहण्यास गेल्यानें सङ्गीं पुष्कळ लाभ होतात. नित्याच्या राहटींत फेरबदल होतो व मोकळ्या हवेचा फायदा मिळतो. स्थलान्तराची गोष्ट दुर्घट आहे आणि गरिबी जेथेंतेथें आड येईल हेंही आह्मी ओळखून आहों पण स्थलान्तराच्या उपायाची महती कांहीं कमी होत नाहीं. एखाद्या रोगावर मौक्तिकचूर्ण चांगलें लागूं पडतें हें पुनः पुनः सांगण्यापासून कांहीं तोटा नाहीं, इतकेंच नाहीं तर मौक्तिक चूर्णाच्याच मागें लागल्यास कांहीं जणांस तें प्राप्तही होईल. प्रयत्न करून पाहावा, तो श्रीमंताला त्यांच्या परीनें जितका सोपा आहे तितकाच गरिबांलाहि त्यांच्या मानानें सोपाच आहे. स्थलान्तर करण्याचा प्रयत्न अवश्य करावा. आपलीं पुराणें स्थलान्तराचा उपाय सांगतात. गेल्या सात आठ वर्षांचा अनुभवही तिकडेच बोट दाखवीत आहे. प्लेगाला प्रतिबंधक उपाय स्थलान्तरा सारखा नामी कोणताच नाहीं.

तिसरी खबरदारी स्वच्छता राखण्या विषयीं विशेष घेतली पाहिजे. स्थलान्तर करा किंवा प्लेगानें दूषित झालेल्या भागांत रहा, पण घरांत ओलसर जागा कमी राहील तितकें बरें. पाणी जमिनींत मुरूं देऊं नये. आपली जुनी होमहवन करण्याची पद्धती शास्त्रोक्त रितीनें जारी होईल तितकी अधीक पाहिजे आहे. त्या शिवाय गंधक ऊद, डामर, चंद्रज्योतीची दारू वगैरे पदार्थ घरांत आळीपाळीनें जाळावेत. घरांत ऊन व हवा हीं जितकीं खेळतील तितकीं पाहिजेत. आणखी एक साधा उपाय ह्मणजे लिंबाचा पाला. मग तो ओला असो किंवा वाळलेला असो. तो जाळून घरात धूर करावा. या गोष्टी पुष्कळशा माहित असतात पण त्या कोणी नियमानें करीत नाहींत ह्मणून आह्मी मुद्दाम ही खबरदारी घेण्यास सांगत आहों.

प्लेगाचा रोग जितका स्थलविशिष्ट असतो तितका तो व्यक्तिविशिष्ट नाहीं. स्थलविशिष्ट रोग याचा अर्थ असा कीं हा रोग प्रथम ज्या स्थळीं उद्भवतो त्या स्थळीं रोगाला लागणाऱ्या सर्व द्रव्यांची प्रथम अनुकूलता होते आणि नंतर त्याचा परिणाम प्लेगाच्या रूपानें दृष्टीस पडतो. उंदिरास हा रोग अगोदर होतो तेव्हांच ती जागा त्याज्य समजावी, त्या जागेंत वावरणाऱ्या सर्वच माणसांस हा रोग नाहीं तथापि कोणत्या प्रकृतीचा मनुष्य या रोगाला बळी पडणार नाहीं हें कळण्याचा मार्ग नाहीं. त्या अर्थीं सर्वच माणसाला या स्थळींचा हा रोग होण्याचा संभव आहे असें समजून चालावें हें उत्तम.

## ध्यानांत धरण्याच्या गोष्टी.

पुष्कळदां प्लेग ओळखतां येत नाहीं. ज्या प्लेगांत फुप्फुसाला विकृती होते तेथें ताप १०४।६ अंशा पेक्षांहि अधीक एकसारखा राहतो, घाम येत नाहीं. ह्रदयाची क्रिया मंद होते, व छातींत दुःखतें. मनुष्याची शक्ती गलित ताबडतोब होते. मनुष्य अखेर पर्यंत शुद्धीवरच असतो. हीं लक्षणें दिसलीं कीं प्लेग समजावा. तसेंच ज्या प्लेगांत मेंदूला विकृती होते तेथें ताप एकसारखा अंगांत असतोच. मेंदूची क्रिया बंद पडत पडत जाते आणि मनुष्य बेशुद्ध होतो. हा प्लेगाचा तिसरा प्रकार होय. फुप्फुसाचा व मेंदूचा प्लेग गांठीच्या प्लेगापेक्षां अधीक भयंकर होय. जवळ जवळ ही १०।३६ तासांची मृत्यूची मात्राच होय. गांठीचा प्लेग कधीं कधीं तरी बरा होतो पण हे दुसरे दोन्ही प्लेग मनुष्याला जिवंत सोडतील असें विरळा घडतें.

प्लेगावर औषधी देणाऱ्यांचे उपाय नाना तऱ्हेनें फसतात. रोग्याला दाळकांचें औषध द्यावें तर रोगी थकत जातो व ताप उतरत नाहीं. कांहीं उत्तेजक मद्यादि औषध द्यावें तर तापाच्या अतिशयामुळें तेंही देण्याची फारशी सोय नसते. औषधें देणाऱ्या वैद्याचे व डाक्टराचे हातपाय गळतात. अशा प्रसंगीं पुण्या मुंबई कडील कांहीं अनुभवी लोकांचा अभिप्राय असा पडतो कीं मलमूत्राचा अवष्टंभ होऊं देतां कामा नये, तीं दोन्ही द्वारें माफक रितीनें खुलींच राहतील अशी सौम्य योजना पाहिजे. आणि रोमरंध्रें खुलीं होतील अशा युक्तीचा वाफारा दिला पाहिजे. चहाचा वाफारा द्या किंवा पाणी तापवून वाफारा द्या, कोणत्या तरी रितीनें त्वचेच्या द्वारानें शरीरांतील वाईट द्रव्याचा उत्सर्ग झाला पाहिजे. मलादि घन पदार्थ पश्चिम द्वारानें जातात, व मूत्रादि प्रवाही पदार्थ जननेंद्रियानें बाहेर पडतात, तसेंच फुप्फुस व मेंदू यांस बाधा करणारीं दूषित ग्यासा सारखीं द्रव्यें शरीरांतून त्वचेच्या रंध्रांतून बाहेर पडलीं पाहिजेत, आणि जेव्हां गांठी होतात तेव्हां त्या फुटून वाहतील असे उपाय योजिले पाहिजेत, साधारण औषधींचे धोरण वरील दिशेनें ठेवावें आणि ईश्वरावर सर्व भार सोंपवून प्रयत्न करून पाहवा.

प्लेगाच्या संसर्गा विषयीं कांहींच मत निश्चित नाहीं. क्षणभर, प्लेग जसा इतर कारणांनीं होतो तसा संसर्गानेंही होतो असें वाटलें तरी आप्तस्वकीयास प्लेगाच्या रोग्याची सुश्रुषा केलीच पाहिजे. प्लेगाच्या इतर कारणांचा जर प्रतिकार होत नाहीं तर त्या इतर कारणांमध्येंच संसर्ग समजून प्रत्येकानें संसर्गाचा धोका कारणप्रसंगीं घेतलाच पाहिजे. त्या शिवाय संसर्ग आपणास वाटतो इतका खरोखर फारसा बाधक नसतो. रोग्याच्या सुश्रुष सारखें महापुण्य नाहीं. किंबहुना जीविताचें सार्थक आपल्या आप्तमित्रांच्या सुश्रुषेतच आहे. प्लेगाचें विषारी द्रव्य ज्याच्या शरिरांत भिनतें त्याच्या संसर्गानें हा रोग कांहीं जडत नाहीं. शिवाय स्थानत्यागा नंतर रोग्याचा संसर्ग विशेष दोषिक होत नाहीं.

## गप्पा

वऱ्हाडच्या पुढील व्यवस्थे संबंधानें अनेक बातम्या आहेत. या प्रसिद्ध करण्यांत कित्येकांस कांहीं अर्थ वाटणार नाहीं, परंतु आमच्या मतें या बातम्यामध्येंच पुष्कळदां तथ्यांश असतो. निदान सरकारदरबारांत चालू असलेल्या वाटाघाटीचें दिग्दर्शन या बातम्यांच्या द्वारानें हांत असतें. सध्यां बातमी अशी आहे कीं, हा प्रांत मुंबई इलाख्याला जोडण्यांत येणार आहे तथापि या प्रांताचा अंमल होतां होईल तितका स्वतंत्र राखण्यांत येईल. या प्रांताचे सहा जिल्हे मोडून चार जिल्हे लवकरच होतील. पण या चार जिल्ह्यांत या प्रांताबाहेरील भागाचा समावेश करण्यांत येणार नाहीं. पूर्वींची बातमी अशी होती कीं मराठी भाषा बोलणाऱ्या महाराष्ट्राचा एक मुंबई इलाखा होऊन त्याच्या जिल्ह्यांची पुनः निराळी रचना होणार आहे. या रचनेंत पश्चिम वऱ्हाडाचा भाग खानदेशांत सामील होऊन पूर्व वऱ्हाडाचा भाग मध्य प्रांताच्या भागांत सामील व्हावयाचा आहे. परंतु ही बातमी आतां पालटली आहे. वऱ्हाड प्रांत अगदीं अलग व पृथक् ठेवण्यांत येईल आणि अशा पृथक् केलेल्या प्रांताचा कारभार मुंबई सरकाराकडे देण्यांत येईल. मागें चार जिल्ह्यांची रचना सुचविण्यांत आली होती आणि तत्संबंधी सरकारी कागदपत्रही तयार आहेतच. ही रचना अंमलांत येणार आहे असें ह्मणतात. उमरावतीची कांहीं पुढारी मंडळी सभा भरवून सरकारास अर्ज करणार आहे कीं, इकडील प्रजासमूहाचे हक्क कायम राखण्यासाठीं वऱ्हाडचें स्थानिक सरकार कायम ठेवावें; परंतु या अर्जाचा फारसा विचार होईल असा रंग दिसत नाहीं. हा प्रांत स्वतंत्र राखून मुंबई सरकारच्या किंवा मध्य प्रांताच्या सरकारच्या वहिवाटीला देण्यांत येईल हीच गोष्ट आह्मांस विशेष संभवनीय वाटतें. हा प्रांत अलग राखण्याचे प्रयोजन असें आहे कीं कोल्हापूर या मुलूख निराळा ठेवावा हें सयुक्तिक होय आणि त्या शिवाय विद्यमान निजाम सरकारच्या वाढदिवसा निमित्त वऱ्हाडच्या सदर स्टेशनांत निजामांचा बावटा उभारून तोफांची सलामी व्हावयाची आहे; तेव्हां अशी सलामी दर वर्षीं देण्याला हा प्रांत अलग राखावा हें जरूरीचें दिसतें.

सध्यां वऱ्हाड प्रांता संबंधानें मोठीच गडबड चालूं आहे. मे० इलियट साहेब रजेवर जाणार होते पण त्यांस रजा देण्यांत आली नाहीं, इतकेंच नाहीं तर अशी वदंता होती कीं, यांच्या चाकरीची मुदत एक वर्षानें वाढविण्यांत आली. पण आतां असें कळतें कीं मे० इलियट साहेब यांस येत्या मार्च महिन्या पासूनच पेनशन देण्यांत येईल; आणि

त्यांच्या जागीं मे. हेअर साहेब हे कमिशनर होतील. मे. निजामुद्दीन साहेब हे येत्या शनिवारीं वऱ्हाडांत परत येणार आहेत आणि रजेवर विलायतेस गेलेल्या अधिकाऱ्यांसही तावडतोब परत वऱ्हाडांत बोलाविलें आहे. जे मोठें मोठे अधिकारी पेनशनीला आले आहेत त्यांस पेनशनींत काढण्याची व्यवस्था सरकारच्या मनांत भरली आहे. सारांश येत्या मार्च महिन्यांत पुष्कळच फेरफार होणार आहेत आणि ते कसे काय होणार आहेत याचें दर्शन वरील गप्पांच्या द्वारे चांगलें होईल.

## भूदेव.

सध्यां भूदेव ह्मणजे इंग्रजी डाक्टर आहेत ते जें ह्मणतील तें खरें. त्यांचा शब्द तीच पूर्व दिशा होय, त्यांच्या अभिप्रायापुढें सर्व अभिप्राय रद्द आहेत, ते खरखोटे कसेहि असले व अनुभवाला ते पटले नाहींत तरी त्यांचा अभिप्राय खोडून काढण्याचें सामर्थ्य कोणाच्या हातीं नाहीं. या भूदेवांच्या मता संबंधानें आह्मी कांहींच लिहीत नाहीं परंतु जेव्हां ते दोन विरोधी गोष्टी सांगतात तेव्हां आह्मांस त्यांचें हासूं आल्या वांचून राहत नाहीं. आकोल्याच्या पश्चिम भागाला प्लेगाचे रोगी ठेवण्याच्या झोंपड्या बांधलेल्या आहेत या झोंपड्या लोकवस्ती पासून पन्नास पाऊणशें यार्डांहून अधिक लांब नाहींत. तेथें दोन दोन मैलावरून ह्मणजे आकोल्याच्या पूर्वभागाकडून प्लेग झालेल्या रोग्यास मर वस्तींतून आणून ठेवितात. थोडे दिवसापूर्वी एक रोगी मिशनरी लोकांच्या छावणींतून या प्लेगाच्या झोंपडींत तीन चार मैलावरून आणून ठेविला होता. मिशनरी कडून त्या रोग्याचें छावणींतील झोंपडें जाळण्यांत आलें, पण इकडे तो रोगी मेला तरी पूर्वीची झोंपडी कायमच आहे. फक्त ती कांहींशी स्वच्छ वगैरे करण्यांत आली. लोकवस्ती जवळील या प्लेगाच्या झोंपड्या काढण्याविषयीं हुकूम झाला होता व त्या तेथून लांबवर न्यावयाच्या होत्या पण ती गोष्ट बाजूला डाक्टर रेली साहेबांनीं टाकविली अशी लोकवार्ता आहे. लोकवस्तीच्या जवळ जर ही झोंपडी चाल-तात तर येथील सिव्हिल स्टेशनाच्या आस-पास मैल भरांत प्लेगापासून दूर रानांत राहण्यास जाणाऱ्या लोकांना झोंपडी बांधूं द्यावयाची नाहींत असा नियम करणार असल्याविषयीं कां घाटत आहे हें आह्मास समजत नाहीं. प्लेगाचें झोंपडें लोकवस्ती जवळ ठेवण्यास हरकत नाहीं तर सुखवस्तु लोकांस सिव्हिल स्टेशनाच्या आसपास झोंपडें बांधण्याला हरकत डाक्टर रेली साहेब आणतील असे आह्मास वाटत नाहीं. जर लोकवस्तीजवळ प्लेगाचें झोंपडें चालतें तर आह्मी आमचे सिव्हिल सर्जन डाक्टर रेली साहेब यांस सूचवितों कीं त्यांनीं जेलाच्या मागील पटांगणांत प्लेगाचें झोंपडें घालावें ह्मणजे रोगी लोकांवर त्यांची सक्त देखरेख राहील आणि त्यांच्या औषधोप-चारांचा प्लेगग्रस्तास मोठा लाभ होईल. सरकारी सडका पासून दोन दोनशें यार्डांच्या अंतरा पर्यंत कोणीही आपलें खानगी झोंपडें बांधूं नये असा नियम करणार असल्या विषयीं लोकवार्ता आहे. आमच्या माहिती प्रमाणें डाक्टर रेली साहेबांचे विचार याहून निराळे आहेत. प्लेगाच्या इस्पितळा समोर रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला कोणी झोंपडी बांधून राहील तरी भिती नाहीं असा त्यांचा अभिप्राय आह्मास ठाऊक आहे. सिव्हिल स्टेशनाच्या सुरक्षितपणा संबंधानें जी चळवळ चालूं आहे तिच्या विरुद्ध त्यांचें मत असावें असें आमचें अनुमान आहे. डाक्टर रेली साहेब सध्यां लोकांच्या कल्याणा विषयीं फार झटत आहेत आणि त्यांचे विचार फार उदार असून ते लोकांच्या सोयीकडे विशेष नजर देत असतात. अशा प्रसंगीं आह्मांस कुमार श्री हरभामजी साहेब मुख्य स्थानीं मिळालें आहेत तेव्हां ते व डाक्टर रेली हे उभयतां लोकांस प्लेगाचा बंदोबस्त सुखावह करितील अशी आशा आहे. गेल्या १० वे तारखेला येथें कचेरींत सभा भरली होती तेव्हां डाक्टर रेली साहेबांनीं कुमार साहेबांच्या विचारास आपली संमती दर्शविली आणि सर्वांस सुखकारक असे नियम करण्यात आले तेव्हां सर्व आकोलेकरांस मोठा आनंद वाटला. आकोल्याचे भूदेव डाक्टर रेली साहेब आहेत. त्यांच्या विचारात विसंगतता होणार नाहीं अशी आह्मास उमेद आहे. लोकवार्ता पुष्कळदां चुकीच्या असतात आणि ह्मणूनच येथें कचेरींत सभेमध्यें ठरलेले नियम अमलांत आहेत असें आह्मी समजतों.

# The Berar Samachar

MONDAY FEBRUARY 23 1903

In his report on the Revenue administration of Berar Mr. A. Elliott does not move an inch beyond his little comments upon the statistical figures that form the appendices of the report His report is almost stereotyped, nor do we expect from his usual way of work any thing more at his hands. But there is a small chapter in his report on the economic position of the agricultural classes. And therein we hoped to read some of his weighty conclusions. His experience extends over almost a generation and his intimate knowledge of the people in their homes is also an advantage. But this does not seem to press or persuade him to offer some suggestive hints for the information and guidance of the general public. He however adventures a remark in regard to the effects of recent legislation on the people. He writes that it is generally believed that a system of village Panchayats to settle petty civil and criminal cases would be advantageous. The remark stands like an isolated sentence and does not pretend to refer to any special legislation. This seems to be his general observation and we hope he will express himself in a fuller manner if he thinks to profit the people and the Government by his experience. We fail to understand what he means by petty civil cases. He gives no clue to his inner thoughts. We shall be glad if he fill in more details in his scheme of the Village Panchayat. We want a good deal of instruction from him and we shall welcome his suggestions provided he lands us in some tangible scheme of his creation. And we shall be the first persons to hail with delight any suggestions to revive the old Village—Panchayat.

But to our mind, the effects of recent legislation seem to undermine all solid influences that will promote the institution of a village Panchayat. The recent Patwari and Patel law takes away the hereditary authority of the village Patel and his Patwari. The new law does not keep up his old dignity and the gradual changes that turn a Patel into a mere servant engaged on some fixed annual remuneration are certainly most suicidal to the growth of a village Panchayat. The Government officers do not respect as a rule the position of the village officer. They do not make a move to lend a charm to his position. We wish our officers to show some discrimination in their treatment of the village people and their time—honoured dignitaries viz the Patil and the Patwari.

In connection with the economic position of the people we hoped to find some allusions to the good work that our Deputy Commissioner has taken in hand but we have been sorely disappointed. Our readers are familiar with the Industrial Association which is started under the auspices of Kumar Shri Harbhamji. There is also another channel in which he is doing his best to induce people of different villages to form themselves each into a co—operative company. Such a company will enlist its village members and will receive contributions in grain and money. With these contributions a fund will be started to help the needy people of the village at a moderate rate of interest. A village bank of grain and money is of course in view with the principle of co—operation at its foundation. The proposals of the Industrial Association and the village bank must have been within the knowledge of the Commissioner. But this knowledge either fails Mr. Elliott or he must have omitted to refer to them with a view of his own. We welcomed these proposals and have further noted in our columns the general acceptance which they have received at the hands of the public. Kumar Shri Harbhamji deserves a special mention in this connection and when we take into consideration the excellent manner in which his revenue administration has been so popular and so welcome we do not hesitate to say that Mr. Elliott ought to have brought to the notice of the Resident the good work he has been doing in our midst. We make no secret of the fact that with this omission of an appreciative notice we fail to weigh rightly his apportionment of praise for good work done in the last year. By the bye we request him to support Kumar Sahib in the work of forming an Industrial Association and a village Bank.

## वऱ्हाडवृत्त

हवामान—थंडी पडत होती ती कमी कमी होत चालली आहे. पण मधून मधून अभ्रें येतात, वीज चमकते व गरमीहि वाटते. उष्णकाळाला प्रारंभ लवकर होईल तितका बरा! हवा सार्वजनिक आरोग्याला मोठी बाधक आहे.

सेशन—गेल्या शुक्रवारीं व शनिवारीं सेशन कचेरी आकोल्यास भरली होती. वाशिम जिल्ह्यांतील एकच खुनाचा खटला होता. पुसद तालुक्यांतील बिबी गांवाचा पाटील आनंदराव हाटकर यानवर असा आरोप होता कीं त्यानें १७ नोवेम्बर रोजीं सटवा वल्लद उमाजी याला इतकें बेदम मारलें कीं त्याचा डावा हात पुष्कळ सांध्याच्या ठिकाणीं निखळला, व अखेरीला सटवा १ दिसेंबर रोजीं मरण पावला' अशी प्राणहारक दुखापत करण्याचें कारण असें दाखविण्यांत आलें कीं आरोपीच्या मातोश्रीशी सटवा हा व्यभिचार करितांना प्रत्यक्ष दृष्टीगोचर झाला; तेव्हां रागाच्या व त्वेषाच्या झपाट्यांत हा गुन्हा घडला. आरोपी ह्मणें कीं, सटवा माळ्य वरून खालीं पडला व त्याला मोठी दुखापत झाली. सटवाचें सांगणेंहि तसेंच होतें. परंतु पोलिसांस व जिल्हा माजिस्ट्रेटांस हा खून वाटला, माळ्यावरून पडल्याची गोष्ट खोटी दिसली, आणि पुसदच्या ३ रे वर्ग माजिस्ट्रेटापुढें साक्षीदारांच्या जबान्या खुनाच्या गोष्टीला अनुकूल अशा झाल्या होत्या. परंतु जिल्हा माजिस्ट्रेटापुढें व सेशन कोर्टापुढें साक्षिदारांनीं कानावर हात ठेविले आणि पोलिसाच्या त्रासामुळें तशा जबान्या दिल्या असें सांगितलें. खुनी आरोपी दोषमुक्त झाला. त्याच्या तर्फे रा. रा. गणेश श्रीकृष्ण खापर्डे हे वकील सेशनांत होते.

आह्माला लिहिण्यास अत्यंत दुःख वाटतें कीं, रा. रा. रघुनाथ गोविंद दामले बी. ए. यांस प्लेगाच्या आजारानें परवां रात्रीं देवाज्ञा झाली. हे एल. एल. बीच्या परीक्षेचा अभ्यास करीत होते. यांच्या पत्नी व एक धाकटी बहीण हीं गेल्या दहा दिवसांत प्लेगामुळें मृत झालीं, राजश्री रघुनाथराव हे ऐन पंचविशीच्या उमेदींत मरण पावले. गृहस्थ फार साधा, शांत स्वभावाचा व मोठा बुद्धिमान व तसाच चांगला अभ्यासी होता. त्याच्या मरणानें वृद्ध मातापितरांना, बंधूंना व इतर आप्तमित्रांना अत्यंत दुःख वाटेल. काल पहाटेला त्याच ठिकाणीं रा० रा० केशव गोविंद दामले यांच्या पत्नीलाहि प्लेगानें देवाज्ञा झाली. फुफ्फुसाचाच प्लेग होता. ईश्वराच्या मर्जीला सादर होणें हेंच खरें सांत्वन होय! येथील पेठेंत प्लेग सुरू झाला ह्मणून उघड्या उंच सपाटीच्या हवाशीर मैदानांत दोन कोसावर सुंदरशा निवाऱ्याच्या झोंपडींत राहण्यास गेल्या नंतर हे तिन्ही मृत्यु झाले !

रा. रा. सखाराम बापूजी नायब तहशिलदार, आकोट यांस नवीन निघालेल्या सर्व्हे मंडळीकडे मुख्य आफिसर नेमण्यांत आलें.

गेल्या बुधवारीं सायंकाळच्या संधिप्रकाशाच्या सुमाराला एक तेजःपुंज तारा पडला व तसेंच शनिवारीं रात्रीं आठाच्या सुमाराला एक मोठा तेजोमय तारा तुटून पडला. हे दोन्ही चमत्कार फार प्रेक्षणीय वाटले. दहा वीस सेंकद त्या ताऱ्यांची दीप्ती विशेष भासली.

आह्मांस लिहिण्यास दुःख वाटते कीं रा. रा. तुकाराम वामन देशपांडे शिरस्तेदार निसबत सिव्हिल जज्य आकोला यांस दम्याच्या व तापाच्या विकृतीनें काल रोजीं देवाज्ञा झाली. हे गृहस्थ फार सुशील असून मनमिळाऊ होते.

येथील गांवामध्यें एक माळी व एक कासाराचा मुलगा असे दोघ तापानें काल मरण पावले. हा प्लेगच असावा असें वाटतें. शिवाय पेठेंत काल रोजीं एकंदर प्लेगाचे ८ मृत्यु झाले.

## वर्तमानसार

**राज्यपदभ्रष्ट होळकरांची शेवटची इच्छा**– ( १ ) माझ्या सुप्रसिद्ध व पूज्य पूर्वज ज्या अहिल्याबाई होळकर यांनीं ज्या धार्मिक संस्था उत्पन्न करून ठेविल्या आहेत त्या कायम रहाव्या.

( २ ) परगणा किंवा जिल्हा कोणाही मनुष्याला कबुलायतीनें लागण करूं नये.

( ३ ) दिवाणी किंवा लष्करी जे लोक संस्थानच्या नोकरींत आहेत व जे संस्थानची प्रजा असून नोकरींत आहेत त्यांच्या हक्काकडे पूर्ण लक्ष दिलें पाहिजे; व होतां होईल तों संस्थानांतीलच लोकांस नोकरींत ठेवावें.

( ४ ) संस्थानच्या बाहेरील कोणा मनुष्यास नोकरींत ठेवण्याची जरूरी लागलीच तर बाळासाहेबांच्या अज्ञानावस्थे पलीकडे त्याच्या नोकरीची मुदत असता उपयोगी नाहीं.

( ५ ) लहान पगारावर असणाऱ्या ज्या लोकांस अलीकडे बढती मिळाली नाहीं यांचा पगार वाढवावा. मी आज राज्यत्याग करितेवेळीं संस्थानची गंगाजळी ओतप्रोत भरून ठेवली आहे. तर संस्थानला ऋणको होण्याची वेळ कधीं येणार नाहीं अशी याची स्थिती कायम ठेवावी.

विटा छपरांसुद्धां घरें कांचेची करण्याचा उद्योग चालला आहे.

सूर्य प्रकाशाची बरोबरी करण्यास ८,००००० पौर्णिमेच्या चंद्रांचा प्रकाश एकत्र केला पाहिजे.

विषुववृत्तावर क्विटो एवढ्या एका मात्र शहरांत सूर्योदय व अस्त बरोबर सहा सहा वाजतां होत असतात.

दिल्ली दरबाराच्या उत्सवांतल्या दारू कामाचा प्रकाश आसपास सुमारे शंभर मैलाच्या अंतरापर्यंत दिसत होता.

स्वीडन देशांत प्रत्येक शाळेला एक शेत असतें. त्यांत मुलांस पेरणी, कापणी, झाडें लावणें इत्यादि कामें शिकवितात.

**प्लेगवरील सूचना**—जेथें प्लेग उत्पन्न झाला असेल, तेथें पुष्कळ उष्णता उत्पन्न केली असतां, प्लेगच्या जंतूंचा पूर्ण नाश होतो असें काश्मीरच्या दरबारचे राजवैद्य यानीं प्रसिद्ध केलें आहे. प्लेगचा प्रतीकार करण्यासाठीं सर्व लोकानीं घरोघर शेंगड्या पेटवून ठेवाव्या अशीही त्यांनीं शिफारस केली आहे.

**नामांकित मराठी ग्रंथकार**–राव सा. विष्णु मोरेश्वर महाजनी, प्रोफेसर भानु, राव साहेब पावगी, रा. नारायणराव फडके, प्रोफेसर विजापूरकर, राव साहेब शंकर मोरो रानडे, राव साहेब विनायक कोंडदेव ओक, इत्यादि हल्लींचे नामांकित मराठी ग्रंथकार सर्वमान्य आहेत. त्यांचे लेख सर्व लोकास फार प्रिय वाटतात.

### कै० मंडलिक व रानडे

मंडलिक व रानडे दोघेही विद्वान, लोकमान्य व राजमान्य; देशाची कळकळ दोघांनाही; काम करण्याची हौस दोघांनाही विलक्षण, वेळाचा सदुपयोग केला असा दोघांनींच. दोघेहि सदय अंतःकरणाचे, व खानगी वर्तनांत शुद्ध, दोघेही स्वधर्मनिष्ट.

वरील प्रमाणें दोघा पुरुषांमध्यें बऱ्याच गोष्टी सामान्य आढळून येतात. तरी त्या दोन्ही राष्ट्रीय पुरुषांमध्यें बरेंच अन्तर आहे.

मंडलिकांची मुद्रा कठोर तर रानड्यांची सौम्य, एक जलाल व करारी तर दुसरा शांततेचा सागर. एकाकडे पाहिलें तर भीति वाटावी. दुसरीकडे पाहिलें तर सत्कार व प्रेम उत्पन्न व्हावें, एक मानापमानास जपणारा, तर दुसरा निर्गलित अभिमान. एक अटोकाट धोरणी तर दुसरा अगदीं उलट. एकास भेटावयास परवानगी व वशिला लागे तर दुसऱ्यास पाहिजेल तेव्हां पाहिजेल यानें भेटावें. एकाची वेळ बांधलेली तर दुसऱ्याची अगदींच मोकळी. मंडलिक दुसऱ्यावर छाप छापीत असत. रानड्यांची छाप आपोआप पडत असे. मंडलिकांचें कार्यक्षेत्र नियमित. रानड्यांची उद्योगभूमी विस्तृत. एकास आर्यसमाज तर दुसऱ्यास प्रार्थनासमाज आवडे. रानडे सामाजिक सुधारणेचे भक्त तर मंडलिक समाज सुधारणेसंबंधीं मुग्ध. ह्याप्रमाणें दोघांही महात्म्यांमध्यें फरक होता.

**कोण पवित्र विचार**—एक पाद्री ह्मणतात कीं, ईश्वराची करणी किती अगाध आहे; दुष्काळानें किंवा प्लेगनें आईबापें मारण्यांत पोरक्या मुलांनीं ख्रिस्ती दीक्षा घ्यावी हाच याचा उद्देश दिसतो.

**मनास उपरती**–एक धर्मव्याख्यान ऐकून एक युरोपियन ह्मणतो कीं, "मी ख्रीस्ति रानटी आहे; येथें जमलेला समाज सुसंस्कृत जातींतील आहे; हिंदूचें तत्वज्ञान खरोखरीच अगाध आहे. पाश्चिमात्यांस जें ज्ञान मिळ लें तें सर्व पूर्वेकडूनच मिळालें; हिंदुधर्मांत मला मरण यावें अशी मला फार उत्कट इच्छा आहे." पण आह्मां हिंदूना आमचा धर्म आवडत नाहीं यास काय करावें!

**मनकवडें यंत्र**—मनुष्याच्या मनांतील वृत्ति ओळखण्याचें एका अमेरिकन डॉक्टरानें एक यंत्र काढलें आहे. मोठ्या भांड्यांत एक रसायन द्रव्य ठेविलेलें असतें. ज्याच्या मनोवृत्तीची परीक्षा घ्यावयाची असते त्यास एका कांचेच्या नळींतून फुंकावयास सांगावयाचें; जसजशा त्याच्या मनोवृत्ति बऱ्या वाईट असतील तसतसा त्या रसायनांत फरक होत जातो! रोग्यांची तपासणी करण्यास व गुन्हेगार ओळखण्यास या यंत्रांची योजना केल्यास फारच उपयोग होणार आहे. खरें किंवा खोटें हें ओळखण्यास रसायनाचा रंगही ठराविक रीतीनें बदलतो. यंत्र खरें असल्यास फारच उपयुक्त आहे.

**खरोख अमोल ग्रंथ**– महाभारत, रामायण इत्यादि ग्रंथ पाहून व्हाइसराय साहेबांनीं असा अभिप्राय दिला कीं इतके अमोल ग्रंथ पृथ्वीवर कोठेंही नाहींत.

**हृदयद्रावक हकीकत**— वढवाणचे माजी ठाकूर रायसिंगजी यांची राणी श्री मोटीबा याचा विवाह १८४१ त झाला व ह्या वेळीं यांना गुळवंद नांवाचा गांव तहहयांत ह्मणून मिळाला होता. १८७० सालीं यांना वैधव्य आलें व याच प्रसंगीं दरसाल चार हजार रुपये देण्याचें ठरून त्याबारीं गांव वढवानदरबारानें आपलेकडे घेतला. याबद्दल राणीनें मुंबई व विलायत सरकारा कडे तक्रारी करून पाहिल्या पण तिची दाद लागली नाहीं! अलीकडे ८७ साला पासून ही रक्कमही त्यांस मिळत नाहीं! ९० सालीं मुंबई सरकारनें वढवाणास गेल्यास पैसे मिळतील ह्मणून त्यांस कळविलें. त्या प्रमाणें त्यांनीं केलें– पण पैसे हातीं येतना! ९९ सालीं तिनें कर्झन साहेबाकडे अपील केलें. पण मुंबईसरकारनें तें पुढेंच जाऊं दिलें नाहीं! आतां गांव नाहीं! पैसे नाहींत! आणि दादही नाहीं !! असा प्रकार या सामान्य स्त्रीचा नव्हेहो, राज्यकर्त्रीचा झाला आहे! ही हकीगत अशीच असल्यास मुंबई सरकारची शाबास आहे ह्मणावयाची!

**आह्मांस बडी देणगी**–ह्मणजे तुमच्यावर होत असलेला जुलूम कमी करण्यात येईल तुमच्यावर अतोनात बसलेला कर जरा कमी करूं व होत असलेला अन्यायहि कमी होण्याची तजवीज करूं अशीं आशा वचनें होत. असल्या देणग्या तरी आपणास कोण देतो?

**जीव तळमळतो**— आह्मांस वाटतें कीं आमच्या जवळ पुष्कळ संपत्ती येत जावी मग ती इंग्रज लोकानीं एकसारखी लुटून नेली तरी चिंता नाहीं. पण आह्मी अकिंचन झालों आहों ह्मणून आमचे पंचप्राण कासावीस होतात कीं, अरे आपल्या इंग्रज प्रभूस आपल्या कडून कांहींच मिळत नाहीं.

√ **मशालीनें दाखवा**– मि० चेंबरलेन हे प्रिटोरिया येथें गेले असतां तेथील लोकांनीं एकत्र बसून त्यांचा सत्कार केला. या जमलेल्या लोकांत एक हिंदी गृहस्थ ढवळ्या दिवसा जळती मशाल घेऊन उभा राहिला व त्यानें त्याज पुढें मोठ्यानें पुढील शब्द बोलून दाखविले:— "तुमच्या राज्यांत हिंदी लोकांवर होत असलेला अन्याय आपल्यास दिसत नाहीं तो या मशालींत पाहून घ्या." हिंदुस्थान देशाही आपली हताश स्थिती मशालीनीं दाखवूं लागेल तर ती दिसेल काय!

**ठराविक मृत्यूचें प्रमाण**– एका वर्षांत प्रत्येक हजार मनुष्यांत सरासरी ३६ मृत्यू ह्मणजे एका महिन्यांत प्रत्येक हजार मनुष्यांत ३ मृत्यु घडतात असें आहे.

**पारशी दीक्षा**—मुंबईचे प्रसिद्ध शेट मि. टाटा यांच्या कुळांतील मि. आर. डी. टाटा या गृहस्थांनीं कांहीं महिन्यापूर्वीं पारिस येथें एका फ्रेंच युवतीशी विवाह केला होता. या बाईनें लग्न झाल्याबरोबर फ्रेंच पोषाख टाकून देऊन पारशी साडीचा स्वीकार केला. हल्लीं ही बाई आपल्या पतिगृहीं राहण्यास आली आहे. तिनें आपणास आपल्या पतीच्या धर्माचा स्वीकार करावयाचा आहे अशी इच्छा प्रकट केल्यावरून तिला जर दुसऱ्या धर्मांत घेण्याचा विधि नुकताच मुंबईस झाला. दुसऱ्या धर्मांतील कोणा स्त्रीपुरुषाला पारशी केल्याचें हें पहिलेंच उदाहरण आहे.

**जनावरांचें प्रेम**— दोन रानटी हत्ती एका शेतांत शिरले असतां यावर एका मनुष्यानें गोळी झाडली यामुळें एक हत्ती नायबंदी होऊन पडला. हें पाहून दुसरा हत्ती पळून जात असतां उलटला व त्या घायाळ हत्ती जवळ जाऊन त्याची शुश्रूषा करूं लागला. त्याच्या साठीं कोवळा पाला, व पाणी तो सोंडेतून आणून यास देई. व एक झाडें थोरलें पान घेऊन त्यास वारा घाली असें एक सारखे तीन दिवस झालें. शेवटीं तो हत्ती मेला असें पाहून डोळ्यांनीं अश्रु गाळीत दुसरा हत्ती त्यास सोडून गेला! कोण हें प्रेम! मनुष्यांनीं या पासून चांगला धडा शिकावा.

### वऱ्हाड हायस्कूल माजी विद्यार्थी समाज
### सन १९०३

( विनंती पत्र. )

सर्व वऱ्हाड हायस्कूल माजी विद्यार्थी मंडळीस विनंती पूर्वक कळविण्यांत येतें कीं यंदाचा समाज उमरावती येथें तारीख १० व ११ एप्रिल १९०३ रोजीं भरविण्याचें ठरलें आहे या वेळीं सर्वांनीं येण्याची मेहेरबानी करावी. समाजाचे वर्गणीचे दर दरसाल प्रमाणें १ रु., २ रु., व ५ रुपये ठेवले आहेत. वर्गणी गोळा करण्यास मोठमोठे गावीं एजन्ट नेमले आहेत. वर्गणी त्यांच्या जवळ देऊन पावती घ्यावी. ज्या गावीं एजंट नेमले गेले नाहींत. त्या गांवचे समाजाचे मेंबरानीं व इतर मेंबरानीं त्यांस ज्यास्त सोयीचें वाटल्यास आपली वर्गणी रा. रा. भास्कर वामन जोशी बी. ए. एल् एल् बी. हायकोर्ट वकील उमरावती याजकडे होईल तितकी लवकर भरावी.

उमरावतीस समाज फार दिवसा नंतर भरत आहे. पाहुण्याची तरतूद जितकी चांगली ठेवतील तितका चांगली व आस्थापूर्वक ठेविली जाईल, तरी मित्रमंडळी कृपाकरून यंदा समाजास येऊन प्रसंग साजरा करितील अशी उमेद आहे.

उमरावती,
ता० २२।२।०३

जयराम केशव असनारे
दिनकर वामन हरकरे
वामन कृष्ण पुरोहित
समाजाच सेक्रेटरी,


### जाहिरात

गीताभाष्य. पूर्ण तयार, मराठी भाषांतर व विस्तृत स्पष्टीकरण यासह. पाडव्यापर्यंतच किंमत रुपये १०

श्रीमच्छंकराचार्यांचें शारीरभाष्य. मराठी भाषांतर व विवेचन यासह. मार्चपासून मासिक पु. द्वारें निघेल. गीताभाष्यापेक्षां तिप्पट. ३ वर्षांत संपेल. वर्षाची अ. व. ५८६ पहिल्या २०० ग्राहकास बालकांड व योगवासिष्ठवैराग्यप्रकरण ह २ रु. किंमतीचे उत्कृष्ट ग्रंथ सं. भा. स बक्षिस.

का० वा० लेले वाई.

K. N. ESMAYAL & Co.

यांनी अनेक रोगांवरील जग प्रसिद्ध ३७ प्रकारची औषधीं विक्रीस तयार आह. कार्डांत पत्ता लिहून कळवा ह्मणजे क्याटलाग फुकट पाठवूं.

पत्ता—खोजानुरा इस्मायल आणि कंपनी.

वर्धा. सी. पी.

र० नं. ११ सन 21/1

विद्यमान डिस्ट्रीक्ट जड्ज साहेब जिल्हे वाशीम.

जाहीरनामा सर्वत्र लोकांस कळावे कीं, तुळसुजन सवाईराम राहणार मानोरा हा तारीख ६।४।१९०२ रोजीं मानोरा येथें मरण पावला. मेताचे लोकाकडून येणें असलेलें कर्ज वसूल करण्या करितां सन १८८९ चा अक्ट ७ कलम ६ प्रमाणें सरटीफिकीट मिळण्या करितां अर्जदार दगडुबाई जवजे नारायण राहणार कनेरगांव तालुके हिंगोली जिल्हे परभणी हिने या कोर्टांत अर्ज केला आहे याचे चौकशीची तारीख ४।४।१९०३ रोजीं नेमली आहे. करितां अर्जदार शिवाय जो कोणी लगत वारस असेल त्यांनीं वरील तारखेस आमचे कोर्टांत वासीम येथें १० वाजतां हजर व्हावें. पुढें तक्रार ऐकली जाणार नाहीं. कळावे तारीख १६।२।०३ इसवी.

S. H. King

सदारी कोर्टाचे जड्ज.—वाशीम

---

## जाहिरनामा.

आम्ही खालीं सह्या करणार याजकडून सर्वत्र लोकांस जाहिर करण्यांत येते कीं मौजे राजुरे गीरवरपूर तालुके आकोट येथील खालीं लिहिलेलीं शेतें,

| सर्वे नं. | एकर गुंठे | आकार रुपये | |
|---|---|---|---|
| १६ पो. | ९८२१ | १४॥ | सालीना |
| २० पो. | ३८२१ | ७। | सालीना |
| ४४ पो. | १०८३ | १४ | निम्मे हिस्सा |

येणें प्रमाणें शेतें खालीं सह्या करणार यांचे मालकीचीं असून ती मागाई मर्द आकाजी राऊत राहणार अकोली जाहागीर ईचे ताब्यांत आहेत व यामुळें ती शेतें मागाई मर्द आकाजी इजपासून कोणी खरेदी, गहाण, बक्षीस, पट्ट्यानें अगर बटाईनें अगर इतर कोणत्याही रीतीनें घेऊं नयेत आणि घेतल्यास सदर्हू मिळकतीवर कोणत्याही प्रकारचा आणि रकमेचा बोजा राहाणार नाहीं. कळावे, तारीख १२।२।०३ इसवी.

सह्या.

सहीची निशानी कान्हाजी वल्लद नरसिंग याचे हातचा वखर.

सहीची निशानी चोहू वल्लद कान्हाजी याचे हातचा वखर.

---

## नोटीस

मे. रजबअल्ली मुल्ला अबदुल हुसेन बोहरी राहणार आकोला यास:—

कळविण्यांत येतें कीं तुम्ही आमची मौजे सागळूद येथील शेती पट्ट्यानें करून खत लिहून दिलें आहे. त्यांतील शर्ती प्रमाणें तुम्हाकडून वागणूक झाली नाहीं. करितां नोटीस देतों कीं, पट्ट्यांतील सर्व शर्तीं प्रमाणें वागणूक कराल अशाबद्दल योग्य जामीन ता० २२-२-०३ चे आंत द्यावा. न दिल्यास जमीन वहीत करण्यास तुमचा हक्क रहाणार नाहीं. व जमीन दुसऱ्यास लावून काढूं व होणारे नुकसानी बद्दल तुम्ही जबाबदार राहाल कळवें तारीख १७-२-०३ इ०

V. K. Desai.

## नोटीस

शिवनारायण चुनीलाल मा० शिवनारायण मारवाडी वस्ती मौजे इराइत पेठ मुर्तिजापूर तालुके आकोला यांस:—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं सुमारे ४ वर्षं झालीं मी तुम्हास रकम १२०० चें गहाणखत लिहून देऊन शेत तारण दिलें आहे तुम्ही तिगस्त सालाप व या सालाप पीक तयार अर्धें समयीं मजपासून झालेलें पीक नेतां वरील दोन वेळात मजपासून ९०० रुपयाचा माल नेला याबद्दल पावतीही तुम्ही दिली नाहीं सबब या नोटिसीनें तुम्हास सुचविण्यांत येते कीं मजला ईश्वान, गंभीर, व किसन असे त्रिवर्ग साक्षात भाऊ आम्ही सर्वत्र एक ठिकाणीं असतां वरील तुमचें कर्ज काढलें आहे त्या नंतर वरील त्रिवर्ग माझे बंधू विभक्त झाले आहेत व तुम्ही तर माझेच हिशांत झालेलें पीक दरसाल नेतां. यापुढें ही नोटीस पावल्यापासून एक महिन्यांत तुम्ही वरील गहाण दस्तऐवजाबद्दल वसूल मजरा देऊन कोर्टांत दावा करावा. या प्रमाणें तुम्ही न केल्यास तुम्हास वरील दिले मुदतीवर वरील गहाणखताचे रकमेस व्याज अगदीं मिळणार नाहीं. हें आपणास कळावें तारीख १७।२।१९०३

सही

भगवान वल्लद योगाजी कुणबी लोंढला वस्ती कानडी परगणे पिंजर तालुके आकोले निशाणी खुद्द.

---

## नोटीस

बेशमी रा० पुंजाजी वल्लद चिमणाजी खडशे कोळी राहणार रेल ता. आकोट, पोस्ट. केळीवेळी. यास:-

मी खालीं सही करणार या लेखानें कळवितो कीं, मी तुमची लग्नाची बायको आहे. मी शहाणी झाली त्या गोष्टीला ही आज आठ वर्षें होऊन गेलीं. तुम्ही मला मारहाण करून घालवून दिलीत. नाईलाजास्तव मी आईबापाच्या घरीं जाऊन राहिली चार पंचाच्या रुजुवातीनें मी पुन्हा तुम्हा बरोबर संसार करूं लागली. एक वर्षाचा काळ लोटला नाहीं तोंच तुम्ही मला वागवीत नाहींसे झाला, दहा आणे पायलीचा दुष्काळ पडला आणि मी कशी तरी हिंडून चार कामें करून पोट भरूं लागलीं. चार पंचा समक्ष तुम्ही सांगितलें कीं मी तुला सोडचिठ्ठि दितो व तूं वाटेल तसा रस्ता धर. तुम्ही ती सोडचिठ्ठि अजून लेखी दिली नाहीं. या गोष्टीला सात वर्षें झालीं मी तुमच्या नावावर ३८० रुपये कर्ज काढलें आहे. तें कर्ज देऊन टाका आणि माझ्याशी संसार करा. नाहीं तर पूर्वी तोंडी दिलेली सोडचिठ्ठी लेखी करून द्या म्हणजे मी दुसरा घरठाव करून दुनियेदारीला लागेन. या नोटिशी प्रमाणें आठ दिवसांच्या आंत काय तो निकाल करावा आणि कोर्टांत खोट्या नाट्या फौजदारी करीत बसूं नये खरें पाहिलें तर मी तुमची बायको राहिलेच नाहीं. तोंडी सोडचिठ्ठी दिल्या पासून तुमचा नवरेपणाचा हक्क तुटला आहे. कळावें. तारीख १९ फेब्रुवारी १९०३ इसवी.

सहीची निशाणी

पार्वती मर्द पुंजाजी कोळी हल्ली वस्ती दानापूर ता० आकोट

---


## ORIENTAL GOVERNMENT SECURITY LIFE ASSURANCE COMPANY LIMITED

Established 1874.

Head Office,—BOMBAY.

*Chief Agency for C. P. Berar & Khandesh*

Head—quarters— Nagpur, C. P.

—:0:—

FUNDS EXCEED TWO CRORES

Claims paid for over One Crore and Ten Lakhs.

IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS.

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when Claims arise, that the amount due under the Policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the "Oriental" keep well before them and act up to—treating their clients with the utmost liberality.

*Unquestionable Security*

It is not sufficient to read that a Company's Funds amount to a given sum, but it is essential to know how such Funds are invested—if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives and endowment policies matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others, by employing a portion of their annual income or profits in effecting life policies. at once create a fund equivalent to the savings of many years.

Creditors who expect the repayment of debts at some future period may protect themselves from loss by the failure of life in the intermediate period, by an assurance on the life of the debtor

No man can be sure how long he will live, and although he may save money yet if he die early, before he has had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is got over Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay There are numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month and less, has left the family without the intended provision.

Influential and energetic Agents wanted. For terms please apply to undersigned.

Prospectuses, forms, and any further information can be obtained on application to

M. De SOUZA,
CHIEF AGENT,
*for C. P. Berars & Khandesh*



ॐ नमः श्री गणेशाय.

आर्यवनौषधालय— मुर्डी ता० दापोली आमच्या खरोखऱ्या औषधांचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित् न आला तर पैसे परत देऊं व याने आरोग्यार्थ आणखी एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकट देऊं.

### मदनामृतसंजीवनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक. मनोत्साहक, कांतिबुद्धिवर्धक, अशी सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत

## गुटिका

उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून खालील विकारावर या अत्यंत उपयोगी आहेत.

याच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नस्थ व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रिय शिथिलता कडकी, गर्मी संबंधी मुरलेले विकार, मूत्रसंकोच, धातुचा पातळपणा, स्त्रियांचे धाणी छातींतील रोग, हातवाय, मूत्रपिंड व नेत्र यांचा दाह, क्षय पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य, मस्तकशूळ, मूळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार, बळंतरोग, मुष्टिमैथुनादि घात संवयीनें आलेली कृशता, इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनतें; पचन शक्ति व स्मरण शक्ति भरपूर वाढून धातु व रक्त याची वृद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें. शक्ति भरपूर वाढून मनास उत्साह येतो. दूध व जडान्न भरपूर पचूं लागते. गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटा मिळाल्या व नित्य मिळत आहेत. पथ्य सेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें यास पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहे.

गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम चार रुपयांवर कितीही घेणारास टपाल खर्च माफ. चार रुपयांचे आंत ट० ८६ आणे पडेल. अनुपान सर्व सोबत. रोखीनें किंवा व्ही. पी. नें खालील पत्त्यावर मिळतील. दर:—

| | | | |
|---|---|---|---|
| ३१ गो० | १ रु० | ७१ गो० | २ रु० |
| ११९ गो० | ३ रु० | १६१ गो० | ४ रु० |
| २७१ गो० | ६ रु० | ५५० गो० | १० रु० |

आमचेकडे या शिवाय मोठमोठे रोगावर अनेक औषधें असून ग्रंथस्थ रसायनें धातूंचीं भस्में, पाक गुटिका वगैरेही माफक दरानें मिळतात विशेष गुणवर्णनाचा सर्व मालाचा मोठा क्याटलाग मागवा, फुकट देऊं. टपाल खर्च वेगळा पडेल. रोखानें किंवा व्ही. पी. नें पाठवूं.

सूचना—— मोठमोठे २।३ वर्षे आजारलें वगैरे ठिकाणीं केवळ आपमतलबी ढोंगी लोकांच्या जाहिरातीस ऊत आला असून यांनीं आमचेच जाहिरातीची हुबेहूब कापी करून ते ग्राहकाचे डोळ्यांत धूळ फेकीत आहेत. करितां आमची सकल देशबंधूंस अशी सविनय प्रार्थना आहे कीं, ज्यांस खरी शास्त्रोक्त औषधें घेणें असतील त्यांनीं आमचीच औषधें खालील बिनचूक सही पत्त्यावरच मागवावी.

पत्ता—कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.
मु० मुर्डी ता. दापोली
जि० रत्नागिरी

## खरेदी करा !


रास्कोपची थेट व खरी

### पेटेंट वॉचेस

नकली मालास भुलून पैसे खर्चू नका !!!

रेल्वेच्या व इतर अवजड कामास हेच वॉच अत्यंत उपयुक्त आहे. हें वॉच पहिल्या प्रतीचें चिनचूक वेळ दाखविणारें असून इतर वाचेस प्रमाणें यास नेहमीं रिपेरची जरूर नसून या बद्दल विशेष काळजी व लक्ष पुरविण्याची अवश्यकता नाहीं. म्हणून जंगलांत बाहेर फिरणारे लोकांचें तर हें सोबतीच आहे असें अनुभवास आलें आहे. यानकरितां ज्याला अचूक वेळ बरोबर राखण्याची जरूरी आहे अशा लोकांस म्हणजे इंजिनियर, कॉंट्रॅक्टर, ओव्हरसियर, फारेस्ट कन्सरव्हेटर व इतर प्रवासी लोकांस हें वाच घेणें विषयीं आम्ही खात्रीपूर्वक शिफारस करितों. आमची स्कोपच्या पटेंट वॉचेस संबंधीं याहून जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं कारण त्यांच्या गुणांची प्रचीती तींच आपोआप दाखवितात, इतकें लिहिलें असतां बस्स आहे. ही घड्याळें आपली स्वतःच शिफारस आजपर्यंत करीत आलीं आहेत, करीत आहेत व पुढेंही अशीच करीत राहतील. प्रत्येक वॉच फार काळजी पूर्वक तपासून चालवून तें वेळ बरोबर दाखवितें अशाबद्दल ग्यारंटी देण्यांत येते, व या बद्दलची जोखीमदारी आमचे शिरावर आहे.

सूचनाः—पुढील नमुना २१ लाईनच्या मोठ्या आकाराच्या वॉचचा आहे.



मोठे मध्यम १६ रु. १७ रु. लहान

रोल्ड गोल्ड ४ वर्षांच्या ग्यारंटीचें

१९ लाईन ओपनफेस..........................४०

१९ ,, हंटिंग..........................४१

गोल्ड ५ वर्षांच्या ग्यारंटीचें.

१८ लाईन ओपन फेस फिरत्या झांकणाचे ........१६०

१९ ,, हंटिंग, नकशीचे ........१९५

मेटलचें तीन वर्षें ग्यारंटीचें.

रास्कोप पेटंट २१ लाईन एक्स्ट्रा स्ट्राग १८

१९ ,, सेकंद कांट्यासह..........................१०

१९ ,, मध्यमागीं सेकंद कांटा असलेलें ..........................२२

१९ ,, हाफ हंटिंगचें..........................२०

१९ ,, हंटिंगचें..........................२०

१४ ,, रिस्ट वॉच..........................२०

इनगनमेटल ३ वर्षांच्या ग्यारंटीचे

१९ लाईन ऑपनफेस..........................२०

१९ ,, हंटिंग..........................२०

१४ ,, रिस्टवॉच..........................२०

सिल्व्हर वाच ४ वर्षांच्या ग्यारंटीचे

१४ लाईन रिस्ट वॉच..........................३०

१४ ,, हंटिंग..........................३६

१८ व १९ ,, ओपनफेस..........................३०

१९ ,, सेकंद कांट्यासह..........................३२

१९ ,, मध्यमागीं सेकंद कांटा असलेलें ..........................३६

१९ ,, ओपनफेस सुंदर नकशीचें....३६

१९ ,, हंटिंग..........................४९

लेडीज वॉचीस १४, १८, क्यारेट गोल्ड रुपये ६९-२०० पर्यंत.

सी. हिनीगर आणि कंपनी.

ऑरिजनल जिनीयन रास्कोप पेटंट वॅचसचे सोल एजंट.

९ हार्नबी रोड, मुंबई.



विक्रीसतयार.

सोहोनीकृत भरपूर टिपांसहित मराठी

## कायद्याचीं पुस्तकें

सिव्हिल प्रोसिजर कोड- अवृत्ति दुसरी, पानें अदमासें ९०० निव ज्याची संख्या ६००० किंमत अति स्वस्त केली आहे. व्ही. पी. सुद्धा रु. ३

क्रिमिनल प्रोसिजर कोड — ( सन १८९८ चा आक्ट ५ वा, १८९९ चा अक्ट १२ वा यानें सुधारल्या प्रमाणें ) किंमत ६ रुपये व टपालखर्च ०१० आणे.

क्रिमिनल प्रोसिजर कोड — जुना आक्ट ( सन १८८२ चा १० वा ) किंमत ६ रुपये व टपाल खर्च ०१० आणे.

जुनें नवें क्रिमिनल प्रोसिजर कोड एकत्र बांधविलेलें घेतल्यास वरील दोन्हीं पुस्तकांची किंमत टपाल खर्चासुद्धा ८४.

दिवाणी आक्टसंग्रह- ( यांत दिवाणी कामास लागणारे सर्व आक्ट आहेत, पानें अदमासें ९०० ) किंमत टपाल खर्चा सुद्धा २८

म्यानेजर, डेक्कनबुक एजन्सी, सदाशिवपेठ, पुना सिटी.

नारो अप्पाजी गोडबोले बुकसेलर बुधवार पेठ.



१० आणे त किं० रु० १५ चें फुकट.

( १००० चें वर दर आठवड्यास पाठविले जाते. )

कंपनीचें दर आण्याचें तिकीट विकत घ्या. यावर रु० ९॥ पाठवून ४ तिकीटा सह हक्काचें सर्टिफिकीट मिळवा. ( किंवा एकदम तीन रुपये देऊन आणे पाठवा ) तीं चार तिकिटें दुसऱ्यास विकून आपले अडीच रुपये वसूल करून घ्या. किंवा घेणाराकडून आणे तुमच्या मार्फत प्रत्येक तिकिटासह रु० २॥ प्रमाणें एकंदर रु० १० पाठवून तीकिटासह ४ सर्टिफिकिटें व फुकट वाटीव पॉकेट वॉच किंवा सिलिंग आवश्यक ८ दिवसांत बक्षीस व करणारे मोठे क्लॉक मागवा. अर्थात दहा आण्यांत १६ रु० चें फुकट !!!

जी. बी नाईक आणि कंपनी.

ठकुरद्वार रोड मुंबई.



*Kadi* हें काय आहे ?

डाक्टर डी. एम. दस्तुर यांनी तयार केलेली दमा व खोकला या वरील रामबाण औषधी.

दमा आणि खालील सर्व रोगांवर तात्काळिक व गुणकारक उपाय हाच आहे. जेथें डाक्तरांचा व इतरांचा कोणाचाही उपाय चालत नाहीं तेथें हें फार उपयोगी पडतें. याच्या गुणाबद्दल हिंदुस्थान, इंग्लंड व अमेरिका येथील रोगग्रस्तांचे व डाक्तरांचे शेंकडों चांगले अभिप्राय आहेत. कितीही जुनाट दमा, फार दिवसांचा खोकला, घशांत घरघर अवाज होणें, वारंवार सरदी व पडसें होणें, व ताप येणें, सतनी, ब्रान्कायटीस इनफ्लुएन्झा इत्यादि रोगांवर हें फार उपयोगी आहे. बाटलीची किंमत सारा १॥ रुपया आहे. परंतु हें रोग्यास एक हजार रुपयांच्या किमतीचें वाटतें.

पत्ता—मेसर्स पेस्तनजी आणि सन दुकान आकोला.



मुंबई बँकेची ठेव ठेवण्याची बँक

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईलः—

कोणत्याही एका वर्षांत आगामी जानेवारी च्या १ ले तारखे पासून तो डिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्याच्या हयातींत, तसेच त्यांचे मागें त्यांच्या पैकी एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपयापर्यंत ठेव केल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र १००० पेक्षा हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई व्याक आकोला १।७।०२ J. Kiniburgh एजंट



## दन्तकुसुमाकर

खालीं लिहिलेल्या दंताच्या आजारा वर आणि इतर हरएक प्रकारच्या दाताच्या बिमारीवर हें औषध एक रामबाण मात्राच आहे.

काम अक्सीर का दाता मे दिखाते है हम। चोट डंके की हरेक मर्ज उडाते हम ॥

मोठी डबी.... १ रु. लहान ,, .... ।।-




दौलत चाहिये क्या मुल्क कदर करती है। ढूंडते फिरते हरेक शिम्त कदरदां हैं हम ॥

दांतीवर जाळें नमणें, तेे पिवळी होणें, हिरड्या दुखणें, दांत आंबणें, हलूं लागणें, कमजोर होणें, भेगा पडणें, किडे पडणें, वांकडे तिकडे होणें, नेहमीं खपल्या पडणें कठीण वस्तु दांतानीं फोडतां न येणें, दांत मळकट घाणेरडे राहणें, त्यातुन रक्त वाहणें किंवा दुःख होणें इत्यादि सर्व प्रकारचीं दुखणीं नाहींशीं होतात, प्रत्येक दिवशीं याचा उपयोग केल्यानें वर लिहिलेले कोणत्याही प्रकारचे रोग या पासून राहणार नाहींत. निरंतर दांत स्वच्छ आणि चकचकीत राहतात. कोणत्याही प्रकारची बिमारी न होतां तोंड स्वादिष्ट व सुवासिक राहतें.

एजंट—कृष्णाजी गणेश पटवर्धन आफ मेसर्स भास्कर कृष्ण जनरल मर्चंटस् आकोला.

पत्ता— नंदलाल वर्मा म्यानेजर फ्रेन्ड अँड कम्पनी मथुरा.



अति स्वस्त ! ज्ञानविलास अति स्वस्त !!

हें अत्यंत चटकदार व लोक प्रिय मासिक पुस्तक पोस्टेजसह अवघ्या १२ आण्यांत मिळेल, शिवाय प्रत्येक वर्षाची उपयुक्त माहितीची सर्वोत्कृष्ट डायरी बक्षीस मिळेल. त्वरा करा आणि अंक रोखीनें किंवा व्ही० पी० नें मागवा.

पत्ता-संपादक, ज्ञानविलास. खणदाळ पो० गडहिंग्लज, जि० कोल्हापूर.


एक गोड उपाय— कच्च्या किंवा पिकलेल्या फळांचा सतत कांहीं दिवसपर्यंत आहार ठेवल्यानें, चहा किंवा दारू पिण्याची संवय नाहींशी होते, असें म्हणतात. उपाय तर फारच गोड आहे.

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी बंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाड-समाचार" छापखान्यांत नारायण बंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.